पुणे, बुधवार, १४ ऑगस्ट २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 246 • वर्ष ३ रे, अंक २४६ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

# काठावर पास आमदारांना धडकी

# भाजपही पुण्यात आप्तस्वकीयांच्या लाथाळयांनी हैराण

**कोथरूड आणि पर्वती वगळता कुठेही नव्याने झालेल्या महायुतीतील उमेदवारांना मताधिक्य नाही. अजित पवार यांच्यामुळे भाजपाची ताकद वाढण्यापेक्षा नुकसान अधिक आहे आणि शिंदे शिवसेना गट शहरात निष्प्रभ आहे, हे लोकसभेच्या निकालावरून स्पष्ट झाले. यामुळे महायुतीसाठी बहुसंख्य जागांवरील विजय हा धोक्याच्या पातळीवर आहे. प्रत्येक मतदारसंघाची सत्यस्थिती मांडणारा हा विशेष रिपोर्ट!**

**मागील विधानसभा निवडणुकीत केवळ २ ते ५ हजार मताधिक्याने काठावरील विजय मिळवलेल्या महायुतीच्या पाच आमदारांसह तीन-तीन टर्म ठाण मांडून बसलेल्या भाजप आमदारांच्या विरोधातील वातावरणामुळे महायुतीच्या छातीत धडकी भरली आहे. त्यातच भारतीय जनता पक्षातील काही महत्त्वाकांक्षी कार्यकर्त्यांमुळे आप्त स्वकीयांच्या लाथाळ्यांची जणू काही स्पर्धा लागली असून, श्रेष्ठींसाठी ती मोठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी शरद पवार आणि शिवसेनेची एकत्रित ताकद काँग्रेसला मिळण्याची शक्यता आहे, तर शिंदे शिवसेना निष्प्रभ आहे.**

#रा

## खडकवासला



खडकवासला मतदारसंघात आ. भीमराव तापकीर यांची तब्बल चौथी टर्म आहे. मागील वेळी ते सुमारे दोन हजार मताधिक्याने कसेबसे विजयी झाले. हा मतदारसंघ आता महायुतीचे घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे जाण्याची शक्यता आहे. तेथे रूपाली चाकणकर तसेच दिपाली धुमाळ यांना उमेदवारी मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. चाकणकर या महिला आयोगाच्या अध्यक्षा आहेत, परंतु त्यांचा पूर्णवेळ हा अजितदादांच्या दौऱ्यात आणि प्रदेश पातळीवर जातो. त्यामुळे मतदारसंघात त्यांचा पहिल्यासारखा 'कनेक्ट' राहिला नाही. त्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या मान्यवरांना दोन-दोन महिने त्यांची अपॉइंटमेंट देखील मिळत नसल्याचे दिसते. त्यांच्या संपर्क कार्यालयात अपॉइंटमेंट साठीची नोंदणी, फोन नंबर ...

» पान १० वर

## शिवाजीनगर



सिद्धार्थ शिरोळे हे युवक आमदार आणि परंपरागत राजकारणी असले, तरी केवळ पाच हजार मताधिक्याने मागील वेळी त्यांचा विजय झाला आहे. यावेळी आदित्य माळवे, नीलिमा खाडे यासारख्या भाजपा अंतर्गत प्रतिस्पर्ध्यांचेच त्यांच्यासमोर आव्हान आहे. शिरोळे यांना जरी उमेदवारी मिळाली तरी खाडे, माळवे यांच्या असंतोष गृहीत धरता, त्यांना लढाई करावी लागणार आहे. कोथरूड सारख्या मतदार संघात वारे माप मंत्रीपदे, प्रदेश पातळीवरील पदे दिली. परंतु भाजपने शिवाजीनगरवर नेहमीच अन्याय केला, अशी येथील कार्यकर्त्यात भावना आहे. वैयक्तिक शिरोळे हे देखील फारसे सक्रिय नसतात, तसेच त्यांचा तळागाळातील लोकांशी दैनंदिन संपर्क कमी आहे. काँग्रेसचे दत्ता बहिरट हे तेथे प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत.

## हडपसर



चेतन तुपे यांनी मागील वेळी सुमारे ५ हजार मताधिक्याने विजयश्री मिळवली होती. आता त्यांनी अजित पवार गटात प्रवेश केला आहे. तेथे योगेश टिळेकर यांनी उमेदवारीसाठी दावा केला होता. तथापि, त्यांना विधान परिषद दिल्यामुळे आता भाजप ही जागा पुन्हा चेतन तुपे यांच्या माध्यमातून राष्ट्रवादीला देईल, असे दिसते. येथे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या वतीने प्रशांत जगताप यांची उमेदवारी निश्चित मानली जाते. परंतु प्रशांत जगताप हा सर्वसामान्यांना अपील होणारा चेहरा नाही. त्याशिवाय पक्षश्रेष्ठींच्या दौऱ्यात सक्रिय आणि सामान्यांकरता 'नॉट रिचेबल' अशीही प्रतिमा आहे. त्यामुळे या मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारासाठी पोषक वातावरण दिसते. शिवसेना शिंदे गटाने देखील या मतदार संघाची मागणी केली आहे. पण त्यांच्याकडे येथे सक्षम आणि चारित्र्यसंपन्न उमेदवार नाही.

## कोथरूड



पुण्याचे पालकमंत्री राहिलेले चंद्रकांत दादा पाटील यांच्या बद्दल झालेल्या उपऱ्या उमेदवाराचा प्रचार खोडून काढत २५ हजारांचे लीड घेत दादांनी मागील विधानसभा घेतली. परंतु त्यावेळी सर्वच पक्षांचे त्यांना सहकार्य होते. यंदा येथे पृथ्वीराज सुतार हे शरद पवार गटाकडून त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी मानले जातात. भाजप अंतर्गत येथे बरीच नाराजी आहे. ठराविक कार्यकर्त्यांच्या चक्रव्यूहात अडकलेले दादा येथे अनेक नागरी समस्यांना न्याय देऊ शकलेले नाहीत. कोथरूडला भाजपने भरभरून दिले, परंतु खरोखरच मतदानात त्याचा उपयोग होणार आहे का? याबद्दल भाजप कार्यकर्ते देखील संभ्रमात आहेत. ज्येष्ठतेचा दंभ नको सामान्यांचा कळवळ असणारा आमदार हवा, असा येथील कार्यकर्त्यांचा सूर आहे. कुठलीही प्रमुख ताकत नसताना


» पान १० वर

## कॅन्टोन्मेंट



भाजपा आमदार सुनील कांबळे यांचा मागील वेळी सुमारे ५,००० मताधिक्याने विजय झाला. यावेळी तेथे काँग्रेस नेते रमेश बागवे यांनी मोठे आव्हान उभे केले आहे.
शिवाय काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष एकत्रित निवडणूक लढवीत आहेत. तेथे सदानंद शेट्टी यांचाही आग्रह आहे. परंतु बागवे हे उमेदवारीमध्ये बाजी मारतील असे दिसते.
बहुसंख्य झोपडपट्टी आणि दलित वस्तीचा बहुभाग असलेल्या या भागात बागवे यांचा वरचष्मा आहे. सुनील कांबळे हे केवळ पक्षश्रेष्ठींसमोर मिरवणारे आणि प्रत्यक्षात नागरी समस्यांबाबत निष्क्रिय असणारे आमदार म्हणून त्यांची बदनामी येथे मोठे प्रमाणात होत आहे.

## वडगाव शेरी



सुनील टिंगरे हे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार मागील वेळी सुमारे ५ हजार मतांनी विजयी झाले होते. पोर्शे कार प्रकरणांमध्ये त्यांची असलेली अनावश्यक दखलबाजी आणि गुन्हेगारीला साथ देण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीमुळे मतदारसंघात त्यांच्याविरुद्ध वातावरण असल्याचे बोलले जाते.
येथे जगदीश मुळीक यांनी लोकसभेसाठी खूप तयारी केली होती. मात्र, त्यांना उमेदवारी नाकारली गेली. आता ते विधानसभेसाठी इच्छुक आहेत. मात्र, यंदा देखील पुन्हा टिंगरे यांना उमेदवारी मिळणार असेल, तर येथील भाजप कार्यकर्ते किंवा विशेषतः मुळीक यांना मानणारा वर्ग मनापासून प्रचारात सहभागी होणार नाही, असे बोलले जाते.

## पर्वती



माधुरीताई मिसाळ यांनी गेली तीन टर्म येथे आमदारकी भूषवली. तेथे श्रीनाथ भिमाले आणि राजेंद्र शिळीमकर हे प्रमुख उमेदवारीसाठीचे प्रतिस्पर्धी आहेत. शिवाय माधुरी मिसाळ यांना मिळणारे लाखोंचे मताधिक्य गेल्या टर्मपर्यंत ३० हजारांपर्यंत खाली आले होते. त्यामुळे येथे बदल हवा, हे पक्षांतर्गत अनेकांचे मत आहे. तथापि, मनी, मसल पॉवरमध्ये माधुरी मिसाळ या भिमाले आणि शिळीमकर यांच्यापेक्षा वरचढ ठरतात.
येथे महाविकास आघाडी कडून देण्यात येणाऱ्या उमेदवारांमध्ये सौ. कदम, काका चव्हाण यांची नावे चर्चेत आहेत. मात्र, ते फारसे प्रभावी उमेदवार दिसत नाहीत. येथे महायुतीला पोषक वातावरण असले, तरी भाजपला अंतर्गत संघर्षाला सामोरे जावे लागणार असल्याचे दिसते.

## कसबा



भाजपाला धडा शिकवल्यानंतर देखील कसब्यातून अजूनही पक्षाने काही शहाणपण शिकले नाही, असेच दिसते. खरे तर लोकसभेच्या मानसिकतेचा फायदा घेत, येथे भाजपला पोषक वातावरण असू शकते. मात्र, हेमंत रासने यांच्याबद्दल अजूनही प्रचंड नाराजी आहे. धीरज घाटे हे खूप वर्षांपासून प्रतीक्षेत आहेत. त्यांनी येथे आपला खास वर्ग निर्माण केला आहे. स्वरदा बापट यादेखील इच्छुक आहेत. कुणाल टिळक यांनीही मध्यंतरी भावनिक पोस्ट लिहित, 'माझी आई असती तर हा पराभव झाला नसता...' असे व्यक्त होत स्वतःसाठी न्यायाची याचना केली आहे. आता रासने यांना पुन्हा उमेदवारी दिली तरी येथे बहुसंख्य असलेले हे उच्चवर्णीय मतदार आणि इच्छुकांचे कार्यकर्ते आणि त्यांच्याशी अटॅचमेंट असलेले मतदार नाराज होतील.

» पान १० वर

## » At a Glance

### तेजसने दाखवली आपली ताकद

**चेन्नई :** स्वदेशी बनावटीच लढाऊ विमान तेजसने तरंग शक्तीमध्ये आपली ताकद दाखवली. हा भारतातील सर्वात मोठा बहुपक्षीय हवाई युद्धसराव आहे. तेजससह आधुनिक लढाऊ विमाने अनेक मोहिमांमध्ये आपली उपयुक्तता सिद्ध

» पान १० वर

### अन्यथा लाडकी बहीण योजना थांबवू

**नवी दिल्ली:** महाराष्ट्र सरकारची ‘लाडकी बहीण’ योजना सध्या चर्चेत आहे. या योजनेवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने टिप्पणी केली. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात राज्य सरकारला फटकारले. पुण्याजवळील जमीन प्रकरणातील

» पान १० वर

### निवासी डॉक्टर दुसऱ्या दिवशीही संपावर!


**कोलकाता:** कोलकातामधील सरकारी हॉस्पिटलमध्ये पदव्युत्तर प्रशिक्षणार्थी डॉक्टर महिलेवर झालेला बलात्कार आणि निर्घृण हत्येच्या निषेधार्थ देशभरातील निवासी डॉक्टर आज(दि.१३) दुसऱ्या दिवशीही संपावर आहेत.

» पान १० वर

# पुणे-मुंबई केवळ २ तासांत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे-मुंबई प्रवास आता रेल्वेने २ तासांत करता येणार आहे. रेल्वेने मुंबई पुण्यादरम्यान, नवीन मार्ग आखायची योजना आखली असून, खंडाळा घाटाला टाळून हा प्रस्तावित मार्ग आहे. त्यामुळे हा प्रवास वेगवान आणि आरामदायी होणार आहे.



» वेगवान प्रवास

मुंबई-पुणेदरम्यान रोज ये-जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढताना दिसून येत आहे. मुंबई-पुणे प्रवासादरम्यान १९२ किमीचे अंतर असून, या मार्गावर एकूण ४४ रेल्वेगाड्या धावतात. त्यापैकी २३ रेल्वेगाड्या रोज धावणाऱ्या असून उर्वरित रेल्वेगाड्या साप्ताहिक, द्विसाप्ताहिक आणि त्रैसाप्ताहिक स्वरुपात आहे. त्यामुळे आता मुंबई आणि पुर्ण दरम्यानचा रेल्वे प्रवास आणखी वेगवान आणि आरामदायी होण्यासाठी मध्य रेल्वेने नवीन प्रस्ताव तयार केला आहे. त्यानुसार प्रवाशांचा लोणावळा न गाठता पुणे प्रवास करता येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य रेल्वेने मुंबई आणि पुणे या दोन शहरांना जोडण्यासाठी कर्जत ते तळेगाव आणि कर्जत ते कामशेत हे दोन नवे मार्ग तयार करण्यासाठीचा प्रस्ताव आखला आहे. त्यामुळे प्रवाशांना लोणावळा घाट टाळून पुणे गाठता येणार आहे. याआधी मुंबई-पुणे प्रवासासाठी ३ तास लागत होते. मात्र नव्या मार्गावर घाट नसल्याने रेल्वेगाड्या प्रतितास ११० किमी वेगाने धावू शकणार आहेत.

» पान १० वर

# 'जेपीसी' अध्यक्षपदी जगदंबिका पाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** वक्फ (दुरुस्ती) विधेयकावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये प्रचंड गदारोळ झाला. अखेर सरकारने हे विधेयक छाननीसाठी संसदेच्या संयुक्त समितीकडे (जेपीसी ) पाठवले आहे. या जेपीसीच्या अध्यक्षस्थानी भाजपचे ज्येष्ठ नेते व खासदार जगदंबिका पाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



» 'वक्फ'विधेयक

गेल्या शुक्रवारी संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत मांडले होते. याला या विधेयकातील तरतुदींना लोकसभेत विरोधकांनी विरोध केला. यानंतर केंद्र सरकारने हे विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे चौकशीसाठी पाठवले. संसदेच्या संयुक्त समितीमध्ये एकूण ३१ सदस्य आहेत. त्यापैकी २१ सदस्य लोकसभेचे आणि १० सदस्य राज्यसभेचे आहेत. संयुक्त समिती आपला अहवाल संसदेच्या पुढील अधिवेशनात सादर करणार आहे.

» पान १० वर

## भाजप इतिहास घडवण्याच्या मार्गावर?

# चर्चेत फडणवीस पण धुरा महिलेकडे?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भाजपच्या राष्ट्रीय पक्षाध्यक्षपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. तथापि, या पदावर एक इतिहास घडवायचा म्हणून एका महिलेला स्थान देण्यात येईल, असेही पक्ष वर्तुळातून समजते. यामध्ये कदाचित पंकजा मुंडे यांची वर्णी लागू शकते.

भारतीय जनता पक्षाचा मूळ मतदार असलेला ओबीसी तसेच इतर मागासवर्गीय आणि महिला केडर मजबूत करण्यासाठी हा निर्णय घेतला जाऊ शकतो असे पक्षांतर्गत सूत्राने म्हटले आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश



नड्डा यांचा कार्यकाळ संपला आहे. नव्या अध्यक्षाची निवड होईपर्यंत त्यांच्याकडे ही जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. असे असले तरी नव्या अध्यक्षांच्या नावावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. नुकतीच भाजपची उच्चस्तरीय बैठक पार पडली, त्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारीही सहभागी झाले होते. पक्षाची कमान ओबीसी किंवा इतर मागासवर्गीय किंवा महिला नेत्याकडेही जाऊ शकते, अशी अटकळ बांधली जात आहे. याबाबत सध्या अधिकृतरित्या काहीही सांगण्यात आलेले नाही.

माध्यमातील वृत्तानुसार, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या घरी यासंदर्भात प्रदीर्घ बैठक झाली. ५ तास चाललेल्या या बैठकीत नवे अध्यक्ष किंवा कार्यकारी अध्यक्ष यावर मंथन झाल्याचे मानले जाते. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, सरचिटणीस बी. एल. संतोष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रय होसबळे,

» पान १० वर

#रा




## खड्ड्यांविरोधात पालिकेसमोर आप चे आंदोलन

# बँड -बाजा वाजवून जाहीर निषेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील सर्वच रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरलेले आहे. पावसानंतर अनेक ठिकाणचे रस्ते खराब झाले असून शहरातील या समस्येकडे लक्ष वेधण्याकरता "आप" च्या वतीने पालिकेसमोर बँड बाजा आंदोलन करण्यात आले. महापालिकेतील अधिकाऱ्यांचा रस्ते तयार करणाऱ्या कंत्राटदारांवर कोणत्याही प्रकारचा कंट्रोल नाही. कंत्राटदारांकडून रस्ते तयार करताना निकृष्ट दर्जाचे मटेरियल वापरल्यामुळे रस्त्याची क्वालिटी तकलादू असते. छोट्याशा पावसात देखील रस्त्यावर अनेक खड्डे पडतात आणि याप्रकाराकडे पालिका अधिकारी डोळेझाक करत आहेत. रस्ता तयार केल्यानंतर डिफॉल्ट लायबिलिटी पिरियड संपेपर्यंत तरी त्यावर कोणत्याही प्रकारचे खड्डे पडू नयेत अशा अटी असतात परंतु या अटी कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याकडून काटेकोरपणे पाळल्या जात नसून अधिकारी व ठेकेदार यांच्यात असलेल्या देवाण -घेवाणीमुळेच अधिकारी वर्ग कंत्राटदारांच्या चुकीच्या कामाकडे दुर्लक्ष करतात असा आरोप यावेळी आम आदमी पक्षाच्या महाराष्ट्र राज्याचे कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील यांनी केला

केंद्रातील राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काही दिवसांपूर्वी पालिका अधिकाऱ्यांची भेट घेऊन खड्डे बुजवण्याचे आदेश दिले. त्यावर बोलताना आम आदमी पक्षाच्या वतीने सांगण्यात आले की, भारतीय जनता पक्ष आणि अधिकारी यांच्यात साटे लोटे असून नागरिकांना जरी त्रास होत असेल, परंतु भाजपकडून आदेश आले नसतील तर रस्ता दुरुस्तीची कामे दुरुस्त होत नाहीत अशी परिस्थिती आहे. पालिकेत नगरसेवक नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कुठलाही दबाव नाही आणि या सर्व गोष्टींची परिणिती म्हणून नागरिकांना त्रास सोसावा लागत आहे. आम आदमी पक्ष अधिकाऱ्यांच्या अशा प्रवृत्तीचा जाहीर निषेध करतो तसेच येत्या चार दिवसात शहरातील खड्डे जर व्यवस्थित बुजवले गेले नाही तर त्याच खड्ड्यात साठलेले पाणी बाटलीत भरून महापालिका अधिकाऱ्यांना भेट देण्यात येईल.

आप चे शहर अध्यक्ष धनंजय बेनकर म्हणाले, शहरासह उपनगरांतील रस्त्यावर कोट्यवधी खर्च करून निकृष्ट दर्जामुळे खड्डे पडुन रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. खड्डे व वाहतूक कोंडीमुळे होणाऱ्या अपघात निष्पाप पुणेकरांचे बळी जात आहेत. नागरिक त्रस्त झाले आहेत. असे असताना अधिकारी टक्केवारीत गुंतले आहेत. खड्डे भरूनही रस्त्यांची काही दिवसांतच खड्डे चाळण होत आहे. येत्या आठ दिवसांत खड्डे न बुजवल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.

> पुणे महापालिकेवर केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ किंवा पालकमंत्री श्री अजित पवार यांचा बिलकुल अनुष राहिलेला नाही. या दोघांनी राजीनामे द्यावेत. सामान्य नागरिकांनी फक्त टॅक्स भरायचे आणि खड्यात पडून जीव द्यायचा का? शारीरिक मानसिक त्रास वेगळाच आहे. पालिका अधिकाऱ्यावर मनुष्य वधाचे खटले दाखल केले पाहिजेत.
> — **सुदर्शन जगदाळे,** पुणे शहराध्यक्ष,आम आदमी पार्टी

> केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आदेश देऊनही अजून खड्डे बुजवले गेले नाही, अधिकारी टोलवा टोलवी ची उत्तरे देतात. यावर सामान्य नागरिक त्रस्त आहे. खड्ड्यामुळे वाहनांच्या रांगाच रंग लागत आहे. लवकरात लवकर खड्डे बुजवले जावे सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा.
> — **अमित म्हस्के,** युवा अध्यक्ष आप पुणे शहर

> पुण्याचे खासदार आणि माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी प्रशासनाला 24 तासात खड्डे बुजवायला सांगितले. ' मोहोळ यांच्याकडे आहे आता हवाई अड्डा पण त्यांचेच ठेकेदार सांभाळतात पुण्याचा खड्डा, रस्त्यावरचे खड्डा हाच भ्रष्टाचाराचा अड्डा ' त्यामुळे ना प्रशासन त्यांचे ऐकते ना ठेकेदार. जी २०च्या निमित्ताने पाचशे कोटी रुपये रस्त्यावर खर्च केले शिवाय दरवर्षीचे ५० कोटी खर्च होतात तरीसुद्धा खड्डे पडणे थांबत नाहीत. उत्तरदायित्व काळातील दंडही वसूल होत नाही हे गंभीर आहेत — **मुकुंद किर्दत,** प्रवक्ते, आप

## पॅन्डॅमिक काळावर चितारलेल्या चित्रांचे प्रदर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** साल २०२० च्या सुरुवातीला कोविड १९ विषाणूने संपूर्ण जगाला हादरवून सोडले. पुढील किमान २ वर्षे संपूर्ण जग शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर या विषाणूचा सामना करत होते. या काळात विस्कळीत झालेले जनजीवन, अनेकांवर ओढावलेली परिस्थिती, आलेला एकाकीपण, जीवलग-कुटुंबीय यापासून झालेली ताटातूट अशा संमिश्र भावनांची मांडणी असलेले 'वन्स अपॉन अ टाईम, अ पॅन्डॅमिक' हे चित्रप्रदर्शन २५ ऑगस्टपर्यंत कोरेगाव पार्क येथील मोनालिसा कलाग्राम या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते सायं ७.३० दरम्यान ते विनामूल्य खुले आहे. मोनालिसा कलाग्राम आणि आयजीए गॅलेरिया यांच्या वतीने आयोजित या प्रदर्शनात युवा चित्रकार चितकला रमेश यांची ॲक्रलिक माध्यमातील चित्रे रसिकांना पाहता येणार आहेत. पॅन्डॅमिक काळावर चितारलेली ही चित्रे आकाराने मोठी असून हे या चित्रांचे वैशिष्ट्य आहे.

## राष्ट्रसंचार गौरव कार्याचा

### अग्निशामक दलाच्या धाडसी जवानांचा

# भाजपा युवा – युवती मोर्चातर्फे सन्मान!

**पुणे :** शहरातील पूर परिस्थितीत अग्निशमन दलाच्या अधिकारी व जवानांनी धाडस दाखवत पुरात सापडलेल्या नागरिकांना मदत केली व त्यांना या आपत्कालिन परिस्थितीत सुखरुप बाहेर काढले. त्यांच्या या धाडसी कार्याबद्दल भारतीय जनता युवा मोर्चा आणि भारतीय जनता युवती आघाडीच्या वतीने अग्निशमन दल मुख्यालयात सन्मान करण्यात आला.

यावेळी युवा मोर्चाचे शहराध्यक्ष करण मिसाळ यांनी अधिकारी व जवानांच्या धाडसी कामगिरीचे कौतुक करीत प्रत्येक आपत्कालिन परिस्थितीत अग्निशमन जवानांचे कार्य मोलाचे असल्याचे सांगत आभार मानले तर युवती मोर्चाच्या शहराध्यक्ष मनिषा धारणे यांनी दलाविषयी कृतज्ञता व्यक्त करत कुठल्याही संकटकाळात क्षणात मदतीसाठी धावणारे हे जवान आम्हा पुणेकरांसाठी सुरक्षिततेची भावना निर्माण करतात असे म्हटले.

> आम्ही जेव्हा आमचे कर्तव्य बजावत असतो त्यावेळी समाजाकडून विविध स्वरुपात जो सन्मान मिळतो तेच आमच्या दलाचे मनोबल उंचावते. आमच्या दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सदैव समाजाच्या रक्षणासाठी कार्यरत असतो." — **रमेश गांगड,** सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी, मनपा पुणे.



राष्ट्र संचार छायाचित्रसेवा

11



**फोटो क्लिकर :** अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयामध्ये भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

### पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथान यांचा जीवनपट उलगडला

# राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल ठाकरे यांचे हस्ते भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.सुनिल ठाकरे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल प्रा.तानाजी माळी यांनी केले.

या कार्यक्रमाचे आयोजन केल्या बद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

> आजच्या आधुनिक जगात तंत्रज्ञान खूप प्रगतीपथाकडे जात आहे. अशा परिस्थितीत आपणही अपडेट राहणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना तत्काळ सेवा देण्यासाठी ग्रंथालय कटीबद्ध आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी ग्रंथालयीन सेवांचा ज्यास्तीत ज्यास्त लाभ घ्यावा.
> — **प्राचार्य डॉ.सुनिल ठाकरे**

## Selected

## पुण्यातील काही भागात शुक्रवारी पाणीपुरवठा राहणार बंद

**पुणे :** शहराला पाणी पुरवठा करणारी ससुन रुग्णालय परिसरातील मुख्य जलवाहिनी फुटली आहे. या जलवाहिनीमुळे या परिसरातील पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या जलवाहिनी दुरुस्तीचे काम शुक्रवारी (दि.१६) हाती घेतले जाणार आहे. यामुळे पुण्यातील काही भागातील पाणी पुरवठा हा बंद राहणार आहे. नागरिकांनी पाण्याचा योग्य साठा करावा तसेच पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन पुणे महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे. पुणे रेल्वे स्थानक परिसराचा पाणीपुरवठा शुक्रवारी बंद राहणार आहे. तर दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी (दि १७) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. जलवाहिनी दुरुस्तीच्या कामामुळे पुण्यातील पुणे रेल्वे स्थानक परिसर, सोमवार पेठ, मंगळवार पेठ, गारपीर वस्ती, पांढरा गणपती परिसर, सोमवार पेठ पोलीस वसाहत, बरके आळी, सारस्वत कॉलनी, घोडमळा परिसर, जेधे पार्क, ससून सर्वोपचार रुग्णालय, गणेशखिंड रस्त्यावरील संचेती रुग्णालय ते मोदीबाग पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंचा परिसर, जुना पुणे-मुंबई रस्ता, संगम पूल ते मुळा रस्तापर्यंतच्या दोन्ही बाजूंचा परिसर, ताडीवाला रस्ता झोपडपट्टी आणि जुना बाजार परिसराचा पाणीपुरवठा शुक्रवारी बंद राहणार असल्याचे पालिकेने म्हंटले आहे. त्यामुळे रहिवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

## फिल्म फेडरेशनच्या उपाध्यक्षपदी वीरेंद्र चित्राव यांची निवड



**पुणे :** फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजनच्या उपाध्यक्षपदी आशय फिल्म क्लबचे सचिव तसेच अनेक महोत्सवांचे संयोजक वीरेंद्र चित्राव यांची निवड करण्यात आली आहे. पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजनच्या बैठकीत कार्यकारीणीचे १२ सदस्य आणि ५ स्विकृत सदस्यांची देखील निवड २०२४-२६ या कालावधिसाठी करण्यात आली. वीरेंद्र चित्राव हे गेल्या ४० वर्षांहून अधिक काळ चित्रपट, नाटक, संगीत, साहित्य, कलाक्षेत्रात कार्यरत असून आशय फिल्म व सांस्कृतिक क्लबचे सचिव आहेत. पुलोत्सव, आशियाई चित्रपट महोत्सव, किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, मुंम्बा आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव, शि.द.१०० महोत्सव इत्यादी अनेक महोत्सवांचे ते संयोजक असून आजपर्यंत देशभरात सुमारे ४०० महोत्सवांचे आयोजन त्यांनी केले आहे. फिल्म सेंसॉर बोर्ड, महाराष्ट्र शासनाच्या चित्रपट सल्लागार समितीचे सदस्य म्हणून त्यांची कारकिर्द लक्षणीय ठरली आहे.

## सरकार 'लाडक्या बहिणीं'ची फसवणूक करणार : धंगेकरांची टिका



**पुणे :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाल्याने राज्यातील वातावरण तापले आहे. महायुती सरकार लाडकी बहीण योजनेचा जोरदार प्रचार करताना दिसत आहे. मात्र या योजनेतून सरकार राज्यातील लाडक्या बहिणींची फसवणूक करणार असल्याची टीका आमदार रवींद्र धंगेकर यांनी केली. तसेच आमदार निधी या योजनेसाठी वळवल्याने धंगेकरांना संताप अनावर झाला आहे. सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या अर्थसंकल्पात योजनांचा पाऊस पाडल्याची टीका विरोधक करत आहेत. तिजोरीत पैसे नसतानाही लाडकी बहीण योजना रेटली जात आहे, असा आरोप होत आहे. त्यमुळे ही योजना फक्त निवडणूक होईपर्यंत असणार असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.

## अन्यथा एकाही पक्षाला धनगर मतदान करणार नाहीत : आंदोलनाचा इशारा



**पुणे :** भारतीय संविधानाने धनगर समाजाला दिलेल्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची राज्य सरकारने त्वरित अंमलबजावणी करावी, अन्यथा संभाजीनगर येथे जगातील सर्वात मोठे आमरण उपोषण करण्यात येईल. यामध्ये ५०० तरुण आमरण उपोषण करतील. एसटी आरक्षणासंदर्भात राज्यातील प्रमुख पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. एसटी आरक्षणाच्या बाजूने भूमिका घेतली नाही, तर येत्या निवडणुकांत धनगर समाज एकाही पक्षाला मतदान करणार नाही, अशी ठोस भूमिका सकल धनगर समाजाच्या वतीने घेण्यात आली. धनगर समाजाच्या मागण्या मान्य न झाल्यास लवकरच संभाजीनगर येथे जगातील सर्वात मोठे उपोषण करण्यात येणार असल्याचा ठरावही अधिवेशनात पारित करण्यात आला. सकल धनगर समाजाच्या वतीने गंज पेठेतील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनात विविध विषयांवर चर्चा होऊन ठराव पारित करण्यात आले.

### डेंग्यु, चिकनगुनिया, झिका रुग्ण वाढ रोखण्यासाठी

# विशेष तपासणी मोहीमेला प्रारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शहरात ताप, अंगदुखी, डोकेदुखीचे रुग्ण वाढले आहे. खासगी रुग्णालयात उपचारासाठी रुग्ण दाखल होत असले तरी, महापालिकेकडे डेंग्यू, चिकन गुनियाची लागण झालेल्या रुग्णांची नोंद कमी आहे. तर झिका या आजाराच्या पार्श्वभुमीवर आरोग्य विभागाने उपाय योजना राबविल्या आहेत.

पावसाळ्यात एडीज इजिप्ती या डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, डेंग्यु, चिकनगुनिया या आजाराची लागण वाढते. त्याच प्रमाणे वातावरणातील बदलामुळे होणारे सर्दी, खोकला, ताप या आजारांचे प्रमाणही वाढते. सध्या खासगी व सरकारी रुग्णालयात या आजाराचे रुग्ण वाढले आहे. महापालिकेने डासांपासून होणाऱ्या आणि पसरणाऱ्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाय योजना केली आहे. डासांची उत्पत्तीस्थळे शोधून ती नष्ट केली जात आहे. तसेच ज्या ठिकाणी आवश्यक अशा ठिकाणी धुर फवारणी केली जात आहे. डेंग्यू, चिकनगुनिया, झिका या आजारांचा संशयित रुग्ण आढळून आलेल्या भागांत विशेष तपासणी मोहीम राबविली जात आहे, अशी माहीती महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी सुर्यकांत देवकर यांनी दिली.

महापालिकेप्रमाणे खासगी रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढली असल्याबाबत डॉ. अविनाश भोंडवे यांच्याशी संपर्क साधला असता, ते म्हणाले " दरवर्षी प्रमाणे रुग्णांची संख्या या काळात वाढली आहे. तुलनेत डेंग्यु, चिकन गुनिया ची लागण झालेल्या रुग्णांची संख्या कमी आहे. झिका या नवीन आजाराबाबत विशेषत: गर्भवती महीलांनी काळजी घेणे अधिक गरजेचे आहे. उघड्यावरील खाद्य पदार्थ, थंड पेय - पदार्थ खाणे टाळावे, तेलकट पदार्थ खाणे टाळावे, दोन दिवसांपेक्षा जास्त काळ जर ताप, सर्दी, खोकला, अंगदुखी, डोकेदुखी असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेऊन पुढील उपचार करुन घ्यावेत. डासांपासून होणाऱ्या आजारांना प्रतिबंध करण्यासाठी योग्य ती काळजी घेतली पाहीजे."

**आकडेवारी काय सांगते ?**

- डेंग्युचे जुलै महीन्यात ६३६ संशयित रुग्ण आढळून आले होते, या महीन्यात पहील्या बारा दिवसांत २९६ संशयित रुग्ण आढळून आले. गेल्या महीन्यात ३४ तर या महीन्यात ६ जणांना डेंग्युची लागण झाल्याचे आढळून आले.
- चिकन गुनियाचे गेल्या महीन्यात २४ तर या महीन्यात पाच रुग्ण आढळून आले आहेत. तुलनेत मलेरियाचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही. तर झिकाचे ७५ रुग्ण आढळून आले आहेत.

## रेशनिंग वाटप होणार पारंपारिक पद्धतीने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** रेशन दुकानांमध्ये धान्य वितरणासाठी ई-पॉस प्रणाली वापरण्यात येते. हे ई-पॉस मिशन चालत नसल्याने संबंधित लाभार्थ्यांचा अंगठा घेत येत नाही, परिणामी धान्य देता येत नाही, असे दुकानदारांनी राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यावर जुलै महिन्यात पारंपरिक पद्धतीने धान्य वाटप करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली होती. दरम्यान, सर्व्हरमधील बिघाड अद्याप दुरुस्त झालेली नाही. त्यामुळे ऑगस्ट महिन्यातही धान्य वाटपात अडचणी येत आहे.

राज्य सरकारच्या अन्न, नागरी पुरवठा विभागाचे उपसचिव संतोष गायकवाड यांनी रेशन धान्य दुकानांमधून या महिन्यात देखील पारंपारिक (ऑफलाइन) पद्धतीने धान्य वितरण करण्यास मान्यता दिले असल्याची माहिती दिली आहे.

### मंगलाष्टका म्हणत उपायुक्तांच्या दालनातच लग्न

# मनसे स्टाईल खळ-खट्याक आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्ष नागरी प्रश्नावर आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. या नागरी प्रश्नांच्या माध्यमातून जनतेत जाण्याचा प्रयत्न नेतेमंडळी करत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून मनसेनेही उचल खाल्ली आहे. मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी थेट उपायुक्तांच्या दालनामध्ये जाऊन मंगलाष्टका म्हणत लग्न लावून अनोखे आंदोलन केले. आता मनसेकडून त्यांच्या स्टाईलने खळ्-खट्याक आंदोलन करण्यात येत आहे.

मनसेने पुण्यातील जागा लढवण्याचे स्पष्ट केले आहे. त्यासाठी पक्षातील पदाधिकारी कामाला लागले आहेत. मनसे पक्ष त्यांच्या विशिष्ट पद्धतीच्या आंदोलनामुळे सातत्याने चर्चेत राहिला आहे. या अनोख्या आंदोलनामुळे पुन्हा चर्चेला उधाण आले आहे.

शिवाजीनगर मतदारसंघातील पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक सात मधील सावित्रीबाई फुले सांस्कृतिक हॉल हा नागरिकांना विविध कार्यक्रमास उपलब्ध करून दिला जातो. आत्ता हा हॉल महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. या निर्णयाला मात्र स्थानिक नागरिकांकडून विरोध होत आहे. हा हॉल सर्वसामान्य लोकांसाठी विविध कार्यासाठी उपलब्ध करून देण्याचा आग्रह लोकांनी केला आहे.



> महापालिकेकडून शिवाजीनगर येथील या सांस्कृतिक भवनाचे रूपांतरण आरोग्य कोठडीत करण्याचा घाट घातला जात आहे. कोणाला तरी फायदा होण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. स्थानिक नागरिकांच्या दृष्टिकोनातून हा हॉल फार महत्त्वाचा आहे. या ठिकाणी लग्न, वाढदिवस, बारसे आदी कौटुंबिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. हा हॉल बंद झाल्यास नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे.
> — **रणजित शिरोळे**

#रा

## १५ ऑगस्ट निमित्ताने "मेरा उत्थान मुक्ती महोत्सव"



**पुणे :** "जीवनात ध्यानाचे झाड कसे लावायचे" त्याचबरोबर "मेरा उत्थान मुक्ती महोत्सवाचे आयोजन १५ ऑगस्ट रोजी दुपारी १.०० वाजता मनन आश्रम, सिंहगड रोड येथे आयोजन करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्रख्यात वक्ते सरश्री हे समस्येचे निराकरण, ज्ञानाचे फळ, एक उपाय ध्यान' अशा बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत. सदरील कार्यक्रम सर्वांसाठी खुला आणि पूर्णपणे विनाशुल्क आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निसर्ग हा आविष्कारांनी भरलेला आहे. हे आपल्या सर्वांना माहीत आहे. प्रत्येक नजरेत कितीतरी चमत्कार लपलेले आहेत! मानवाला निसर्गाशी योग्य समन्वय राखता आला, तर निसर्ग आपल्याला रोज आनंदी राहण्याची असंख्य कारणे आणि आठवणी देऊ शकतो. जरा तुमच्या आजूबाजूच्या सदाहरित फुलझाडांकडे बघा, ती देखील आपल्याला प्रत्येक परिस्थितीत फुलून आणि आनंदी राहायला शिकवत आहेत. पण मनाला प्रसंगात अडकायची सवय असते. मग असे काय घडू शकते जे आपल्याला प्रत्येक घटनेपासून त्वरित दूर करते आणि आपण आपल्या आनंदाकडे वळतो ? ती म्हणजे 'ध्यान' करण्याची सवय. हे सविस्तर जाणून घेण्यासाठी आणि प्रख्यात वक्ते सरश्री यांना ऐकण्याची सर्वांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

### बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांची दुरावस्था

# पालिकेचे डांबरीकरणाकडे दुर्लक्ष

**पुणे :** शहरातील मोठ्या रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याकडे महापालिकेच्या पथ वीभागाने लक्ष केंद्रीत केले असले तरी, बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांच्या दुरुस्तीकडे मात्र दुर्लक्ष झाल्याच्या तक्रारी वाढत आहे. तर क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे काम करण्यासाठी डांबर पुरवठा केला जात असल्याचा दावा पथ विभागाने केला आहे.

शहरातील बारा मीटरपर्यंत रुंदीच्या रस्त्यांचे काम हे संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत केले जाते. तर बारा मीटर पेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांचे काम हे मुख्य खाते म्हणजेच पथ विभागामार्फत केले जाते. गेल्या महीन्यात झालेल्या जोरदार पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले. तसेच शहरात विविध ठिकाणी महावितरण, एमएनजीएल, चोवीस तास पाणी पुरवठा योजना, नव्याने ड्रेनेज लाईन टाकणे आदी कामांसाठी रस्त्यांची खोदाई मोठ्या प्रमाणावर केली गेली. परंतु या रस्त्यांची डागडुजी योग्य पद्धतीने केली नसल्याने अशा



ठिकाणी खड्डे पडण्याचे प्रमाण अधिक आहे. खड्डयांमुळे हैराण झालेल्या पुणेकरांच्या तक्रारीची दखल केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना घ्यावी लागली. त्यांनी आदेश दिल्यानंतर खड्डे बुजविण्याची मोहीम जोरात राबविली जात आहे. आत्तापर्यंत दोन हजाराहून अधिक खड्डे बुजविले गेल्याचा दावा महापालिकेच्या पथ विभागाने केला आहे. पथ विभागाने प्रामुख्याने त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या बारा मीटर पेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांच्या दुरुस्तीकडे लक्ष केंद्रीत केले आहे, परंतु बारा मीटरपर्यंत रुंदीच्या रस्त्यांवर तुलनेत कमी काम झाले आहे.

- शहरात बारा मीटर पेक्षा अधिक रुंदीच्या तुलनेत बारा मीटरपर्यंत रुंदी असणाऱ्या रस्त्यांची संख्या व एकुण लांबी अधिक आहे. परंतु या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी तुलनेत क्षेत्रीय कार्यालयास कमी तरतुद उपलब्ध करून दिली जाते. नगरसेवकांनी सुचविलेल्या कामातून या रस्त्यांचे डांबरीकरण केले जाते. परंतु गेल्या दोन वर्ष लोकप्रतिनिधी नसल्याने या रस्त्यांच्या डांबरीकरणाकडे दुर्लक्ष झाले आहे.

> बारा मीटरपर्यंत रुंदीचे रस्ते जरी क्षेत्रीय कार्यालयाच्या येत असले तरी, मुख्य खात्याने शहराच्या मध्यवर्ती भागातील अनेक रस्त्यांवरील खड्डे बुजविले आहे. तसेच प्रत्येक्ष क्षेत्रीय कार्यालयास पावसाने उघडीप दिल्यानंतर डांबर उपलब्ध करून दिले जात आहे. पुढील काळात प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाकडून खड्डे बुजविले गेल्याचा अहवाल मागविला जाईल. तसेच समाविष्ट गावांतील रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांची दुरुस्ती करण्यासाठी मुरुम उपलब्ध करून दिला जात आहे. त्यानुसार ती कामे सुरु आहेत."
>
> **— अनिरुद्ध पावसकर**
> महापालिका पथ विभाग प्रमुख

# सिंहगड रोड उड्डाणपूल अडकला राजकीय फितीत?

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल चौकातील उड्डाणपुलावर डांबराचा शेवटचा थर मारल्यानंतर येथे आता वाहतूक खुली करता येणार आहे.१६ ऑगस्ट रोजी उड्डाणपूल खुला होण्याची शक्यता वर्तवली जात असून, नागरिकांना विनाकारण कोंडीत अडविले जात आहे. सिंहगड रोड पूल तयार होवून ही राजकीय फितीत अडकल्याची चर्चा आहे.

सिंहगड रस्त्यावर सप्टेंबर २०२१ पासून उड्डाणपूल उभारण्याचे काम सुरु आहे. त्यातील एक भाग असलेला राजाराम पूल चौकातील उड्डाणपूल जुलै महिन्यातच बांधून तयार झाला आहे. पण पावसामुळे डांबराचा शेवटचा ५० मिमीचा थर मारता आलेला नव्हता. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी खुला केला नाही.

पाऊस थांबल्यानंतर डांबराचा प्लांट बंद आहे, खडी ओली आहे असे कारणे देत एका आठवड्यानंतर शनिवारी उड्डाणपुलावर डांबरीकरण करण्यात आले,



दोन दिवसानंतर येथून वाहतूक खुली करता येऊ शकते असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते.

चौकट - श्रेयासाठी राजकारण सुरू

उड्डाण पुलावरील रंगकाम, रस्त्यावर पांढरे पट्टे मारणे, दुभाजक रंगविणे, दिशादर्शक फलक लावणे ही उर्वरित काम करण्यात आली आहे. वाहतूक खुली करण्यास हरकत नसली तरी भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्घाटन करून हा उड्डाणपूल खुला केला जाणार आहे. पण फडणवीस यांच्याकडूनही गेल्या आठवड्याभरात वेळ देण्यात आलेली नाही.तसेच केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे १६ ऑगस्टरोजी पुणे दौऱ्यावर आहेत, त्यादिवशी मोहोळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्याचाही प्रयत्न आहे. पण अजून ती वेळ देखील निश्चित झालेली नाही. दरम्यान, उड्डाणपूल खुला करणे हा पूर्णपणे राजकीय विषय झाल्याने त्यावर अधिकाऱ्यांनी बोलण्यास नकार दिला. यासंदर्भात आमदार माधुरी मिसाळ यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण संपर्क होऊ शकला नाही.

## दुकानांवरील जाहिरातीचे बोर्ड, होर्डिंगसाठी वाढीव शुल्कास विरोध

**पुणे :** दुकानांवर जाहिरातीचे बोर्ड, होर्डिंगसाठी आकारण्यात येणारे शुल्क महापालिकेने प्रतिचौरस फूट १११ रुपयांवरून थेट ५८० रुपये इतका वाढवले आहे. यास व्यापाऱ्यांनी विरोध केला आहे. जे होर्डिंगधारक न्यायालयात गेले, त्यांच्याकडून प्रतिचौरस फूट १११ रुपयेप्रमाणे शुल्क आकारण्यात येते. मात्र, जे न्यायालयात गेले नाहीत त्यांच्याकडून ३१ मार्चपासून २२२ रुपयांप्रमाणे कर आकारला जात आहे. सन २०२४-२५ या वर्षाचे शुल्क भरण्यास व्यापारी गेले असता, संबंधित अधिकारी ५८० रुपये दर आकारात आहेत. याबाबत धोरण ठरविण्यासाठी १४ ऑगस्ट रोजी व्यापाऱ्यांची बैठक बोलाविली आहे, असे पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका आणि सचिव महेंद्र पितळीया यांनी सांगितले.

व्यापाऱ्यांनी मनपाचे तत्कालीन आयुक्त विक्रम कुमार व सध्याचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले तसेच अतिक्रमण नियंत्रण विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांना वेळोवेळी लेखी निवेदन देत प्रति चौरस फुटास २२२ रुपये कर आकारण्याची मागणी केली. परंतु प्रत्येक वेळी बैठक बोलावण्याचे केवळ आश्वासनच देण्यात आल्याचा आरोप या वेळी करण्यात आला.

> राज्य सरकारच्या धोरणानुसार बहुतांशी दुकानदारांनी मराठीत नामफलक लावले. जीएसटी नंबर लिहिण्याचे सक्तीचे असल्याने आम्ही ते देखील नाम फलकात समाविष्ट केले. परंतु शासनाने नामफलकाची उंची ३ फूट मर्यादित केली आहे. यावर दुकानाएवढी लांबी ठेवल्याने दुकानदाराला अडचण येत आहे. नामफलकाची उंची वाढत असल्याने वाढीव फलकाच्या क्षेत्रफळाला ५८० रुपये प्रमाणे मागणी केली जात आहे.
>
> **-फत्तेचंद रांका,**
> व्यापारी महासंघाचे अध्यक्ष

## अवतीभवती
CITY UPDATE

### पालिकेद्वारे पूरभागात सर्वेक्षण

**पुणे :** सिंहगड रस्ता परिसरात निळ्या पूररेषेत असलेल्या पूरग्रस्त घरांचे महापालिकेकडून सर्वेक्षण सुरु करण्यात आलं आहे. नागरिकांचे पुनर्वसन किवा ही पूरस्थिती कायमची रोखण्यासाठी तत्काळ प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महापालिका प्रशासनास दिल्या होत्या. त्यानुसार, पालिकेकडून या भागातील घरांचे आणि व्यावसायिक मिळकतींचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यासाठी, बांधकाम विभागाकडून पथके नेमण्यात आली आहेत. पुढील आठ ते दहा दिवसांत हे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे.

### आझम कॅम्पसमध्ये उलगडणार भारतातील सांस्कृतिक वैविध्य

**पुणे :** महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटी आझम कॅम्पस येथे स्वातंत्र्य दिनी, १५ ऑगस्ट रोजी संस्थेचे अध्यक्ष तसेच 'डॉ.पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटी'चे कुलपती डॉ.पी.ए.इनामदार यांच्या हस्ते फंक्शन ग्राउंड येथे सकाळी ८.३० वाजता ध्वजारोहण करण्यात येणार आहे. त्यानंतर 'युनिटी इन डायव्हर्सिटी' संकल्पनेवर आधारित विशेष सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थी सादर करणार आहेत. भारतातील समृद्ध सांस्कृतिक वैविध्य या सांस्कृतिक कार्यक्रमातुन उलगडून दाखविण्यात येणार आहे. त्यात ६ विद्यालयांचे १४२ विद्यार्थी सहभागी होतील. कार्यक्रमाच्या शेवटी 'मिले सूर मेरा तुम्हारा' गीतावरील सादरीकरणात उपस्थित सर्व सहभागी होणार आहेत. असेम्ब्ली हॉल येथे हा कार्यक्रम सकाळी नऊ वाजता सादर करणार आहेत. संस्थेचे सचिव प्रा.इरफान शेख यांनी ही माहिती दिली.

### स्वरक्षणाचे धडे देणाऱ्या प्रशिक्षकांना आता तीन ऐवजी सहा हजार मानधन

**पुणे :** आता विद्यार्थिनींना स्वरक्षणाचे धडे देणाऱ्या प्रशिक्षकांना तीन हजार ऐवजी सहा हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना स्वरक्षणाचे धडे देणाऱ्या प्रशिक्षकांच्या मानधनात दुप्पटीने वाढ करण्याचा निर्णय महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. शहरात महिलांच्या छेडछाडीचे प्रकार वाढत असल्याने महिलांना स्वतःचे संरक्षण करता यावे यासाठी पालिकेने मनपा शाळेतील इयत्ता ८ वी ते १०तील विद्यार्थिनींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासाठी समाज विकास विभागाच्या माध्यमातून प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी दरवर्षी जाहिरात प्रसिद्ध करून या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, वैयक्तिक प्रशिक्षकांकडून अर्ज मागविण्यात येतात. अर्जाची छाननी करून योग्य प्रशिक्षकांना नियुक्ती केली जाते.

### बोट, बाईक व ५ जी तंत्रज्ञानयुक्त रुग्णवाहिकांची नागरिकांना प्रतीक्षा

# १०८ रुग्णवाहिकेच्या निविदेची वर्क ऑर्डर निघाली

**पुणे :** राज्यात १०८ रुग्णवाहिकांच्या संख्यते वाढ करण्याची मागणी सातत्याने होत होती. नागरिकांची मागणी लक्षात घेता, राज्य शासनाच्या वतीने सदर निविदेची वर्क ऑर्डर नुकतीच काढली आहे. परंतू मंत्रिमंडळ मंजुरीचा निर्णय मात्र प्रलंबित ठेवला आहे. नवीन निविदेनुसार बोट, बाईक व ५ जी तंत्रज्ञानयुक्त रुग्णवाहिका नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहेत. नवजात शिशूंसाठी वेगळी रुग्णवाहिका नव्या निविदेत असणार आहे. निविदेसंदर्भात अंतिम निर्णय मुख्यमंत्री घेतील असा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. तरी देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीव्हीजी व सुमित फॅसिलिटी यांची निविदा थांबवली असल्याचा खोडसाळ प्रचार करण्यात आला.

निविदेला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर राज्यात सुसज्ज अत्याधुनिक आपत्कालीन कक्ष उभारण्यास चालना मिळणार आहे. त्याचबरोबर डॉक्टर, इंजिनियर व पॅरामेडिकल स्टाफ असे एकूण १२,००० रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. अगामी काळात बीव्हीजी व सुमित फॅसिलीटी लिमिटेड यांच्या वतीने राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा देण्यात येणार आहे.

नवीन निविदेनुसार १७५६ रुग्णवाहिका राज्याच्या विविध भागात सेवा देणार आहे. यात अॅडव्हान्स लाईफ सपोर्ट (ए.एल.एस) व बेसिक लाईफ सपोर्ट (बी.एल.एस) या रुग्णवाहिकांचा समावेश आहे. आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेत बोट रुग्णवाहिकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. समुद्रतट व धरणाच्या पाणलोट क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना बोट रुग्णवाहिकांचा लाभ घेता येणार आहे. अलिबाग परिसरातील रुग्णांना महामार्गाने मुंबईला जाण्यासाठी ५ ते ६ तासाचा अवधी लागतो. बोट रुग्णवाहिकेमुळे अलिबागकरांना अवघ्या ३० मिनिटात मुंबईतील अद्यावत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची सुविधा मिळणार आहे. मुंबई शहरातील धारावी, विदर्भातील मेळघाट, चिखलदरा या भागात रुग्णवाहिका पोहचत नाही. या ठिकाणी बाईक रुग्णवाहिकेद्वारे आपत्कालीन सेवा देण्यात येणार आहे.

आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेत नव्या निविदेनुसार ५ जी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला.



**सद्यस्थितीत रुग्णवाहिकांची संख्या**

- अॅडव्हान्स लाईफ सपोर्ट ........ २३३
- बेसिक लाईफ सपोर्ट ........ ७०४
- बाईक अॅंब्युलंन्स ........ ३३

**नव्याने वाढणाऱ्या रुग्णवाहिका**

- अॅडव्हान्स लाईफ सपोर्ट ........ २५५
- बेसिक लाईफ सपोर्ट ........ १२७४
- बाईक अॅंब्युलंन्स ........ १९६
- नवजात शिशुंसाठी रुग्णवाहिका ........ २५
- बोट अॅंब्युलन्स ........ ३६

**पुरस्कार**

- राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा सुरु झाल्यानंतर काही दिवसातच प्रतिष्ठेचा स्कॉच पुरस्कार बीव्हीजी संस्थेला मिळाला होता. त्याचबरोबर जगप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठात १०८ रुग्णवाहिका सेवेचा पेपर प्रसिद्ध करण्यात आला होता. नेचर विद्यापीठाने देखिल आपत्कालीन वैद्यकीय सेवेला सन्मानित केले आहे.

### लोणचे उत्पादकांची लिंबू खरेदीकडे पाठ

# पावसाळ्यातही लिंबाला चढे भाव



**पुणे :** दरवर्षी पावसाळ्यात लोणचे उत्पादक लिंबाची खरेदी करतात. मात्र, यंदा पावसाळ्यातही लिंबाला चढे भाव मिळत आहेत. त्यामुळे लोणचे उत्पादकानी लिंबू खरेदीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येत आहे. मागील काही दिवसांत जिल्ह्यासह विभागात पावसाने जोरदार हजेरी लावली होती. त्यामुळे लिंबाचे नुकसान झाले आहे. परिणामी नेहमीच्या तुलनेत लिंबाची निम्मीच आवक होत आहे. भाव मात्र दुप्पट आहेत. उन्हाळ्यामध्ये लिंबाला मागणी असते. त्यामुळे अर्थातच लिंबाचे भाव जास्त असतात. पाऊस सुरू झाल्यानंतर मागणी कमी होते. दरवर्षी साधारणपणे जून ते ऑगस्ट या कालावधीत लिंबाला कमी मागणी असते. परिणामी भाव उतरतात. नेमकी याच वेळी लोणचे उत्पादकांकडून लिंबाची खरेदी होते.

मात्र, यंदा आवक कमी असल्याने नेहमीच्या तुलनेत जास्त भाव मिळत आहे. सरासरी १० ते २० रुपये किलोला भाव मिळणाऱ्या लिंबाला आता ४० ते ६० रुपये भाव मिळत असल्याचे लिंबाचे व्यापारी रोहन उरसळ यांनी सांगितले. परिणामी, लोणचे उत्पादकांनी खरेदीकडे पाठ फिरविली आहे.

मार्केट यार्डातील बाजारात सोलापूर, करमाळा भागांतून आणि नगर जिल्ह्यातील राशिन येथून लिंबाची आवक होत आहे. दररोज दीड हजार गोणी आवक होत आहे. एका गोणीमध्ये ४०० ते ५०० लिंबु असतात. ही आवक नेहमीच्या तुलनेत निम्मीच आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यातही लिंबाला जास्त दर मिळत आहे. दर्जानुसार घाऊक बाजारात गोणीला ५०० ते १२०० रुपये इतका भाव मिळाला आहे.

यंदा पावसाळ्यातही लिंबाला चांगली मागणी आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत गोणीमागे २०० ते ३०० रुपयांनी वाढ झाली आहे. परिणामी, लोणचे उत्पादकांनी खरेदीकडे पाठ फिरविली आहे. मात्र, चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी समाधानी आहेत. – रोहन जाधव, लिंबाचे व्यापारी, मार्केट यार्ड.

### 'गोरान ग्रॉसकॉफ फॅमिली क्लिनिक'चा १३ चा वर्धापनदिन संपन्न

# जोडीदाराला खंबीरपणे साथ द्या : पद्मश्री लीला पूनावाला

**पुणे :** फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया अंतर्गत असलेल्या पुण्यातील प्रतिष्ठित गोरान ग्रॅसकोफ फॅमिली क्लिनिक या संस्थेचा १३ वा वर्धापन दिवस नुकताच उत्साहात पार पडला. या निमित्त संस्थेच्या चांदणी चौक येथील वेद भवनजवळील बिरगीट्टा ग्रॅसकॉफ सभागृह येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पद्मश्री लीला पूनावाला या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या, तर अभिनेत्री गौतमी देशपांडे यांची कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती. त्याचबरोबर संस्थेच्या अध्यक्षा फ्रेनी तारापोर, उपाध्यक्षा गीतांजली देशपांडे, प्रकल्प व्यवस्थापक अर्चना ससाणे हे देखील उपस्थित होते.

नवीन पिढीकडे आता पर्याय आहे, की वयाच्या कोणत्याही टप्प्यावर करिअरसाठी नवीन प्रयोग करू शकते. कोणत्याही गोष्टीसाठी कधीही वेळ निघून गेलेली नसते. वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर करीअरच्या वेगळ्या वाटा निवडत पुढे वाटचाल करणारे अनेक यशस्वी उदाहरणे आज आपल्या बाजूला आहेत. आपल्याला असलेल्या समस्या, आपले विचार, याबाबत आताच्या पिढीने आपल्या आई वडिलांसोबत संवाद साधणे देखील आवश्यक आहे, असे मत गौतमी देशपांडेने व्यक्त केले.

कार्यक्रमात डॉ. वैशाली देशमुख यांनी ' क्या यही प्यार है ' या विषयावर मार्गदर्शन केले. मिलिंद देशपांडे यांनी 'भटकंती आणि व्यक्तिमत्त्वविकास' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. फ्रेनी तारापोर यांनी यावेळी 'अनुभवाचे बोल' द्वारे त्यांच्या अनुभवाचे कथन केले तर उपाध्यक्षा गीतांजली देशपांडे या संस्थेच्या वाटचालीबाबत माहिती दिली.






> तरुण वयात प्रेमात पडणे ही एक स्वाभाविक बाब आहे. काहीवेळा त्यामध्ये यश मिळते तर काही वेळा अपयश देखील सहन करावे लागते. तरुणांनो आपल्या जोडीदाराला खंबीरपणे साथ द्या. विशेषत: मुलांनी याबाबत अधिक जबाबदार असणे आवश्यक आहे.आपल्या जोडीदाराला तिच्या करिअरमध्ये, घरातील कामांमध्ये अथवा आयुष्यातील कोणतेही महत्त्वाचे निर्णय, घटना यामध्ये मुलांनी नेहमीच साथ दिली पाहिजे. त्याच बरोबर मुलींनीही करिअर सोबतच आपल्या कुटुंबाचीदेखील काळजी घेतली पाहिजे. परस्पर सहकार्याने आनंदी जीवन जगणे शक्य होते, ही बाब तरुणाईने लक्षात घेतली पाहिजे." **— पद्मश्री लीला पूनावाला**

# काश्मीरमध्ये नवा डाव

मोदी सरकारने आपल्या दुसऱ्या टर्मची सुरुवात केल्यानंतर तीन महिन्यांतच जम्मू-काश्मीरच्या विभाजनाचा निर्णय घेत आणि कलम ३७० व कलम ३५ अ रद्द करत एक मास्टरस्ट्रोक लगावला होता. या निर्णयाला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली. हा निर्णय घेतल्यानंतर केंद्र सरकारने लडाखला केंद्रशासित प्रदेश घोषित करत काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली. गेल्या पाच वर्षांपासून तेथे राज्यपालांच्या मार्फत केंद्राचे सरकार कार्यान्वित आहे. या राज्यात विधानसभा निवडणुका लवकरात लवकर घेण्यात याव्यात अशी मागणी सातत्याने होत आहे. लोकसभा निवडणुकांबरोबर येथील निवडणुका होतील अशी अपेक्षा होती; पण केंद्राने तसे करणे टाळले. निवडणुक घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने ३० सप्टेंबरची कालमर्यादा निश्चित केली आहे. आता जम्मू काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजत आहेत. यादरम्यान भाजपने एक मोठा डाव खेळला आहे. तो म्हणजे पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांना 'लँड राइट' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे निर्वासितांच्या गोटात आनंदाचे वातावरण आहे आणि दुसरीकडे भाजपला याचा राजकीय लाभही मिळणार आहे. हा निर्णय गेमचेंजर ठरेल, अशी भाजपची धारणा आहे; पण या निर्णयाची खरी सत्त्वपरीक्षा निवडणुकीतच पहावयास मिळणार आहे.जम्मू काश्मीरच्या प्रशासकीय परिषदेने पश्चिम पाकिस्तानातील निर्वासित आणि १९६५ च्या निर्वासितांना मालकी हक्क देण्याचा निर्णय घेतला. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अध्यक्षेतेखाली झालेल्यां प्रशासकीय परिषदेच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. सरकारने पश्चिम पाकिस्तानातील निर्वासितांच्या कुटुंबांच्या बाजूने भूमिका घेत जमिनीवर मालकी अधिकार देत त्यांच्या मनात असणारी भेदभावाची भावना संपुष्टात आणली. या आधारावर जम्मू भागातील हजारो कुटुंबांना बऱ्यापैकी आर्थिकदृष्ट्या सक्षम करता येऊ शकेल असे केंद्राचे म्हणणे आहे. २०१९ च्या पुनर्रचनेनुसार केंद्राने पश्चिम पाकिस्तानातील निर्वासितांना राहण्याचा अधिकार प्रदान केला आहे. पश्चिम पाकिस्तानच्या निर्वासितांना राज्याच्या जमीनीवर मालकी अधिकार प्रदान केल्याने ते आता 'पीओजेके' निर्वासितांच्या समकक्ष येतील आणि त्यांची मुलभूत हक्काबाबतची दीर्घकाळापासून असणारी मागणी देखील पूर्ण होईल.प्रशासकीय परिषदेने १९६५ मध्ये निर्वासितांना राज्यातील जमिनीबाबत मालकी हक्क देण्यास मंजुरी दिली होती. तत्पूर्वी १९४७ च्या फाळणीनंतर काश्मीरमध्ये आलेल्या पश्चिम पाकिस्तानच्या निर्वासित कुटुंबांना राज्याचे नागरिकत्व दिले गेले नव्हते. हा मुद्दा केंद्राच्या कोर्टात टोलविला होता. परिणामी त्यांना निवडणुकीत मतदानाचा कोणताही अधिकार नव्हता. पण ५ ऑगस्ट २०१९ मध्ये कलम ३७० हटविल्यानंतर भारत सरकारने नागरिकत्वाचा दर्जा आणि मतदानाचा अधिकार दिला. याउलट १९६५ मध्ये युद्धात छम्ब येथील निर्वासित लोक जम्मू काश्मीरचे स्थायी रहिवासी म्हणून ओळखले जात होते आणि त्यांना जमीन खरेदी करण्याचा, ठेवण्याचा, सरकारी नोकरी करण्याचा आणि निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार होता. दुसरीकडे, पंतप्रधान विकास पॅकेज-२०१५ आणि पंतप्रधान पुनर्निर्माण योजना-२००८ अंतर्गत मंजूर झालेल्या ६,००० सरकारी नोकऱ्यांपैकी ५७२४ वर काश्मिरी स्थलांतरितांची नियुक्ती करण्यात आली आहे. बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार योजनेंतर्गत आर्थिक मदत मिळण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली जात आहे.

जम्मू काश्मीरमध्ये विधानसभा तत्पूर्वी सरकारने घेतलेला निर्णय हा राजकीय डावपेचाचा भाग असल्याचे मानले जात आहे. तसेच लोकसभा निवडणुकीत जम्मू आणि उधमपूर या दोन्ही मतदारसंघात हिंदूबहुल भागात सत्तारुढ भाजपच्या मतांच्या टक्केवारीत झालेली घट विचारात घेऊन सरकारने हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे. अर्थात भाजपने सलग तिसऱ्यांदा जम्मू आणि उधमपूर मतदारसंघात विजय नोंदविला. परंतु या जागावरील मतांची टक्केवारी २०१९ च्या तुलनेत २०२४ मध्यें अनुक्रमे ४.६ अणि १०.१ टक्के एवढी घसरली आहे. अर्थातच ३० सप्टेंबरच्या अगोदर जम्मू काश्मीरमधील निवडणूक घेणे भाजपसाठी सोपे नाही. कारण विविध कारणे आणि स्थानिक मुद्दे देखील पाहणे महत्त्वाचे आहे. विधानसभा निवडणुकीतील आव्हाने कमी करण्यासाठी सरकारने 'डब्लूपीआर'च्या (वेस्ट पाकिस्तानी रिफ्यूजी) सुमारे ३० हजार कुटुंबांना आणि १९६५ च्या निर्वासितांना लाभ देत थेट ही मते आपल्या पारड्यात ओढण्याचा प्रयत्न केला आहे. जम्मू काश्मीरचे स्थानिक राजकारण आणि पाकिस्तानच्या कुरापती पाहता भाजप विधानसभा निवडणुकीत पश्चिम पाकिस्तानी निर्वासितांच्या बळावर आपला विजय नोंदवेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. लडाखला वेगळा केंद्रशासित प्रदेश बनवल्यानंतर जम्मू-काश्मीर विधानसभेच्या एकूण ८३ जागा शिल्लक राहिल्या. परिसीमनानंतर ७ जागा वाढल्या आहेत. यानंतर एकूण जागांची संख्या ९० झाली आहे. यामध्ये जम्मूमध्ये ४३ आणि काश्मीरमध्ये ४७ विधानसभा मतदारसंघ निर्माण करण्यात आले आहेत. ९ जागा अनुसूचित जमातीसाठी (एसटी) राखीव आहेत. या परिसीमनाचेही परिणाम येत्या विधानसभा निवडणुकांमध्ये दिसून येणार आहेत. त्यामुळे काश्मीरमधील यंदाची निवडणूक ही लक्षवेधी ठरणार आहे.

**सध्या सोशल मीडियाच्या दुनियेत ज्याप्रमाणे फेक न्यूज हा अपप्रकार धुमाकूळ घालत आहे, तसाच जाहिरातींच्या क्षेत्रातही खोटी, दिशाभूल करणारी माहिती पसरवण्याचा उद्योगही जोरात सुरू आहे. भ्रामक माहिती, अतिशयोक्तीपूर्ण दावे करून ग्राहकांचे शोषण करणाऱ्या अशा जाहिरातींना लगाम घालण्यासाठी केंद्र सरकारचे ग्राहक मंत्रालय लवकरच एक पोर्टल तयार करणार आहे. यावर ग्राहकांना अशा जाहिरातींविरोधात तक्रार करता येणे शक्य होणार आहे. परंतु या तक्रारींचे लवकरात लवकर निराकरण होणे आणि संबंधितांवर कारवाईन हो गरजेचे आहे. तसेच या पोर्टलविषयीची माहिती ग्राहकांना करुन देणे आवश्यक आहे. ग्राहकांनीही याबाबत सजगता दाखवल्यास या धूर्तपणाल लगाम लावता येणे शक्य होईल.**

# भ्रामक जाहिरातींना लगाम बसेल?

पासष्ठावी कला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जाहिरातींचे उत्पादनांच्या विक्री व विपणनामध्ये मोठे योगदान असते. विशेषतः स्पर्धात्मक युगामध्ये जाहिरातींशिवाय उत्पादनांच्या विक्रीला चालना मिळणे अशक्य होऊन बसते. नव्वदीच्या दशकामध्ये आलेल्या जागतिकीकरणानंतर स्पर्धेचे अवकाश शतपटींनी विस्तारले. पूर्वी स्थानिक पातळीवर असणारी स्पर्धा प्रादेशिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय अशी करत करत थेट जागतिक बनली. कालोघात या स्पर्धेने गळेकापू स्वरुप घेतले. अशा काळात जाहिरातींचे महत्त्व आणखी वाढत गेले.

जाहिरातींचा जनमानसावर पडणारा प्रभाव हा व्यापक असतो. किंबहुना काही जाहिरातींनी तर ग्राहकांच्या मनावर पगडा निर्माण केल्याची उदाहरणे आहेत. जाहिरातींमध्ये सुरुवातीच्या काळात वृत्तपत्रीय जाहिरातींचे महत्त्व मोठे होते. १९६७ मध्ये रेडिओचे व्यावसायिकरण झाले आणि रेडिओवरील जाहिराती लोकप्रिय होत गेल्या. नंतरच्या काळात दूरचित्रवाणीचा उदय झाला आणि टीव्हीवरील दृक-श्राव्य जाहिरातींनी या क्षेत्राला नवा आयाम मिळाला. मुद्रण क्षेत्रातील क्रांतीमुळे डिजिटल प्रिंटिंगचा जमाना आला आणि महानगरांमध्ये मोठमोठाले होर्डिंग्ज उभे करुन जाहिराती केल्या जाऊ लागल्या. माहिती-तंत्रज्ञानाचे युग अवतरल्यानंतर डिजिटल ॲडव्हरटायजिंगचे दालन खुले झाले.

**सूर्यकांत पाठक**

भारतात पहिली जाहिरात एजन्सी १९०५ मध्ये श्री. बी. दत्ताराम यांनी १९०५ च्या सुमारास मुंबईत स्थापन केल्याचे मानले जाते. तथापि, आंतरराष्ट्रीय जाहिरात संस्थांशी खऱ्या अर्थाने स्पर्धा करु शकणारी एजन्सी स्थापन करण्याचे श्रेय जे. वॉल्टर थॉमसन यांना जाते. बदलत्या काळात भारतीय कंपन्यांनी जाहिरातींची ताकद ओळखून विक्री वाढवण्यासाठी आणि त्यांचे ब्रँड मूल्य वाढवण्यासाठी ॲड एजन्सी नियुक्त केल्या. टीव्ही, रेडिओ आणि वृत्तपत्रे या तिन्ही माध्यमातून जाहिरातींद्वारे आपल्या उत्पादनांच्या विक्रीला चालना देण्याचे जोरदार प्रयत्न सुरू झाले.

गेल्या २०-२५ वर्षांमध्ये वाहिन्यांचे युग आल्यानंतर जाहिरातींचा भडीमार सुरू झाला. मनोरंजन वाहिन्यांवरील मालिकांमधील जाहिराती या घराघरांमध्ये पाहिल्या जाऊ लागल्या. वृत्तपत्रीय जाहिरातींचीही रचना, परिमाणे आणि सादरीकरण यामध्ये पूर्वीच्या तुलनेत आमूलाग्र बदल झाले. डिजिटल माध्यमांचे व्यासपीठ तर जाहिरातींनी नेहमीच बहरलेले दिसते. जाहिरात क्षेत्राचा हा प्रवास अर्थकारणालाही बळकटी देणारा ठरला. यातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती तर झालीच; पण प्रतिभेलाही विलक्षण चालना मिळाली.

हा सर्व प्रवास रंजक असला तरी अलीकडील काळात यामध्ये काही नकारात्मक घटनाही घडताना दिसू लागल्या. विशेषतः जाहिरातींच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती पसरवण्याची एक लाटच सध्या आलेली दिसत आहे. वर्षानुवर्षाच्या परंपरेमुळे जाहिरातींना विश्वासार्हता लाभल्यामुळे त्यातील आशय हा चुकीचा असू शकतो, याबाबत आजही असंख्य ग्राहक अनभिज्ञ असतात. याचा गैरफायदा घेत काही धूर्त मंडळी भ्रामक जाहिरातींच्या माध्यमातून आपला आर्थिक स्वार्थ साधून घेताना दिसून येतात. याची दखल घेत केंद्र सरकारने २०२२ मध्ये ग्राहकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने भ्रामक जाहिरातींना प्रतिबंध करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे लागू केली. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना प्रतिबंध करणे आणि अशा जाहिरातींद्वारे शोषण झालेल्या किंवा प्रभावित झालेल्या ग्राहकांचे संरक्षण करणे हा यामागचा उद्देश होता. ही मार्गदर्शक तत्त्वे निराधार दावे, अतिशयोक्तीपूर्ण आश्वासने, चुकीची माहिती आणि खोटे दावे करून ग्राहकांना फसवले जाणार नाही याची हमी देण्यासाठी लागू करण्यात आली. दिशाभूल करणाऱ्या किंवा भ्रामक जाहिराती या ग्राहकांच्या विविध अधिकारांचे उल्लंघन करतात. यामध्ये माहिती मिळण्याचा अधिकार, निवडीचा अधिकार आणि संभाव्य असुरक्षित उत्पादने आणि सेवांपासून संरक्षित करण्याचा अधिकार यांचा समावेश होतो. ग्राहक व्यवहार विभागांतर्गत केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने याची दखल घेत या मार्गदर्शक सूचना लागू केल्या. या प्राधिकरणाची स्थापना ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ च्या कलम १० अंतर्गत ग्राहक हक्कांचे उल्लंघन, अनुचित व्यापार पद्धती आणि ग्राहकांच्या हिताला बाधक असलेल्या




खोट्या किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींशी संबंधित बाबींचे नियमन करण्यासाठी आली. जाहिरातींमधील माहिती-दाव्यांमध्ये अधिक पारदर्शकता आणि स्पष्टता आणून ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे, ग्राहकांना चुकीचे वर्णन आणि अतिशयोक्ती करण्याऐवजी तथ्यांवर आधारित माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करणे हा यामागचा उद्देश होता. या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याबद्दल दंड देखील स्पष्टपणे नमूद केला आहे. त्यानुसार, कोणत्याही दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींसाठी उत्पादक, जाहिरातदार आणि अनुमोदकांना १० लाख रुपयांपर्यंत दंड केला जाऊ शकतो तसेच वारंवार उल्लंघन झाल्यास, दंडाची रक्कम ५० लाख रुपयांपर्यंत असू शकते. प्राधिकरण दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीच्या प्रवर्तकाला १ वर्षापर्यंत कोणतीही प्रसिद्ध करण्यापासून प्रतिबंधित करू शकते आणि त्यानंतरच्या उल्लंघनासाठी प्रतिबंधाचा कालावधी ३ वर्षांपर्यंत वाढविला जाऊ शकतो.

असे असूनही आज या सर्वांना बगल देत मोठ्या प्रमाणावर भ्रामक जाहिरातींचे पेव फुटलेले दिसते. त्यामुळेच केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाने याबाबत एक पोर्टल सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या पोर्टलवर अशा प्रकारची खोटी माहिती पसरवणाऱ्या जाहिरातींची तक्रार करता येणे सोपे होणार आहे. मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने खोट्या जाहिरातींविरोधात तक्रार करण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबाबत सरकारने विचार करावा, असे निर्देश दिले होते. त्यानुसार हे नवीन पोर्टल सुरू करण्यात येणार आहे.

वास्तविक, यासाठी ग्रेव्हियन्स अगेंस्ट मिसलिडिंग ॲड अर्थात गामा नावाचे एक पोर्टल सुरु करण्यात आले होते; परंतु गेल्या दोन वर्षांपासून ते बंद आहे. आताही या नवीन पोर्टलबाबत नेमकेपणाने माहिती समोर आलेली नाही. परंतु ते लवकरात लवकर सुरू होणे गरजेचे आहे तसेच सुरू झाल्यानंतर यावर येणाऱ्या तक्रारींचे निराकरणही जलद गतीने होणे आवश्यक आहे. यासंदर्भात आयओर्स हे सायबर गुन्ह्यांसंदर्भातील पोर्टल जसे उपयुक्त ठरले आहे, त्याचा आदर्श ठेवला गेला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे याबाबत ग्राहकांना माहिती होण्यासाठी त्याचा अधिकाधिक प्रसार झाला पाहिजे. यासाठी वृत्तपत्रांमध्ये, टीव्ही वाहिन्यांवर जाहिरात देऊन ग्राहकांना याची कल्पना दिली गेली पाहिजे. अलीकडील काळात आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढल्याचे लक्षात आल्यानंतर रिझर्व्ह बँकेने तसेच एनएसईने मोठ्या प्रमाणावर जाहिराती करुन नागरिकांचे प्रबोधन करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला. यामुळे शेअर बाजारातील गुंतवणूक, म्युच्युअल फंड, ऑप्शन-फ्युचर ट्रेडिंग या सर्वांमधील जोखीम, धोके याबाबत जनमानसात जागृती निर्माण झाली. तशाच प्रकारे या प्रस्तावित पोर्टलचा श्रीगणेशा झाल्यानंतर त्याविषयी सर्वसामान्यांना माहिती झाली पाहिजे. शेवटचा मुद्दा म्हणजे ग्राहकांची सजगता. शासनाकडून होणाऱ्या प्रयत्नांना यश तेव्हाच लाभेल जेव्हा ग्राहक सजग होऊन अशा जाहिरातींविरोधात पुढे येऊन तक्रार करण्याची सक्रियता दाखवतील. पण आज ग्राहकांमध्येच याबाबत उदासिनता असल्यामुळे अशा प्रकारच्या फसव्या जाहिरातींच्या माध्यमातून शोषण करणाऱ्यांचे फावले आहे.

**(लेखक राष्ट्रीय ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष आहेत.)**




**पंचांग**

**बुधवार, दिनांक १४ ऑगस्ट २०२४ श्रावण शु. ९, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू शुभ दिवस दुपारी १२. ११ पर्यंत. बुधपूजन, पतेती, नारायण महाराज पुण्यतिथी-पद्मतीर्थ(वाशिम) नक्षत्र : अनुराधा, योग :ऐंद्र , करण : तैतिल सूर्योदय : स.०६.२२ सूर्यास्त : सायं.०७.०५ वा. राहू काळ : दुपारी : १२:०० ते १:३० ते ३:००**

**दिनविशेष**

*१८६१ : मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना. *१८७७ : एडिसनने फोनोग्राफची निर्मिती केली. त्यावर 'मेरी हॅड अ लिटल लॅब' हे गाणे वाजवण्यात आले. *१९४१ : चर्चिल आणि रुझवेल्ट यांनी 'अटलांटिक चार्टर'वर स्वाक्षऱ्या केल्या. कुठल्याही नव्या भूमीचा लोभ न धरता युद्धखोर राष्ट्रांना निःशस्त्र करून मानवजातीस भयमुक्त व स्वतंत्र करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत, असे या कराराद्वारे स्वीकारण्यात आले. *१९४७ : पाकिस्तान हिंदुस्थानापासून वेगळा. *१९५५ : पेरांबूर येथे रेल्वेगाड्यांना लागणाऱ्या डब्यांचा कारखाना सुरू *१९५८ : जॉलिए जो फ्रेड्रीक स्मृतिदिन. *१९६७ : मराठी रंगभूमी गाजवणाऱ्या अभिनेत्यांचे अग्रणी गणपतराव जोशी यांचा जन्म. *१९६६ : रामकृष्ण परमहंस समाधिस्थ.

**राशीभविष्य**

***मेष** : वादाचे प्रसंग टाळा. ***वृषभ** : बौद्धिक क्षमतेचा कस लागेल. * मिथुन : वाहन चालवताना काळजी घ्या. ***कर्क** : कुटुंबाच्या आरोग्याची चिंता सतावेल. * **सिंह** : कामात व्यत्यय. संयम बाळगा. * **कन्या** : प्रॉपर्टीचे व्यवहार टाळा. ***तुळ** : आप्तेष्टांच्या भेटींमध्ये दिवस जाईल. * **वृश्चिक** : जुनी दुखणी डोके वर काढतील. * **धनु** : नोकरीत बढतीचा योग. * **मकर** : प्रवास घडेल. चिडचिड होईल. ***कुंभ** : जुन्या येण्यांबाबत सकारात्मक पावले पडतील. ***मीन** : वरिष्ठांकडून जबाबदारी वाढेल.

**मेसेज आया**



आनंदाचे दार बंद झाले की
आपण निराश होतो,
पण त्याचवेळी दुसरे एखादे दार
उघडलेले असते,
पण बंद झालेल्या दाराकडे
पाहण्याच्या दु:खात.
दुसऱ्या उघडलेल्या दाराकडे आपले
लक्ष नसते.

**व्यक्तीविशेष**

**फ्रेडरिक जोलिएट-क्युरी**

जीन फ्रेडरिक जोलिएट-क्युरी हे फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म १९ मार्च १९०० रोजी पॅरिस येथे झाला. पॅरीसमधील स्कूल ऑफ केमिस्ट्री आणि फिजिक्समधून पदवी घेतल्यानंतर त्यांनी रेडियम इन्स्टिट्यूटमध्ये प्रसिद्ध शास्त्रज्ञ मेरी क्युरी यांचा सहायक म्हणून काम करायला सुरुवात केली. येथेच मेरी क्युरी यांची मुलगी इरिन हिच्या ते प्रेमात पडले. दोघांनी १९२६ मध्ये विवाह केला. मेरी क्युरी यांच्या आग्रहाखातर त्यांनी दुसऱ्यांदा डिग्री घेतली आणि डॉक्टरेटही मिळवली. पॅरीस फॅकल्टी ऑफ सायन्समध्ये नोकरी करत असताना त्यांनी पत्नी इरिनबरोबर अणुच्या रचनेवर विशेषत: न्युक्लेइच्या प्रक्षेपणाबाबत संशोधन केले. न्यूट्रॉनच्या शोधातील हा एक महत्त्वाचा टप्पा होता. १९३५मध्ये फ्रेडरिक आणि इरिन दोघांना संयुक्तरित्या रसायनशास्त्राचे नोबेल पुरस्कार मिळाला. १९३७मध्ये ते कॉलेज डी फ्रान्समध्ये दाखल झाले. इथे त्यांनी साखळी प्रतिक्रिया आणि अणुभट्टी तयार करण्यासाठी आवश्यक गोष्टींर काम केले. फ्रान्सच्या अणुऊर्जा आयोगाचे ते पहिले उच्चायुक्त होते. १४ ऑगस्ट १९५८ रोजी त्यांचे पॅरीस येथे निधन झाले.

**बोधकथा**

**मूळ पाया विसरू नका**

मध्य प्रदेशातील ब्ऱ्हाणपूर गावातील बाजारपेठेत भोजराज लेखवाणी या सिंधी व्यापाऱ्याचं कापडाचं मोठं दुकान होतं. धंदा उत्तम चालला होता. एकदा एका सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मोठेमोठे कलाकार ब्ऱ्हाणपूरला गेले होते. कार्यक्रम संपल्यावर भोजराजांनी या सर्व कलाकारांना जेवणासाठी नेलं. जेवणाची व्यवस्था एका चंद्रमौळी टपरीत केली होती. ती बाहेरून एखादी झोपडीच वाटत होती. माणूस कसाबसा उभा राहील, एवढीच तिची उंची होती. छताला मधेमधे भोके पडली होती. त्यातून चांदण्या दिसत होत्या. आत भोजनाची व्यवस्था मात्र छान होती. जेवणही उत्तम होते, पण जेवण मात्र टपरीत कसे? हा प्रश्न त्यातील एका कलाकारांनी विचारला ते म्हणाले, 'सिंधमधून आम्हाला हाकलून दिलं. ना घर, ना दार अशा अवस्थेत आमचे कुटूंब पहिल्यांदा इथे आलं. इथं पाऊल ठेवलं अन् या जमिनीनं आम्हाला आधार दिला. या झोपडीनं आम्हाला सावली दिली. आमचं ऊन-वाऱ्यापासून संरक्षण केलं. ही जमीन आणि झोपडी नसती तर आमचे काय हाल झाले असते?' नंतर आम्ही खूप पैसा मिळवला. नवीन घर बांधल, पण ते या झोपडीशेजारीच! ही झोपडी आमच्या सुखाचं वैभवाचं उगमस्थान आहे, याचा विसर आम्हालाच काय, पण पुढच्या सात पिढ्यांनाही पडू नये, अशी आमची भावना आहे म्हणून ही झोपडी दाखवण्याचं हे निमित्त!

**भूगोल**


**तैगा प्रदेशातील मनुष्य आणि प्राणीजीवन**

तैगा प्रदेशात अनेक प्रकारचे प्राणी आढळतात. काही भागात एल्म, मूस, कॅरिबू, रेनडीयर हे हरणाच्या जातीचे प्राणी असून ते शेवाळे आणि क्वचित व थोडे उगवणारे गवत झुडुपे यांवर जगतात. काही भागात लांडगेही आहेत. तसेच असंख्य लहान प्राणी विपुल प्रमाणात असून त्यामध्ये अर्मिन, बीव्हर, स्कंक, मार्टेन, सिलव्हर फॉक्स, सेबल बिझल, मिंक व खार यांचा समावेश होतो. बहुतेक हे सर्व प्राणी नद्या, तळी, दलदली यांतील जलचर प्राण्यांवर उपजीविका करतात. अतीशीत हवामान आणि भूपृष्ठाचे मोठ्या प्रमाणात होणारे अपक्षालन यामुळे तैगा प्रदेशात शिकार हाच मुख्य धंदा आहे. अलास्का आणि कॅनडातील रेड इंडियन लोक कॅरिबू आणि रेनडियर यांच्या शिकारीवर उपजीविका करतात. प्राण्याचे मांस व कातडी हेच त्याचे अन्न-वस्त्र आहे. तसेच केसाळ कातडी विकून रोजच्या गरजेच्या वस्तू मिळवणे आणि लाकूडतोड हेही त्यांचे उद्योगधंदे आहेत. ते खालच्या भागात ओढून घेतात आणि त्यापासून कागद, लाकडी, समान व खेळणी आदी वस्तू तयार करतात. कॅनडात हा उद्योग मोठ्या प्रमाणात चालतो. तसेच अलीकडे या प्रदेशात सोने, खनिज तेल, लोखंड, कोळसा, युरेनियम, तांबे, मॅग्नेशियम, निकेल वगैरेंच्या खाणी सापडल्यामुळे औद्योगिक वाढ झाली आहे.

**नवं संशोधन**

**नेपच्युनवर आढळला काळा डाग**

अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था 'नासा'च्या संशोधकांनी नेपच्युनवर काळा डाग शोधला आहे. नेपच्युनवरील चमकदार ढगांच्या पट्ट्याखाली, दक्षिण गोलार्धात हा डाग दिसून आला आहे. त्याची प्रतिमा 'नासा'च्या हबल दुर्बिणीने टिपली आहे. यापूर्वी १९८९ मध्येही नेपच्यूनवरील असा डाग टिपण्यात आला होता. त्यावेळी त्याचे छायाचित्र 'व्होएजर-२' या अंतराळ यानाने टिपले होते. १९९४ मध्येही हबल दुर्बिणीने असाच डाग आपल्या कॅमेऱ्यात टिपून घेतला होता. हा डाग ज्या क्षेत्रात आहे, ते नेपच्युनचे अधिक दाबाचे क्षेत्र आहे.



तिथे त्याच्या जोडीला हे चमकदार ढगही असतात. तिथे वायू गोठून त्यांचे रुपांतर मिथेन बर्फाच्या स्फटिकांमध्ये होत असते. 'हबल'च्या सहाय्याने खगोलशास्त्रज्ञ या ग्रहाची रचना, तेथील वायूमंडळ आणि तत्सम बाबींचा अधिक अभ्यास करीत आहे.

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक १९४**

| | | | |
|---|---|---|---|
| | 2 | | |
| 1 | | | 3 |
| 2 | | | 4 |
| | | 3 | |

**क्रमांक १९३ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 2 | 3 |
| 3 | 1 | 4 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 |
| 4 | 2 | 3 | 1 |

**हास्यविनोद**



**मास्तर** : सोन्या सांग की चंद्रावर पहिले पाऊल कोणी टाकले?
**सोन्या** : नील आर्मस्ट्राँग
**मास्तर** : अगदी बरोबर... आणि दुसरे पाऊल कुणी टाकले?
**सोन्या** : त्यानेच टाकलं आसलं की ते काय लंगड वाटलं व्हय तुमाला...!

**महिलायन**

**पावसाळ्यातील 'गृह'पाठ**

घरात हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या, दारे उघडी ठेवावीत. अन्यथा दमट हवेमुळे भिंतीवर बुरशी लागू शकते. अपार्टमेंटस्मध्ये अथवा सोसायटीच्या इमारतींमध्ये सांडपाण्याचे नाले एकमेकांना जोडलेले असतात. त्यामुळे टॉयलेट आणि टाईल्स्च्या स्वच्छतेवर जास्त लक्ष द्यावे लागते. काहीवेळा टॉयलेटमध्ये अचानक दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी दूर करण्यासाठी एअर फ्रेशनरचा वापर करता येऊ शकतो. एअर कंडिशन आणि ड्रायर एअर कंडिशन यांचा वापर करून घरातील दमटपणा अथवा ओलावा दूर करता येऊ शकतो.

कपडे सुकवण्यासाठी वॉशिंग मशिनमधील ड्रायरचा वापर करावा. कारण ड्रायरमध्ये कपडे कोरडे केल्यानंतर ते घरात पसरवून ठेवले तरी त्यामुळे ओलेपणा किंवा कुबट वास येत नाही. घरातील स्टोअर रूम म्हणजे टाकाऊ वस्तूंची खोली बनवू नये. कारण अशा ठिकाणी पावसाळ्यात डास आणि जीवजंतू वाढण्याची शक्यता असते. जे सामान उपयोगाचे नाही ते फेकून द्यावे किंवा विकून टाकावे. जे सामान प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये ठेवले असेल ते मोठ्या ड्रममध्ये किंवा मोठ्या डब्यात बंद करून ठेवावे. यामुळे आतील वस्तू चांगल्या राहतील. पावसाळ्याच्या दिवसात नेहमी घराचे लाकडी दरवाजे आणि खिडक्या फुगतात. ते उघडण्यास किंवा बंद करण्यास त्रास होतो तसेच घरात लाकडी शेल्फ असेल तर तीही खराब होऊ लागते. त्यामुळे या लाकडी वस्तूंवर वॅक्सचे कोटींग करावे, जेणे करून दमट हवेचा अथवा पाण्याचा दुष्परिणाम त्यावर होणार नाही.
(उत्तरार्ध)

**ज्ञानसागर**

* आपली मान योग्य कोनात राखण्यासाठी चिनी शिपाई कॉलरवर सुई टोचून ठेवतात. * फक्त दोन केळी खाल्ल्याने ९० मिनिटे व्यायाम करण्यासाठी ऊर्जा मिळते. * जपानमधील मियाझाकी येथे द ओशन डोम नावाचा इनडोअर मानवनिर्मित बीच आहे. * टोकियोतील एक प्रवासी संस्था आपल्या अनुपस्थितीत आपल्या टेडी वेअरला सुटीवर नेते.* २०१५ साली भारताचे दरडोई उत्पन्न सुमारे ८७७४८ रूपये आहे. * पिझ्झा हट पिझ्झाचा वास असणारे एक अत्तर उपलब्ध आहे. * मँगालिका जातीच्या डुकराच्या शरीरावर मेंढीप्रमाणे लोकर असते.* माउंट एव्हरेस्टच्या शिखरावरील तापमान उन्हाळ्यात उणे ३५ ते उणे २१ अंश एवढे असते. * महाराष्ट्रातील नागपूर हे शहर भारताच्या मध्यावर आहे.* मार्क झुकरबर्गने फेसबुकचा लोगो निळा ठेवला, कारण तो रंगांधळा असून त्याला लाल-पिवळा रंग दिसत नाही. * फाईंडिंग नेमो या चित्रपटानंतर ॲक्वेरियमसाठी मागणी तिप्पट वाढली. * ब्रिटनचे युवराज प्रिन्स चार्ल्स यांच्यापाशी एक ॲस्टन मार्टिन गाडी होती जी वाईनवर चालत असे.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# सततचा तणाव वाढवतोय अनारोग्य



तणाव आणि चिंता ही एक अशी परिस्थिती आहे, जी नकारात्मक परिस्थितीमुळे उद्भवते. मात्र, तुम्ही वारंवार तणावात राहिल्यास त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. अति तणावाचा मानसिक आरोग्यावरच नव्हे, तर शारीरिक आरोग्यावरही नकारात्मक परिणाम होतो. अतिप्रमाणात मानसिक तणाव हे सामान्यतः नैराश्यासारख्या समस्यांचे कारण मानले जाते; परंतु तुम्हाला माहीत आहे का? की यामुळे हृदयविकार, रोगप्रतिकारकशक्ती समस्या, पचनाचे विकारदेखील होऊ शकतात. तणावामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची ही माहिती...

**शरीरावर तणावाचा प्रभाव**

आरोग्यतज्ज्ञ सांगतात, जेव्हा तुम्हाला तणाव जाणवतो तेव्हा शरीर काही विशिष्ट हार्मोन्स सोडते. हार्मोन्स हे रासायनिक सिग्नल आहेत, जे तुमचे शरीर संपूर्ण शरीर प्रणालींना कोणत्या वेळी काय करावे हे सांगण्यासाठी वापरतात. तणावाच्या प्रतिसादादरम्यान, तुमचे शरीर हृदय गती, श्वासोच्छ्वासाची गती आणि रक्तदाब वाढवून समस्येचा सामना करण्याचा प्रयत्न करते.

**मधुमेह होण्याचा धोका**

तणावाच्या काळात, तुमचे यकृत शरीराला ऊर्जा देण्यासाठी अतिरिक्त रक्तातील साखर (ग्लुकोज) तयार करू लागते. जर तुम्ही सतत तणावाखाली असाल, तर तुमचे शरीर ग्लुकोजच्या या अतिरिक्त वाढीवर नियंत्रण ठेवू शकत नाही, ज्यामुळे तुम्हाला टाईप-२ मधुमेह होण्याचा धोका वाढू शकतो.

**पचनसंस्थेवर परिणाम**

तणाव संप्रेरक कॉर्टिसोल वाढल्यामुळे, जलद श्वासोच्छ्वास आणि हृदय गती वाढण्याचा धोकादेखील असतो, ज्यामुळे तुमच्या पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. पोटात ॲसिडचे प्रमाण वाढल्यामुळे तुम्हाला छातीत जळजळ किंवा ॲसिड रिफ्लक्स होण्याची अधिक शक्यता असते.

**श्वसनावर परिणाम**

अधिक प्रमाणात स्ट्रेस हार्मोन्समुळे श्वसन तसेच हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी प्रणालींवर परिणाम होऊ लागतो. तणावाच्या प्रतिसादादरम्यान, ऑक्सिजनयुक्त रक्त जलद वितरित करण्याच्या प्रयत्नात तुमचे शरीर तुम्हाला जलद श्वास घेण्याचे संकेत देते. अशा परिस्थितीत, ज्या लोकांना आधीच दमा किंवा श्वासोच्छ्वासाचा त्रास आहे, त्यांच्या समस्या आणखी वाढू शकतात.

**हृदयावर परिणाम**

तणावादरम्यान तुमचे हृदयही वेगाने धडधडते. ताणतणाव संप्रेरकांचा अतिरेक रक्तवाहिन्या संकुचित करू शकतो, ज्यामुळे रक्तदाब वाढू शकतो आणि हृदयविकाराच्या इतर समस्या उद्भवू शकतात.

**दीर्घकालीन तणावाचे परिणाम**

दीर्घकालीन तणावामुळे इतर अनेक गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. मानसिक आरोग्य समस्या, जसे की नैराश्य, चिंता आणि व्यक्तिमत्त्व विकार, हृदयरोग, उच्च रक्तदाब, हृदयाची असामान्य लय, हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक, लठ्ठपणा आणि इतर खाण्याचे विकार, लैंगिक समस्या तसेच त्वचा व केसांच्या समस्या.

# एलियन ममींचे वास्तव

मेक्सिकोच्या संसदेत गेल्या वर्षी एलियन्सच्या दोन ममी दाखवण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक स्त्रीची, तर दुसरी पुरुषाची होती. या ममींचा शोध पेरुमधील एका खाणीत २०१७ मध्ये लागला होता, असे त्यावेळी सांगण्यात आले होते.



आता यापैकी एका ममीच्या फिंगरप्रिंट विश्लेषणातून असे दिसून आले आहे की, ते कोणत्या मानवाचे नाहीत. खरे तर या तथाकथित ममी म्हणजे प्राचीन काळातील मानवांनी बनवलेल्या बाहुल्या असाव्यात, असे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

ममींची कवटी लांबट असून, हाताला तीन बोटे जानेवारीत करण्यात आलेल्या फॉरेन्सिक विश्लेषणात आढळले की, नाज्का क्षेत्रात आढळलेल्या वस्तू या कागद, धातू तसेच मानवाच्या आणि प्राण्यांच्या हाडांपासून बनलेल्या होत्या. या कथित ममीही अशाच स्वरूपाच्या असू शकतात. या ममींची कवटी लांबट असून, हाताला तीन बोटे आहेत. माणूस एलियन म्हणजेच परग्रहवासीयांची जशी कल्पना करतो, तसेच या दोन्ही ममींचे रुपडे आहे. त्यामुळे या एलियन्सच्याच ममी असाव्यात, असा दावा करण्यात येतो. त्याबाबत कोलोरॅडोमधील जोशुआ मॅकडॉवेल यांनीही तपासणी केली आहे. त्यांनी या 'ममीं'च्या हात व बोटांबाबत सांगितले की, त्यामध्ये पारंपरिक मानवी फिंगरप्रिंट पॅटर्न नव्हते. मॅकडॉवेल यांनी 'मारिया'नावाच्या ममीचा अभ्यास केला होता. त्यांनी सांगितले की, तिच्या हाताचे प्रिंट कोणत्याही ज्ञात मानवी पॅटर्नशी मिळतेजुळते नाहीत. त्यांनी सांगितले, आम्हाला तिच्या हात किंवा पायाच्या बोटांच्या ठशांवर कोणतेही लूप किंवा चक्र आढळले नाही. मी आतापर्यंत अनेक फिंगरप्रिंट्स पाहिल्या आहेत; पण हे क्लासिक फिंगरप्रिंट नव्हते. अर्थात जानेवारीमध्येच पेरुच्या फॉरेन्सिक तज्ज्ञांनी या ममी एखाद्या परग्रहावरील लोकांच्या असल्याचा समज चुकीचा असल्याचे स्पष्ट केले होते. फॉरेन्सिक पुरातत्त्व संशोधक फ्लेवियो एस्ट्राडा यांनी या 'एलियन ममी'चे विश्लेषण करणाऱ्या टीमचे नेतृत्व केले

# हृदयारोग्यासाठी खा भोपळ्याच्या बिया

भोपळ्याच्या बिया आपल्या शरीरासाठी आवश्यक असलेल्या अनेक पोषक तत्त्वांनी समृद्ध असतात. ते खाल्ल्याने हृदय निरोगी राहते. तसेच सांधेदुखीपासून आराम मिळतो, केसांशी संबंधित समस्याही दूर होतात, असे तज्ज्ञ सांगतात. अशा अनेक फायद्यांनी त्याचे बीज भरलेले असते. चला जाणून घेऊया त्याबद्दल.



**हृदयाशी संबंधित समस्या दूर**

निरोगी राहण्यासाठी फळे आणि भाज्या आवश्यक आहेत; परंतु काही फळे आणि भाज्यांचे बियाणेदेखील आरोग्याच्या अनेक समस्यांवर उपचार आहेत. सूर्यफूल, अलसी (जवस) आणि भोपळ्याचे लहान बियाणे दररोज खाल्ल्याने तुम्ही दीर्घकाळ निरोगी राहू शकता. तज्ज्ञांनी म्हटले आहे की, या बिया महिलांसाठी खूप फायदेशीर आहे कारण त्यात मॅग्नेशियम आणि जीवनसत्त्व 'के' असते, जे मासिक पाळीमध्ये मदत करते. भोपळ्याच्या बिया खाल्ल्याने हृदय निरोगी राहते कारण त्यात फायबर, निरोगी चरबी तसेच अटिऑक्सिडंट्स चांगल्या प्रमाणात असतात, जे कोलेस्टेरॉल काढून टाकण्यास प्रभावी असतात. या बियांमध्ये असलेले मॅग्नेशियम रक्तदाबाची पातळी नियंत्रित करते, ज्यामुळे हृदयाशी संबंधित समस्या दूर राहतात. भोपळ्याच्या बिया खाल्ल्याने शरीराची प्रतिकारशक्तीही वाढते. या बियांमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्सची उपस्थिती प्रतिकारशक्ती मजबूत करण्यास उपयुक्त ठरते. ॲंटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांनी समृद्ध असलेले त्याचे बियाणे सांधेदुखी कमी करण्यासाठीदेखील प्रभावी आहेत. संधिवाताच्या दुखण्यापासून आराम मिळवण्यासाठी त्याच्या बिया आहाराचा भाग बनवावा. भोपळ्याच्या बिया जीवनसत्त्व 'सी'चा चांगला स्रोत आहेत. याचे सेवन केल्याने केस मुळापासून मजबूत होतात आणि त्यांची वाढही वेगवान होते.

# ओलसर कपडे घालताय?

सध्या पावसाळा सुरू आहे, आणि संततदार पाऊस पडतो आहे, पावसाळ्यात पुरेसा सूर्यप्रकाश नसल्याने कपडे लवकर सुकत नाहीत, अनेकजण असेच ओले कपडे वापरतात.

त्यामुळे फंगल इन्फेक्शन किंवा गजकर्णाचा त्वचारोगाचा धोका अधिक वाढतो, यामध्ये जांग, काख, बसण्याची जागा यामध्ये सततच्या ओलसरपणामुळे गोल रिंग आकाराचे लाल रंगाचे प्रचंड खाजवणारे चट्टे अंगावर उठायला सुरुवात होते, हे इन्फेक्शन संसर्गजन्य आहे, हे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पसरते.

पावसाळ्यात काय काळजी घ्यावी लागते. पावसाळ्यात वातावरणातील आद्रतेमुळे तसेच अर्धवट स्वरूपातील वाळलेले कपडे दररोजचे ओले अंतर्वस्त्र वापरल्यामुळे गजकर्णाचा धोका वाढतो. कपडे अंतर वस्त्र पूर्ण सुकल्याशिवाय वापरू नयेत, कपडे गरम पाण्यामध्येच धुऊन, इस्त्री करून वापरल्यास अधिक फायदेशीर ठरते, कोरडे आणि सैल कपडेच वापरावेत, एकमेकाचे कपडे, साबण, टॉवेल याचा वापर करू नये.

तज्ज्ञांच्या मते, रुग्णांनी टीव्ही, युट्युब, समाजमाध्यमावरील जाहिराती पाहून किंवा विविध औषध दुकानातून तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय परस्पर औषधे घेऊन वापरणे टाळावे, औषधामध्ये स्टेरॉईडचा अंश असण्याची शक्यता अधिक असते, यामुळे खाज तात्पुरती कमी होईल.परंतु इन्फेक्शन त्वचेच्या आत मध्ये वाढत राहील, त्वचेचे इन्फेक्शन असेल तर एमसीआय ओआर आयएडीव्हीएल मान्यताप्राप्त त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच योग्य तो उपचार करून घ्यावे.





# बोटाने चार्ज होणारा स्मार्टफोन

स्मार्ट फोनने आपले जीवन अनेक बाबतीत सुकर बनवले आहे. एका टचवर अनेक कामे होत असतात; मग ते बँकेचे काम असो किंवा बिल भरण्याचे. मात्र, जर एका टचनेच हा स्मार्ट फोन चार्जही झाला तर? हे खरे आहे. संशोधकांनी एक असे उपकरण बनवले आहे, ज्यामुळे केवळ बोटानेच आपल्याला स्मार्ट फोनचे चार्जिंग करता येऊ शकेल.



कॅलिफोर्नियामध्ये बनवलेल्या या उपकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे ते घामाच्या साहाय्याने वीज तयार करते. कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीतील संशोधकांच्या टीमने हे उपकरण बनवले आहे. हे उपकरण जर आपण रात्री झोपताना परिधान केले, तर त्यापासून बनवलेल्या विजेने एखादा स्मार्ट फोन सहज चार्ज होऊ शकेल. हे एखाद्या चिपसारखे दिसणारे उपकरण सुमारे दहा तास बोटावर परिधान केल्यानंतर ते चोवीस तास फोन चार्ज करू शकते. खरे तर ही एक स्ट्रिप आहे. तिची क्षमता वाढवण्याचे सध्या प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये कार्बन फोम इलेक्ट्रोडचे एक पॅडिंग असते जे घाम शोषून घेते आणि त्याच्या साहाय्याने विद्युतनिर्मिती करते. जखम झाल्यावर बोटावर जी चिकटपट्टी लावतात तशा पद्धतीने ही स्ट्रिप बोटाभोवती गुंडाळता येते.

# स्विमिंग पूलमध्ये पोहणे धोकादायक?

पावसाळ्यात सार्वजनिक जलतरण तलावात पोहणे टाळावे कारण पावसाच्या पाण्यामुळे जलतरण तलावाच्या पाण्यात बॅक्टेरिया किंवा विषाणू वाढण्याचा धोका वाढतो, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे. यामुळे त्वचेचा संसर्ग, जुलाब यांसारख्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.



**स्विमिंग पूलचे पाणी दूषित होण्याची दाट शक्यता**

पावसाळ्यात स्विमिंग पूलमध्ये पोहण्यामुळे या आजारांचा धोका- डायरिया, त्वचारोग, डोळ्याचे इन्फेक्शन, कानाचे इन्फेक्शन, नाक आणि घशाचे इन्फेक्शन, हिप्पॅटायटिस ए. पावसाच्या पाण्यामुळे स्विमिंग पूलचे पाणी दूषित होण्याची दाट शक्यता असते, त्यामुळे डोळे, कान किंवा नाकात संसर्ग होण्याचा धोकाही वाढतो. दूषित जलतरण तलावाच्या पाण्यामुळे डोळ्यांच्या संसर्गाचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत डोळ्यांत पाणी येणे, डोळे लाल होणे, सूज येणे किंवा डोळ्यांना खाज येणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. याशिवाय डोळ्यांच्या बुब्बुळाच्या पुढील भागाचा होणारा दाह सारखे आजारदेखील होऊ शकतात. हा रोग जीवाणू किंवा विषाणूजन्य संसर्गामुळे होतो. डोळ्यांच्या बुब्बुळाच्या पुढील भागाचा होणारा दाह सहसा जलतरण तलावांमध्ये पोहल्याने होतो कारण तलावाच्या पाण्यात क्लोरीन मिसळले जाते, ज्यामुळे डोळे लाल होतात. स्विमिंग पूलमध्ये पोहताना कानात पाणी जाणे सामान्य गोष्ट आहे. पावसाळ्यात जलतरण तलावाचे पाणी दूषित होण्याचा धोका असतो. दूषित पाण्यामुळे बाहेरील कान आणि कानाच्या भागामध्ये सूज, चिडचिड किंवा संसर्ग होऊ शकतो. ओलसर वातावरणामुळे कानात बॅक्टेरिया किंवा बुरशीची वाढ होण्याचा धोका असतो. दूषित पाणी नाकात गेल्याने रायनायटिसचा धोका वाढतो. ही एक प्रकारची ॲलर्जी आहे. नाकात खाज सुटणे, शिंका येणे किंवा नाक वाहणे, ही त्याची लक्षणे आहेत.



# शोध कृष्णविवराचा, उलगडा जुन्या रहस्याचा

खगोलशास्त्रज्ञांनी आपल्या 'मिल्की वे' नावाच्या आकाशगंगेतच्या केंद्रस्थानी एका दुर्मीळ व शक्तिशाली कृष्णविवराचा शोध घेतला आहे. त्याला 'इंटरमिजिएट-मास ब्लॅक होल' असे म्हटले जाते. तो 'आयआरएस १३' नावाच्या एका तारा समूहात आहे. प्रत्येक आकाशगंगेच्या केंद्रस्थानी एखादे शक्तिशाली कृष्णविवर असते. आपल्या मिल्की वेच्या केंद्रस्थानीही 'सॅजिटेरिएस ए' नावाचे एक सुपरमॅसिव्ह ब्लॅकहोल आहे. त्याच्यापासून जवळच हे दुर्मीळ कृष्णविवर आहे. या कृष्णविवराच्या शोधाने 'आयआरएस १३'बाबत गेल्या वीस वर्षांपासूनच्या एका रहस्याचा उलगडा झाला आहे.



'सॅजिटेरिएस ए'च्या शक्तिशाली गुरुत्वाकर्षणाच्या अस्तित्वानंतरही या ताऱ्यांच्या समूहातील म्हणजेच क्लस्टरमधील विशाल आणि उष्ण तारे आपले काम व्यवस्थित करीत आहेत, असे आढळले होते. त्याबाबतचे गूढ गेली वीस वर्षे कायम होते. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'द ॲस्ट्रोफिजिकल' जर्नलमध्ये प्रसिद्ध झाली आहे. क्लस्टरचे बारकाईने अध्ययन केल्यावर संशोधकांना आढळले की, हे तारे क्लस्टरमध्ये लपलेल्या एका कृष्णविवरामुळे प्रभावित होत आहेत. जर्मनीतील कोलोन विद्यापीठाचे खगोलशास्त्रज्ञ फ्लोरियन पेइस्कर यांनी सांगितले की, सुमारे वीस वर्षांपूर्वी क्लस्टरला शोधण्यात आले होते. त्यावेळी असे वाटले होते की, या क्लस्टरमध्ये एक विशाल तारा आहे. मात्र, आता नव्या हाय-रिझोल्युशन डेटातून समजले आहे की, क्लस्टरच्या केंद्रस्थानी एक इंटरमिजिएट मासचे ब्लॅक होल आहे. 'आयआरएस १३' ची संरचना तपासण्यासाठी खगोलशास्त्रज्ञांनी व्हेरी लार्ज टेलिस्कोप आणि चंद्रा एक्स-रे स्पेस टेलिस्कोपची मदत घेतली. त्यावेळी त्यांना या कृष्णविवराचा शोध लागला. हे कृष्णविवर आपल्या सूर्यापेक्षा ३० हजार पट अधिक वस्तुमानाचे आहे.

# डासांचा उपद्रव असला तरी...

डास नावाचा उपद्रवी कीटक निसर्गाने का निर्माण केला, असे आपल्याला नेहमीच वाटत असते. एक तर कानाभोवती कर्कश गुणगुण करून हे डास नीट झोपू देत नाहीत. शिवाय, चावून बेजार करतात ते वेगळेच. त्यांच्या दंशाने चिकुनगुनिया, झिका, डेंग्यू व मलेरियासारखे आजार फैलावतात ही सर्वात मोठी समस्या आहे. अशावेळी जर एखाद्याला वाटले की, जगातील सर्वच डासांचा नायनाट करता आला तर बरे होईल; पण खरेच असे झाले तर काय होऊ शकते याचा कधी विचार केला आहे का?

जर जगातील सर्व डासांचा नायनाट केला तर काय होऊ शकते? याबाबत तज्ज्ञांचे मत काय आहे जाणून घेऊयात, जर तुम्ही सर्व डास मारले तर काय होईल हे जाणून घ्यायचे असेल तर यामुळे अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. कीटकशास्त्रज्ञ फिल लोनिबस सांगतात की, जगातील सर्व डासांना संपवले तर त्याचे अनेक दुष्परिणाम निसर्गावर होऊ शकतात. ज्याचा परिणाम माणसावरदेखील होऊ शकतो. लोनिबस यांच्या माहितीनुसार, नर डास हे वनस्पतींचा रस पिऊन



जिवंत राहतात. त्यांच्यामुळेच वनस्पतींचे परागकण निसर्गात पसरतात. त्यामुळे वनस्पतींमध्ये असलेली फुले ही फळांमध्ये विकसित होतात. त्यामुळे डास हे निसर्गासाठी खूप महत्त्वाचे आहेत. नैसर्गिक अन्नचक्रात डासांना महत्त्वाचे स्थान आहे. अनेक पक्षी आणि वटवाघुळ डास खातात. मासे आणि बेडूक यांचे खाद्यदेखील डासच आहेत. त्यामुळे जर डासच नष्ट केले, तर निसर्गाच्या अन्नसाखळीवर विपरीत परिणाम होऊ शकतात. अनेक शास्त्रज्ञांची मते भिन्न भिन्न आहेत. काही शास्त्रज्ञ सांगतात की, जर डासांना समूळ नष्ट केले तर इतर जीव या नैसर्गिक अन्नसाखळीत त्याची जागा घेतील. जेव्हा पृथ्वी विकसित झाली तेव्हापासून आतापर्यंत अनेक प्रजाती नामशेष झाल्या होत्या. त्यामुळे या प्रजाती नष्ट झाल्यामुळे जग उद्ध्वस्त झाले नाही; पण त्यांची जागा इतर नवीन प्रजातींनी घेतली. डासांचा नायनाट झाल्यानंतर त्याची जागा दुसरे जीव घेतील; पण त्यासोबतच इतर आजारांचा धोकादेखील वाढेल. कारण, ते डासांइतकेच किंवा त्याच्यापेक्षा अधिक घातक असू शकतात. या नव्या जीवाचा मानवी आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. त्यानंतर हे नवीन जीव झपाट्याने पसरण्याची शक्यता आहे, ज्यामुळे अनेक नवीन रोग आणि संक्रमण होऊ शकतात.

## ठेकेदारांचा भर केवळ बिले काढण्यावर

# कोट्यवधी खर्चूनही शहरातील कचरा जैसे थे!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून आठही प्रभागनिहाय दैनंदिन रस्ते साफसफाई करण्यासाठी ठेकेदार संस्था नियुक्त केलेल्या आहेत. त्या ठेकेदारावर वर्षाला सुमारे दोनशे कोटी रुपये खर्च केला जातोय, मात्र, शहरातील अनेक रस्त्याच्या कडेला कचरा आढळून येत आहे. त्यामुळे ठेकेदार संस्थांचे शेकडो कामगार काम करत असतानादेखील रस्त्यांची दैनंदिन साफसफाई होत का नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून दररोज स्वच्छता करण्यात येत असल्याचा दावा केला जातो. शहरातील स्वच्छतेवर महिन्याकाठी कोट्यवधीचा खर्च करण्यात येतो. असे असले तरी शहरात ठिकठिकाणी अस्वच्छता, कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने १८ मीटर रस्त्यांच्या आतील आठही प्रभागातील अंतर्गत शेकडो रस्त्यांची दररोज दैनंदिन रस्ते साफसफाई करण्यात येते. याकरिता आठही प्रभागात ठेकेदार संस्था नियुक्त केलेल्या आहेत. प्रत्येक ठेकेदाराला वर्षाला किमान ३० ते ३५ कोटी खर्च केला जातो. त्या ठेकेदार संस्थांकडे दीडशे ते दोनशे कंत्राटी कामगार रस्ते साफसफाईचे काम करत आहेत. तरीही महापालिका हद्दीतील आठही प्रभागातील शेकडो रस्त्यांवर, रस्त्यांच्या कडेला, फूटपाथवर झाडाचा पाला पाचोळा, कागद, प्लास्टिक, बाटली यासह काही कचरा पडलेला दिसत आहे. अनेक भागात साफसफाई होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.



अनेक भागात रस्त्यांवर घाण

महापालिकेच्या आरोग्य विभागाचे देखील ठेकेदार संस्थांच्या या गलथान कारभाराकडे दुर्लक्ष होत आहे. अधिकाऱ्यांना हाताशी धरून ठेकेदार संस्था केवळ कागदावर सफाई करत आहेत. त्यामुळे शहरातील कचरा, अस्वच्छता दिसून येत आहे. एकीकडे महापालिका प्रशासन शहरातील स्वच्छतेवर कोट्यवधी रुपये खर्च करते. तसेच सफाई कामगारांच्या वेतनावरील खर्च होतो. असे असतानाही, शहरात होणाऱ्या स्वच्छतेतही घोळ असल्याचे चित्र आहे.

शहरातील पिंपरी गावात सातत्याने घाण, कचरा दिसून येतो. तसेच कासारवाडी, निगडी, भोसरी परिसरात वारंवार कचरा साठत असल्याचे परिसरातील नागरिक, व्यावसायिकांचे म्हणणे आहे. घरोघरी जाऊन महापालिकेच्या घंटागाड्यांच्या माध्यमातून कचरा संकलन करण्यात येतो. यावरही कोट्यवधींचा खर्च करूनही काही सोसायट्यांमधील कचरा उचलला जात नसल्याचे चित्र आहे. रस्ते सफाई, नाले, गटारे सफाईवर अंदाजे करोडो रुपयांचा खर्च करण्यात येत असला तरी शहरातील अस्वच्छता तशीच आहे.

## भक्ती-शक्तीजवळील रस्त्याची दुरवस्था

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** निगडी येथील भक्ती-शक्तीजवळील रस्त्याची दुरवस्था झाली असून, वाहन चालकांची गैरसोय होत आहे. पालिकेने या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पुणे-मुंबई महामार्गापासून ट्रान्स्पोर्ट नगरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भक्ती-शक्ती शिल्प उद्यान सीमा भिंतीलगत रस्त्यावर असंख्य खड्डे पडले आहेत. खड्ड्यांतून मार्ग काढताना जिकिरीचे झाले असल्याने पालिकेने त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी विद्या कासट, नवीन लायगुडे, अंजना गायकवाड, रुहीनाझ शेख यांनी केली आहे.

या रस्त्याने प्राधिकरणात जाणाऱ्या वाहनांचीही अधिक वर्दळ असते त्यामुळे प्राधिकरण वासियांनीही या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली आहे.

## Selected



## इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूलची तिरंगा रॅली, विद्यार्थ्यांचा सहभाग

**पिंपरी :** इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूल, चिखली व किवळे यांच्या वतीने तिरंगा रॅली काढली. रॅलीमध्ये, विद्यार्थ्यांनी उत्कटतेने घोषणा देत देशभक्तीपर वातावरण निर्मिती केली. रॅली शाळेच्या आवारात पोहोचताच, लहान विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. कार्यक्रमा दरम्यान, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूरज पवार यांनी विद्यार्थ्यांना स्कूल बसमधून प्रवास करताना किंवा रस्त्यावरून चालताना सुरक्षिततेच्या उपायांबाबत मार्गदर्शन केले.

महापालिका उपायुक्त अण्णा बोदाडे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण व पृथ्वी माता स्वच्छ व निरोगी ठेवण्याच्या त्यांच्या जबाबदारीची आठवण करून देत शपथ घेतली. या उत्सवाची सांगता लेझिम नृत्य आणि मधुर देशभक्तीपर गाण्यांनी झाली. महापालिका उपायुक्त अण्णा बोदाडे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूरज पवार, निरीक्षक आशिष काळदाते, वैभव फापडे, धनराज नाईकवाले, तानाजी दाते, आरोग्य विभागाचे अधिकारी, ज्येष्ठ नागरिक भालचंद्र देशमुख, भिकाजी थोरात आणि सुधीर, चिखली व किवळे येथील दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक व संचालक उपसथित होते.

## खंडणीसाठी दोन महिलांकडून महिलेला जीवे मारण्याचा प्रयत्न

**भोसरी :** येथे मासे विक्री करायची असेल तर आम्हाला दरमहा हप्ता द्यावा लागेल. महिलेने हप्ता देण्यास नकार दिल्याने तिच्यावर कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दोन महिलांच्या त्रासाला कंटाळून मासे विक्रेत्या महिलेने विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना भोसरी येथील बीआरटी बस स्टॉपवरील मच्छी मार्केटमध्ये घडली.

याप्रकरणी चक्रपाणी वसाहत, भोसरी येथे राहणाऱ्या २९ वर्षीय महिलेने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी घरकुल, चिखली आणि भोसरी येथे राहणाऱ्या दोन महिलांच्या विरोधात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला यांचा मासे विक्रीचा व्यवसाय आहे. दोन महिला फिर्यादी यांच्या दुकानावर आल्या. येथे मासे विक्री करायची असेल तर यापूर्वी माझा भाऊ कुक्या याला हप्ते देत होते. तो आता तुरूंगात असल्याने आम्हा दोघांना हप्त्याचे दरमहा ७०० रुपये द्यावे लागतील. पैसे दिले नाही तर तुला धंदा करून देणार नाही, असे म्हणत फिर्यादी यांच्यासह इतर महिलांकडून दरमहा पैशाची मागणी केली.

## जागतिक आदिवासी दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**भोसरी :** पुण्यातील आदिवासी सांस्कृतिक उत्सव समिती, पिंपरी-चिंचवड शहर व समस्त आदिवासी समाज संघटना यांच्यावतीने जागतिक आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर काढण्यात आलेल्या शोभायात्रेचे उद्‌घाटन महापालिकेच्या सहआयुक्त आशादेवी दुरगुडे, आदिवासी सेवक सीता किरवे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे औपचारिक उद्‌घाटन झाडांचे आणि आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून झाले.

या कार्यक्रमात आदिवासी समाजातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. मान्यवरांनी आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. तसेच, शिक्षण व सामाजिक एकात्मतेचे महत्त्व सांगितले. जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्याचे यंदाचे नववे वर्ष होते. या सोहळ्यात पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील दोन हजारपेक्षा अधिक आदिवासी बांधव सहभागी झाले होते. नागपूर आणि पालघर येथून आलेल्या आदिवासी नृत्य पथकांनी नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## वीजयंत्रणांसाठी जागेच्या उपलब्धतेची समस्या

**पिंपरी (प्रतिनिधी) :** पिंपरी चिंचवडसारख्या महानगरांमध्ये वीजयंत्रणांसाठी जागेच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिसत आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, अशी सूचना महावितरणचे सीएमडी लोकेश चंद्र यांनी केली आहे.



लोकेश चंद्र यांनी पुणे परिमंडलातील विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता राजेंद्र पवार आणि अधीक्षक अभियंते अरविंद बुलबुले, युवराज जरग, सिंहाजीराव गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ते म्हणाले, पुणे परिमंडलमध्ये सहा अतिउच्चदाबाचे उपकेंद्र उभारण्याचे प्रस्ताव मंजूर करून महापारेषणकडे पाठविण्यात आले आहेत. तसेच महत्वाच्या चाकण व भोसरी उपविभागांचे विभाजन करून नवीन उपविभाग व शाखा कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. वेगाने वाढत असलेली ग्राहकसंख्या व विजेची मागणी पाहता अशा प्रकारच्या प्रस्तावांसाठी व्यवस्थापन सकारात्मक आहे, असे लोकेश चंद्र यांनी सांगितले. वीज यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणासाठी आणखी काही नव्या योजनांचा प्रस्ताव आहेत.

नवीन वीजजोडण्यांसह विजेची मागणी दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. त्यामुळे भविष्यवेध घेऊन विजेची वाढती मागणी पूर्ण करणाऱ्या वितरण यंत्रणेचे जागेच्या उपलब्धतेसह नियोजन करावे. तसेच ग्राहकसेवा व तक्रार निवारणातील तत्परता आणखी वाढविण्यासाठी विभाग किंवा उपविभाग कार्यालयांचे विभाजन आवश्यक असल्यास प्रस्ताव पाठवावेत, असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले.

## नवयुग श्रावणी काव्यस्पर्धा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**निगडी :** निगडीतील दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्था सभागृह, निगडी प्राधिकरण येथे नवयुग श्रावणी काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## नवयुगच्या श्रावणी काव्यस्पर्धेत जुबेन अलिफ प्रथम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पिंपरी :** नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ आणि अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाउंडेशन या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३१ व्या नवयुग श्रावणी काव्यस्पर्धेत जुबेन अलिफ यांनी प्रथम क्रमांक पटकावला. दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्था सभागृह, निगडी प्राधिकरण येथे रविवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रोजी ज्येष्ठ कवी अशोक कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा संपन्न झाली. यावेळी नवयुगचे अध्यक्ष राज अहेरराव, सचिव माधुरी ओक, सह सचिव अश्विनी कुलकर्णी, संपतराव शिंदे, दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

काव्यलेखन स्पर्धेत सहभागी झालेल्या सुमारे ९२ कवींपैकी सुमारे ६५ कवींनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कविता सादरीकरण केले. त्यामध्ये जुबेन अलिफ (प्रथम), उमेंद्र बिसेन (द्वितीय), स्मिता धर्माधिकारी (तृतीय), शशिकला देवकर आणि गणेश भुते (उत्तेजनार्थ) क्रमांक मिळाला. विजेत्या कवींना सन्मानचिन्ह, रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि पुष्प प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर सहभागी सर्व कवींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. ज्येष्ठ कवयित्री वर्षा बालगोपाल आणि ज्येष्ठ कवी अरुण कांबळे यांनी परीक्षण केले.

स्पर्धेत सहभागी न झालेल्या कवींच्या प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ कवयित्री राधाबाई वाघमारे यांनी प्रातिनिधिक कविता सादर केली. अध्यक्षपदावरून बोलताना ज्येष्ठ साहित्यिक अशोक कोठारी यांनी जुन्या अभ्यासक्रमातील 'माझी शाळा' ही कविता सादर केली.

## एमआयडीसीची नवी ग्रीन बिल्डिंग अंतिम टप्प्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अर्थात एमआयडीसीची इमारत कात टाकत असून, नव्याने उभारलेल्या बिल्डिंगचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहरात पीएमआरडीए कार्यालय इमारतीनंतर ही दुसरी इमारत ग्रीन म्हणजेच पर्यावरणपूरक असण्याचा मान मिळणार आहे. पार्किंग, पोडियम व त्यावरती चार मजली इमारत असे स्ट्रक्चर असणार आहे. लवकरच या ठिकाणी सर्व विभाग एकत्र येऊन कामकाज सुरू होईल. त्यामुळे उद्योजकांना विविध कामासाठी हेलपाटे मारावे लागणार नाहीत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) चिंचवड स्टेशन परिसरातील जुन्या इमारतीची क्षमता संपुष्टात आली आहे. तसेच एमआयडीसीचा वाढता ताण आणि त्या अनुषंगाने वाढलेले विभाग यासाठी हे कार्यालय अपुरे पडत होते. त्यामुळे नवी इमारत उभारण्याचा मानस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. आता जुनी इमारत पाडली असून, या ठिकाणी नवी इमारत उभारण्यात आली आहे. तेथून उद्योजकांना विविध सुविधा पुरविल्या जाणार आहेत. यामुळे एमआयडीसी विकासाला हातभार लावेल.

उद्योगांची झपाट्याने होणारी वाढ लक्षात घेता १९६० मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम आय डी सी) कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. चिंचवडमधील या कार्यालयाच्या बैठ्या एकमजली इमारतीत विविध विभागीय, उपविभागीय कार्यालये, लेखा व वित्त विभाग असे विभाग विखुरलेल्या स्वरूपात होते. त्यात २०० पेक्षा अधिक कर्मचारी काम करीत आहेत. या जुन्या इमारतीमधून पिंपरी-चिंचवड, तळेगाव, चाकण, उपविभागीय कार्यालयाच्या औद्योगिक क्षेत्राचे कामकाज चालत होते. या सर्व औद्योगिक क्षेत्रांसाठी मूलभूत सुविधा, औद्योगिक क्षेत्रामधील भूखंडांसाठी इमारत परवाना, भोगवटा प्रमाणपत्र, पाणीपुरवठा अशी कामे केली जात होती. या इमारतीला तब्बल ६० वर्ष झाली असून तिची क्षमता संपल्यामुळे ती पाडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आता या ठिकाणी अद्यावत इमारत बांधण्यात आली असून, त्याचे जवळपास ७० ते ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या इमारतीसाठी जवळपास २१ कोटी खर्च अपेक्षित आहे. लवकरच या ठिकाणी सर्व विभाग एकत्र येणार असून, एकाच ठिकाणी उद्योजकांची कामे पूर्ण होणार आहेत.

## शहरातील ३ हजार ९८५ तक्रार अर्जांचा निपटारा

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** आयुक्तालयाच्या हद्दीतील नागरिकांच्या तक्रारींचे विविध माध्यमातून तक्रारी प्राप्त होत असतात. या तक्रारी अर्जासंदर्भात मुदतीत योग्य कार्यवाही करून अर्जांचा निपटारा करणे अपेक्षित आहे. तक्रारी अर्जांची वेळेत कार्यवाही न झाल्याने सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत असते. त्या अनुषंगाने नागरिकांशी थेट संवाद साधता यावा व तक्रारदार यांची गैरसोय न होता त्यांच्या तक्रारीचे वेळेत निरसन व्हावे. यासाठी आयुक्त विनयकुमार चौबे यांनी आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यात प्रत्येक महिन्याच्या दर शनिवारी सकाळी साडेदहा ते दुपारी दोन या वेळेत पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी यांच्या उपस्थितीत तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्याबाबत आदेश दिले आहेत.

या उपक्रमाचे दर शनिवारी आयोजन केले जात आहे. १८ मे २०२४ पासून सुरू झालेल्या या तक्रार निवारण दिन उपक्रमात आत्तापर्यंत विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३ हजार ९८५ तक्रार अर्जांचा निपटारा झाला आहे

## १९ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

# शहर पोलीस दलात मोठी उलथापालथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहर पोलीस दलात मोठी उलथापालथ झाली आहे. शहर पोलीस दलातील १९ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. त्यासह पाच सहाय्यक पोलीस निरीक्षक, सहा पोलीस उपनिरीक्षक यांचीही बदली झाली आहे. त्याचबरोबर चार अधिकाऱ्यांना नियंत्रण कक्ष तसेच पोलीस मुख्यालय येथे संलग्न करण्यात आले होते. त्यांचे आदेश रद्द करत त्यांना मूळ ठिकाणी पाठवण्यात आले आहे. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत.

नियंत्रण कक्षातील नऊ पोलीस निरीक्षकांची पोलीस स्टेशन आणि विशेष शाखेत नेमणूक करण्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांना नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले होते. ते आदेश रद्द करून त्यांच्या नेमणुकीच्या मूळ ठिकाणी चिंचवड पोलीस स्टेशन येथे पाठवण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक सतेज जाधव यांची मुख्यालय येथे संलग्न करण्यात आले होते. ते आदेश रद्द करून नेमणुकीच्या मूळ ठिकाणी हिंजवडी वाहतूक विभाग येथे पाठवण्यात आले.



पिंपरी पोलीस स्टेशन ते वाकड पोलीस स्टेशन अशी बदली झाली होती. ती बदली रद्द करण्यात आली आहे.

**नेमणूक केलेले पोलीस निरीक्षक (नेमणुकीचे ठिकाण)**

- **विश्वनाथ चव्हाण** (भोसरी पोलीस स्टेशन)
- **बापू ढेरे** (दिघी पोलीस स्टेशन)
- **संदीप घोरपडे** (विशेष शाखा)
- **नीता गायकवाड** (वाकड पोलीस स्टेशन)
- **नाथा धार्गे** (चाकण पोलीस स्टेशन)
- **दीपक गोसावी** (चिंचवड पोलीस स्टेशन)
- नि**लेश वाघमारे** (निगडी पोलीस स्टेशन)
- **रणजीत जाधव** (तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन)
- **अरविंद पवार** (विशेष शाखा)

#रा

## दररोज पाणीपुरवठा करण्याची नागरिकांची मागणी

# धरणे भरली, पण पुरवठा दिवसाआडच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चिंचवडकरांची तहान भागवणाऱ्या पवना धरणात ९८ टक्के पाणीसाठी जमा झाला आहे तर आंद्रा धरण शंभर टक्के भरले आहे. दोन्ही धरणांत वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा झाल्यानंतर आता दररोज पाणीपुरवठा करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. मात्र, शहराची लोकसंख्या दुपटीने वाढली असून नागरीकरण झपाट्याने होऊन पाण्याची मागणी वाढत आहे. भामा-आसखेड प्रकल्पाची कामे पूर्ण होण्यास वेळ लागणार आहे. शहराला समन्यायी पध्दतीने पाणीपुरवठा करण्यात येत असून महापालिकेकडून पाणीपुरवठा दिवसाआडच सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे.



पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारी पवना आणि आंद्रा धरणे तुडुंब भरली आहेत. त्यामुळे दिवसाआडऐवजी दररोज पाणीपुरवठा करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. मात्र, गेल्या दहा ते पंधरा वर्षांत लोकसंख्या दुपटीने वाढली आहे. महापालिकेची पाणीपुरवठा यंत्रणा जुनीच आहे. नवीन जलवाहिन्या टाकण्यासह भामा-आसखेड पाणी योजना प्रकल्पाचे काम संथगतीने सुरू आहे. त्यामुळे पवना, आंद्रा धरणे भरली, तरीही शहरवासियांना पाणी दिवसाआडच मिळणार आहे.

शहरातील वाढलेली लोकसंख्या विचारात घेऊन राज्य सरकारकडून आंद्रा धरणातून शंभर आणि भामा-आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) प्रतिदिन पाणी कोटा मंजूर केला आहे. दोन्ही प्रकल्पांची कामे सुरू आहेत. आंद्राचे पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून गेल्या वर्षापासून उचलले जात आहे. भामा-आसखेड पाणी योजनेचे काम संथगतीने सुरू आहे. ही कामे संथगतीने सुरू असून ठेकेदाराला महापालिकेने नोटीस दिली आहे. सद्यस्थितीत पवना धरण ९८ टक्क्यांपेक्षा अधिक आणि आंद्रा धरण शंभर टक्के भरले आहे. त्यामुळे दिवसाआडऐवजी दररोज पाणीपुरवठा करण्याची मागणी होत आहे.

**असे आहे पालिकेचे नियोजन**

शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पवना धरणातून नदीपात्रात पाणी सोडले जाते. पवना नदीवरील रावेत बंधाऱ्यातून अशुद्ध पाणी उपसा करून निगडी प्राधिकरण सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रात नेले जाते. तिथे प्रक्रिया करून शहरात पाणीपुरवठा केला जातो. मात्र, शहराची भौगोलिक रचना उंच, टेकडी, उतार आणि सखल भाग आहे. निगडी जलशुद्धीकरण प्रकल्पातून शहराच्या अनेक भागात पाणीपुरवठा करावा लागतो. काही भाग लांब अंतरावर तर काही भाग चढ-उतार भागावर आहे. त्यामुळे सर्व भागात समान पाणीपुरवठा होत नाही. काही ठिकाणी प्रमाणापेक्षा अधिक तर, काही ठिकाणी अपुरा, कमी दाबाने, अत्यल्प प्रमाणात पाणी मिळत होते. याकरिता समन्यायी पध्दतीने पाणीपुरवठा करण्यासाठी दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तो गेली पाच वर्षांपासून सुरू आहे.

> "पवना, आंद्रा धरणे भरलेली आहेत. त्यामुळे शहराला वर्षभर पाणी पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. आता दररोज पाणीपुरवठा करावा म्हणून नागरिकांची मागणी होत आहे. मात्र, पालिकेची पाणी जलशुध्दीकरण प्रक्रियेची क्षमता दरवर्षी इतकीच आहे. शहराची लोकसंख्या दुपटीने वाढली आहे. पाण्याची मागणी देखील वाढत आहे. समन्यायी पाणी वितरणासाठी पाच वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाण्याबाबत नागरिकांच्या तक्रारी कमी झाल्या आहेत. आंद्राचे पाणी घेतले जात आहे. भामा-आसखेड प्रकल्पाचे काम सुरू आहे."
>
> **— श्रीकांत सवणे,**
> मुख्य अभियंता, महापालिका

**दररोज शहराला मिळणारे पाणी**

- पवना धरणातून प्रतिदिन सरासरी ५२० एमएलडी पाणी उचलले जात आहे
- आंद्रा धरणातून प्रतिदिन सरासरी ७० ते ८० एमएलडी पाणी उचलले जात आहे
- एमआयडीसीकडून प्रतिदिन १५ ते २० एमएलडी पाणी घेतले जात आहे

**धरणातील पाणीसाठा (टक्क्यांत)**

- **पवना / ९७.८९**
- **आंद्रा / १००.००**
- **भामा-आसखेड / ९६.२७**

Selected



## घरावर तिरंगा ध्वज फडकवावा, महापालिकेचे आवाहन

**पिंपरी :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त नागरिकांच्या मनात देशभक्तीची भावना आणि राष्ट्रध्वजाबद्दल जनजागृती करण्यासाठी यावर्षीही राज्य शासनाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत शहरातील सर्व नागरिकांनी 'घरोघरी तिरंगा' या उपक्रमातंर्गत घरावर तिरंगा ध्वज फडकवावा असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी शहरवासीयांना केले आहे.

तसेच या उपक्रमासाठी नागरिकांसाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये नाममात्र शुल्कामध्ये ध्वज उपलब्ध करून देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. याव्यतिरिक्त, "घरोघरी तिरंगा" मोहीम राबवण्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या वतीने मार्गदर्शन सूचना जारी करण्यात आल्या आहे. त्यानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी दिलेल्या सूचनांचे पालन करून विविध उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी तात्काळ नियोजन करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

या मोहिमेअंतर्गत तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे विविध कार्यक्रम महापालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरात राबविण्यात येत असल्याची माहिती महापालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

## रंगारंग रनवे-२०२४ मध्ये विविध फॅशनेबल कपड्यांची प्रस्तुती



**पिंपरी :** फॅशन, ब्यूटी ग्लॅमर अशी टॅगलाईन घेऊन पुण्यात रंगारंग पद्धतीने पार पडलेल्या रनवे-२०२४ मध्ये विविध फॅशनेबल कपड्यांची शानदार प्रस्तुती देण्यात आली. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या फॅशन शोचे आयोजन पल्लवी गोयंका, सोनल जव्हेरी आणि प्रणव जाधव यांच्या वतीने करण्यात आले. विमान नगर परिसरातील नोव्होटेलमध्ये पार पडलेल्या या फॅशन सोहळ्यात राजा डिजायनर स्टुडिओच्या प्रमुख डिझायनर रुची शाह, सीरीच्या डिझायनर सपना अग्रवाल, तसेच रॉयल तष्ट चे संचालक दीपक माने यांच्यासह एकूण पाच डिझायनरद्वारे द्वारे तयार करण्यात आलेल्या फॅशनेबल कपड्यांचे विविध मॉडेल्सनी आकर्षक प्रदर्शन केले. या सोहळ्याला पुण्याच्या फॅशन विश्वातील तज्ञांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या फॅशन शोमध्ये अत्यंत आकर्षक रंग आणि डिझाईन्सच्या कपड्यांची प्रस्तुती देण्यात आली. यामध्ये आधुनिक काळातील कपड्यांसह पारंपरिक भारतीय कपड्यांचा समावेश होता. यामध्ये शेरवानी, सूट, डिझाईनर साड्या यांचा समावेश होता. हे मनमोहक कपडे कुणाही व्यक्तीची सुंदरता आणखी खुलवतील, अशाप्रकारे तयार करण्यात आले होते. या कपड्यांमध्ये रंग आणि डिझाईन्सचा सुंदर मिलाफ डिझानयरनी साधला होता. डिझायनरच्या मेहनतीचे व कौशल्याचे प्रदर्शन या कपड्यांच्या आकर्षकतेवरून होत होते.

## देशभर आनंदाचा प्रसार करण्यासाठी ५३,००० मोफत आईस्क्रीम



**पुणे :** मुंबई येथील देशातील एक सुस्थापित आणि विश्वासप्राप्त ब्रँड असलेल्या अप्सरा आईस्क्रीमने कंपनीच्या ५३व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आज एका नावीन्यपूर्ण उपक्रमाची घोषणा केली. लोकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि स्मितहास्य आणण्यासाठी कंपनी ५३,००० मोफत आईस्क्रीमचे वितरण करणार आहे.'मुस्कान' हा उपक्रम ७८ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्टपासून मुंबई व पुण्यात सुरू होणार आहे. त्यानंतर अन्य शहरांमध्ये टप्प्याटप्प्याने तो सुरू करण्यात येणार आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, या उपक्रमांतर्गत कंपनी ५३,००० आईस्क्रीमचे वितरण करणार आहे. हे सुमारे चार टन आईस्क्रीम आहे. देशातील ९ राज्ये आणि २५ शहरांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येईल. विविध स्वयंसेवी संस्था, अनाथालये, वृद्धाश्रम आणि सरकारी व गैर-सरकारी क्षेत्रांमधील विविध प्रतिष्ठानांमध्ये हे आईस्क्रीम वितरित करण्यात येईल. लायन्स क्लब, लिओ, लायन इंटरनॅशनल, स्वदेस फाऊंडेशन, लिओ इंटरनॅशनल, लिओ क्लब ऑफ अंधेरी अचिव्हर्स, रोटॅरॅक्ट डिस्ट्रिक्ट, श्री नित्यानंद एज्युकेशन ट्रस्ट यासारख्या आघाडीच्या सामाजिक संस्था देखील या उपक्रमाचा एक भाग होणार आहेत. लोकांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटविणे व त्यांना आनंद देणारा स्कूप वाटणे, हे या उपक्रमाचे लक्ष्य आहे.तसेच, त्यांच्या जीवनात विशेषतः स्वातंत्र्यदिनाच्या शुभ प्रसंगी गोडवा आणणे हाही त्याचा उद्देश आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## द्रुतगतीवर प्रवेश बंदमधील वाहनांवर कॅमेऱ्याची नजर

**सोमाटणे :** द्रुतगती मार्गावर प्रवेश बंदमधून वाहने घुसवणाऱ्यांवर कॅमेऱ्याची नजर असून, दंड वाचवण्यासाठी वाहनचालकांनी कुंपण तोडून नवीन प्रवेश मार्ग केला आहे. रस्ते विकास महामंडळाच्या वतीने पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील उर्से टोलनाका व सोमाटणे बाह्यमार्ग



या दोन ठिकाणी वाहने आत व बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका ठेवण्यात आल्या होत्या. परंतु नियमांचे उल्लंघन करून अनेक वाहनचालक टोलचा भुर्दंड व वेळ वाचवण्यासाठी उर्से टोलनाका व सोमाटणे बाह्यमार्ग येथील प्रवेश बंदमधून वाहने चालवत होती. या प्रकारातून येथे अनेक अपघात झाले होते. या अपघातांत गेल्या वीस वर्षात अकरा जणांना जीव गमवावा लागला होता, तर पंधरापेक्षा अधिकजण जखमी झाले होते. ही वाढती अपघाताची संख्या विचारात घेऊन रस्ते विकास महामंडळाच्या वतीने गेल्या आठ दिवसांपूर्वी प्रवेश बंदमधून वाहने घुसवणाऱ्या वाहनांवरील दंडात्मक कारवाईसाठी दोन्ही ठिकाणी इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

या कॅमेऱ्यांमुळे प्रवेश बंदमधून वाहने आत घुसवल्यास अशा वाहनचालकाला दोन हजार रुपयाच्या दंडाची नोटीस घरपोच परिवहन विभागाकडून येते. या दंडात्मक कारवाईचा अनेकांना फटका बसल्याने प्रवेशबंदमधून वाहने घुसवणारे वाहनचालक भयभीत झाले होते. यामुळे काही दिवस वाहने आत घुसवण्याचे प्रकार थांबले होते. परंतु वाहन चालकांनी उर्से टोलनाक्याजवळील पेट्रोलपंपाजवळ संरक्षक कठडा तोडून नवीन प्रवेश मार्ग तयार केला असून, सध्या या अनधिकृत प्रवेश मार्गामधून वाहने घुसविण्याचा प्रकार पुन्हा सुरू झाला आहे.

## संवाद सत्राचे आयोजन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**पिंपरी :** चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

# पालिकेच्यावतीने संवाद सत्राचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना करत असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण क्षमता विकसित करण्यासाठी शाळांमध्ये अनुकूल वातावरण निर्माण करण्यास महापालिका कटिबद्ध आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीची महत्वाची भूमिका राहणार आहे, असे मत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.

चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, उपशिक्षणाधिकारी बुधा नाडेकर, संगत संस्थेच्या समुपदेशन प्रमुख प्राची खांडेपाल तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, महापालिका शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षक उपस्थित होते.

महापालिका शाळांमढील या सर्व योजना व उपक्रमांचा अंतिम उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. त्यामुळे कला, क्रीडा, शिक्षण, नेतृत्व, संशोधन, वैज्ञानिक दृष्टीकोन असे विविध पैलू विद्यार्थ्यांच्या अंगी रुजावेत, त्यांच्या अंगी जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी विविध उपक्रम नवनवीन संकल्पना राबवून पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी महापालिका आणि शिक्षण विभाग कटीबद्द आहे, असे ते म्हणाले.

महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सामाजिक, भावनिक, शारीरिक आणि विकासात्मक गरजा समजून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## ९२ कोटी रुपयांच्या निविदा अखेर रद्द

# शहरातील रस्त्यांच्या कामात रिंग!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या प्रशासकीय राजवटीत अंदाधुंद कारभार सुरू आहे. शहरातील रस्त्यांच्या ९० कोटींच्या नऊ कामांवर विविध आक्षेप नोंदवण्यात आले होते. त्या कामातील त्रुटींची तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे स्थापत्य विभागाकडून पडताळणी सुरू केली. या कामामध्ये ठेकेदार कंपनीची कागदपत्रे, टर्न ओव्हर, बँकेची कागदपत्रे तपासली गेली. ठेकेदार संस्थांच्या अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यामुळे चिंचवडमधील चार रस्ते कामात ठेकेदार कंपन्या दोषी आढळल्याने सुमारे ९२ कोटी रुपयांच्या निविदा अखेर रद्द करण्यात आल्या आहेत. त्या रस्ते कामाच्या फेरनिविदा काढण्यात येणार आहेत.



महापालिकेने चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नऊ रस्त्यांच्या कामासाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत रिंग झाल्याचा आरोप झाला होता. महापालिकेच्या निविदाप्रक्रियेत अटी-शर्तींची पूर्तता करत नसताना काही ठेकेदार पात्र, तर पात्र असूनही काहींना अपात्र करण्यात आल्याचा आरोप झाला होता. काही ठेकेदारांनीच या प्रकरणात आयुक्तांकडे तक्रार केली होती. तसेच, निविदेत खोट्या कागदपत्रांच्या व बोगस अनुभवाच्या आधारे ठेकेदारांना पात्र करण्यात आले. त्यामुळे सखोल चौकशी करून संगनमताने अनियमितता आढळलेल्या सल्लागार, ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली होती. आरोपानंतर शहर अभियंता मकरंद निकम यांनी या कामांची पडताळणी सुरू केली. याबाबत रस्त्यांच्या कामात शेकडो आक्षेप नोंदवून त्या निविदांमधील त्रुटी देखील निदर्शनास आणून दिल्या. काही पात्र ठेकेदारांनी खासगी विकासकांकडे काम केल्याचा पुरावा दाखल केला होता. अनेक कामाचे पुरावे व प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत.

९२ कोटी रुपयांच्या रस्ते विकासकामात काही पात्र ठेकेदारांकडे कामाचा अनुभव, पात्रता नाही. निविदा अटी-शर्थीनुसार कामास लागणारी यंत्रसामग्री नाही. तरीही त्या ठेकेदार कंपनीला काम मिळाले होते. तसेच काही ठेकेदारांनी बोगस कागदपत्रे जोडली असून संबंधित ठेकेदारांकडे प्लांट मशिनरी मालकीची आहे की नाही, त्याचे ठोस पुरावेही जोडले नाहीत. याशिवाय निविदा अटी-शर्थीनुसार २६ अ बँक स्टेटमेंट, कामाच्या बिल फॉर्मची चौकशी केलेली नव्हती. त्यामुळे रस्ते रिंग प्रकरणाची चौकशी करून निविदा रद्द करावी. खोटी कागदपत्रे सादर करणारे ठेकेदार, त्यांची तपासणी करणारे सल्लागार व अधिकारी यांचे संगनमत असेल, तर त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी काही ठेकेदारांकडून आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे करण्यात आली होती. दरम्यान, रस्ते कामाच्या नऊपैकी चार कामाच्या निविदा रद्द करण्यात आलेल्या आहेत. तर इतर कामांचीदेखील तपासणी करण्यात आली. परंतु, त्या ठेकेदार कंपन्यांची कागदपत्रे पडताळणीत योग्य असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे दोषी आढळलेल्या चार कामांच्या फेरनिविदा काढण्याची प्रक्रिया स्थापत्य विभागाकडून करण्यात येत आहे.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घ्या

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** वय वर्षे ६५ व त्यावरील वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानानुसार येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य, उपकरणे खरेदी करता यावीत तसेच मन:स्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र इत्यांदीद्वारे त्यांचे मानसिक आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन प्रशिक्षणाकरिता मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. या जास्तीत जास्त लाभार्थींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी केले.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गत ६५ वर्षे व त्यावरील वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना एकावेळ एकरकमी रक्कम रुपये ३ हजार डीबीटीद्वारे थेट बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

## मोशीतील ७० एकमध्ये उभारणार सुसज्य इमारत

# पिंपरी-चिंचवडलाही होणार आयआयएम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आयआयएम नागपूर ची शाखा भोसरी येथील मोशी भागात सुरू करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या ७० एकर जागा आरक्षित करण्यास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे आता आयआयएम पिंपरी-चिंचवडमध्येही सुरू होणार आहे. मुंबई येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, यासह भोसरी विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रकल्पांना यावेळी मंजुरी आणि गती देण्यात आल्याचे आमदार महेश लांडगे यांनी कळवले आहे. मुंबईत झालेल्या बैठकीला पुणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, नगररचना विभागाचे संचालक प्रसाद गायकवाड यांच्यासह राज्य शासनाच्या विविध विभागाचे अप्पर सचिव, महसूल विभागाचे संचालक आणि अधिकारी उपस्थित होते. भोसरी विधानसभा मतदारसंघातील होऊ घातलेल्या अनेक विकास प्रकल्पांना गती या बैठकीत देण्यात आली. तसेच काही नियोजित प्रकल्पांसाठी जमिनी आरक्षित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आल्याचे आमदार लांडगे यांनी कळवले आहे. आयआयएम बरोबरीनेच पुढील निर्णय या बैठकीत घेण्यात आले आहेत.

- पिंपरी-चिंचवडमध्ये रेड झोन, ब्ल्यू लाईनसारख्या प्रतिबंधित क्षेत्रासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) व वार्षिक मूल्यदर निर्देशांकमध्ये सुधारणा करणेबाबत नोटिफिकेशन काढण्याच्या सूचना नगरविकास विभागाला दिल्या आहेत.
- पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील गृहयोजनेतील १ ते ४२ पेठांमधील ११ हजार २२३ सदनिका पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना नगरविकास विभागाला दिल्या आहेत.
- पुणे-पिंपरी-चिंचवडमधील वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक प्रवासी वाहतूक सक्षम करण्यासाठी मेट्रोच्या नवीन मार्गाचा विस्तार करण्याबाबत 'डीपीआर' करावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.
- पिंपरी-चिंचवडमधील डुडूळगाव येथील वनक्षेत्रावर इको टूरिझम पार्क विकसित करणेबाबत १५ दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.
- पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय भवन उभारण्यासाठी नवीन इमारत बांधकाम प्रशासकीय बांधकाम मान्यता व निधीबाबत प्रस्तावास मान्यता देण्याचे आश्वासन दिले आहे.

#रा

## शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण : नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

# 1 हजार 698 कोटी 70 लाख रुपये जमा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्यावतीने सुरू केलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजना राज्यात १ डिसेंबर २०१८ पासून राबविण्यास मान्यता देण्यात आली. त्याला जोड म्हणून राज्य शासनानेही ३० मे २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजना' राबविण्यास मान्यता देऊन त्याप्रमाणे योजनेची सुरुवात केली. या दोन्ही योजनांचे मिळून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण १ हजार ६९८ कोटी ७० लाख रुपये जमा झाले आहेत.




लाभ घेण्यास पात्र व्यक्ती या योजनेंतर्गत ज्या कुटुंबाचे (पती-पत्नी व त्यांचे १८ वर्षाखालील अपत्य) लागवडीलायक एकूण धारण क्षेत्र २ हेक्टरपर्यंत आहे अशा पात्र शेतकरी कुटुंबियांस २ हजार रुपये प्रती हप्ता याप्रमाणे तीन हप्त्यात एकूण ६ हजार रुपये प्रतीवर्षी लाभ देण्यात येतो. लाभार्थ्यांना द्यावयाच्या लाभाची गणना केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येते. लाभ मिळण्यास अपात्र व्यक्ती या योजनेकरीता जमीन धारण करणारी संस्था, संवैधानिक पद धरण करणारे किंवा केलेले आजी माजी मंत्री, राज्यमंत्री, खासदार, राज्यसभा सदस्य, विधानसभा, विधानपरिषद सदस्य, महापौर, जि. प. अध्यक्ष तसेच केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त अधिकारी, कर्मचारी, शासन अंगीकृत निमशासकीय संस्थेच्या अखत्यारितील कार्यालयातील आणि स्वायत्त संस्थांचे तसेच स्थानिक स्वराज संस्थांमधील नियमित अधिकारी, कर्मचारी, मागील वर्षी आयकर भरलेली व्यक्ती, ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन १० हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक असणारे निवृत्तीवेतनधारक, नोंदणीकृत व्यवसायिक डॉक्टर, वकील, अभियंता, सनदी लेखापाल, वास्तुशास्त्रज्ञ आदी क्षेत्रातील व्यक्ती लाभ मिळण्यास अपात्र आहेत.

शेतकऱ्यांच्या खात्यात १ हजार ४५० कोटी ५० लाख रुपये जमा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत जिल्ह्यात ४ लाख ३४ हजार ५१ शेतकरी पात्र आहेत. त्यांच्या बँक खात्यात आजपर्यंत १ हजार ४५० कोटी ५० लाख रुपयांचा लाभ जमा करण्यात आला आहे. आंबेगाव तालुक्यात ३६ हजार ९०३ शेतकऱ्यांच्या खात्यात १०९ कोटी ३० लाख रुपये, बारामती-५१ हजार २७ शेतकरी १७३ कोटी ७० लाख, भोर- २४ हजार ९७० शेतकरी ७७ कोटी, दौंड ४२ हजार ६०६ शेतकरी १४६ कोटी ५० लाख, हवेली- १० हजार ५५१ शेतकरी ४३ कोटी ५० लाख, इंदापूर ४७ हजार ३२ शेतकरी १६३ कोटी, जुन्नर- ५२ हजार ५८६ शेतकरी १७३ कोटी ८० लाख, खेड- ४४ हजार ५४५ शेतकरी १४८ कोटी २० लाख, मावळ- १७ हजार ५३२ शेतकरी ५७ कोटी ५० लाख, मुळशी- १३ हजार १४७ शेतकरी ५६ कोटी ५० लाख, पुरंदर- ३१ हजार ९४२ शेतकरी ९७ कोटी ९० लाख, शिरुर- ५२ हजार ४५० शेतकरी १७३ कोटी ४० लाख आणि वेल्हे तालुक्यात ८ हजार ७६० शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ३० कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात आले आहेत.

पीएम-किसानला राज्य शासनाच्या 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'ची जोड प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा आणि 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजना' राबविण्याचा निर्णय ३० मे २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

## गर्दीच्या ठिकाणची अतिक्रमणे हटवून वाहतुक नियंत्रणासाठी 'नायलॉन दोरी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** शहरात गर्दीने गजबजलेल्या रस्त्यांचा श्वास मोकळा करण्यासाठी आणि बारामतीकरांना मार्ग मोकळा करण्यासाठी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी अनेक मुख्य रस्त्यांवर आणि गर्दीच्या ठिकाणांवरची अतिक्रमणे मागे सारत वाहतूक नियंत्रणासाठी 'नायलॉन दोरीचा' प्रयोग राबवत बारामतीकरांनाच नव्हे तर या ठिकाणी अनेक जिल्ह्यातून येणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळवून दिला आहे.

आता पुन्हा एकदा बारामती शहरातील प्रसिद्ध असलेल्या पूनावाला बाग गार्डनसमोरील अतिक्रमणे मागे सरकावत त्या ठिकाणी असलेल्या अस्ताव्यस्त वाहतुकीला नियंत्रणात आणले आहे.पूनावाला गार्डन परिसराच्या रस्त्यावर मोठी गर्दी असते त्यामुळे असंख्य अस्ताव्यस्त वाहनांनी हा रस्ता अक्षरशः ठप्प होतो. यावर आजपर्यंत कोणतीही ठोस उपाययोजना झाली नसल्याने हा प्रश्न कायम भेडसावत होता. याबाबत अनेक नागरिकांच्या तक्रारी देखील होत्या. या गार्डन परिसरात मुला-मुलींची आणि महिलांची मोठी वर्दळ असते. त्यांना ये-जा करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत होती.

शहरातील अनेक गर्दीच्या ठिकाणांवरील वाहतूक नियंत्रणात आणत आता पूनावाला गार्डन येथील वाहतुकीचा प्रश्न हाती घेत पोलीस निरीक्षक यादव यांनी ही कारवाई केली आहे.दि. ११ रोजी सकाळीच १० ते दुपारी २ या कालावधीत पोलीस निरीक्षक यादव यांनी नगरपालिकेला मदतीला बरोबर घेत ही मोहीम यशस्वीरीत्या राबवली. ही मोहिम राबवताना यादव यांनी सर्व दुकान धारकांना कारवाईबाबत माहिती दिली. त्यांना लोकांना होत असलेल्या अडचणींबाबत समजावून सांगितले. या रस्त्यावर असलेली अतिक्रमित सर्व दुकाने मागे घेतली. वाहनचालकांनी आपली वाहने रस्त्यावर लावू नयेत यासाठी नगरपालिका व वाहतुक पोलिसांच्या मदतीने वाहतुकीचे अंतर ठरवून नायलॉन दोरी ठोकण्यात आली.ही दोरी म्हणजे वाहतुकीची 'लक्ष्मण रेषाच' आहे. जी वाहने या दोरीला बाहेर जातील त्या वाहणावर दांडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### कारवाई

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**बारामती :** पूनावाला गार्डन परिसराचा श्वास झाला मोकळा; बारामती वाहतूक पोलिसांची नगरपालिकेच्या मदतीने कारवाई

## विद्युत प्रवाह खंडित झाल्याने शेतकरी हैराण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागात अपटाळे येथील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ येथून सातत्याने विद्युत पुरवठा खंडित होत असून शेतकरी त्रस्त तर विद्युत कर्मचारी सुस्त अशी परिस्थिती सध्या पहावयास मिळत आहे. दिवसाही अनेक वेळा विद्युत प्रवाह खंडित होत असून अनेकदा 11 ते 12 तास रात्री विद्युत पुरवठा या भागात बंद असतो. दिवसभरात अनेकदा विद्युत पुरवठा अचानक चालू बंद होत असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या मोटारी तसेच घरातील उपकरणे नादुरुस्त झालेले आहेत. तर अनेक गावांमध्ये वायरमन नसल्याने ट्रान्सफॉर्मर वरील कामे शेतकऱ्यांनाच कामे करावी लागत आहेत. ही दुरुस्तीची कामे करत असताना जर अनपेक्षित घटना घडली तर याला सर्वस्वी जबाबदार विद्युत महामंडळ राहील का? असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे.

हा विभाग बिबटप्रवण क्षेत्र असल्यामुळे रात्री मोठ्या प्रमाणावर या भागात बिबट्यांचा वावरही आहे. यापूर्वी विद्युत पुरवठा खंडित झाला तर रात्री उशिरापर्यंत विद्युत पुरवठा सुरळीत केला जात होता, परंतु अलीकडच्या काळात रात्री विद्युत पुरवठा खंडित झाला तर तो दुरुस्त होण्यासाठी दहा ते बारा तासांचा वेळ लागतो.

## मानवी तिरंग्याचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्ताने गुरुवार दि 15 रोजी शिवजन्मभूमी शिवनेरी च्या पायथ्याशी जुन्नर मधील बुट्टे पाटील विद्यालय प्रांगणामध्ये सकाळी 10 वाजता मानवी तिरंगा उभा केला जाणार असून जुन्नर मध्ये पहिल्यांदाच हा उपक्रम संपन्न होणार असल्याची माहिती संयोजक माजी आमदार शरद सोनवणे यांनी दिली. तिरंगा भारताची आन बान शान असून मानवी तिरंगा या उपक्रमातून मातृभूमी चा सन्मान केला जाणार असल्याचे या उपक्रमाचे आयोजक शरद सोनवणे यांनी स्पष्ट करीत शिवनेरी गडाच्या पायथ्याशी असलेल्या बुट्टे पाटील विद्यालयाच्या प्रांगणात गुरुवारी सकाळी 10 वाजता या विद्यालयातील सुमारे 2300 मुला मुलींच्या सहभागातून हा मानवी तिरंगा उपक्रम होणार आहे.

## राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने दि. २३ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेव टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी दिली. महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस 'प्रेरणा दिन' म्हणून साजरा होतो. त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वक्तृत्व शैलीचा आविष्कार दाखवण्याची संधी मिळते. स्पर्धेचे हे ३३ वे वर्ष असून, वरिष्ठ व कनिष्ठ गटात स्वतंत्रपणे स्पर्धा होत आहे. वरिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय वारी : एक आनंदयात्रा, विनोदाचे मानवी जीवनातील स्थान, स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक आणि आजचा तरुण, रिल्स स्वैराचाराला आमंत्रण देतात का ? असे आहेत. तर कनिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय छत्रपती शाहू महाराज आणि सामाजिक क्रांती, आजचा विद्यार्थी : उद्याचा नागरिक, आरोग्यम् धनसंपदा, बाप : कुटुंबाचा आधारवड हे आहेत.स्पर्धेसाठी दोन्ही गटांत वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे आहेत. त्यात रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा राज्यस्तरीय असल्याने महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांनी आपला दोन्ही गटांसाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवण्याचे आवाहन केले आहे.

POSITIVE NEWS!

शिक्रापूर

आरोग्याशी खेळ



## पाण्याच्या सीलबंद बाटलीमध्ये चक्क मच्छर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** नागरिक हे आपले आरोग्य चांगले रहावे यासाठी शुद्ध पाणी हे विकत घेऊन पीत असतात मात्र सध्या अनेक ठिकाणी शुद्ध पाण्याच्या व्यवसाय तेजीत चाललेला असताना याकडे कोणाचे नियंत्रण नसल्याचे दिसत असून शिक्रापूर परिसरात चक्क स्प्लॅशर अॅक्वा कंपनीच्या पाण्याच्या सीलबंद बाटलीमध्ये मच्छर आढळून आल्याने खळबळ उडाली असून पाणी विक्रेत्या कंपनीकडून चक्क नागरिकांच्या आरोग्याशी खेळले जात असल्याचे दिसत आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील एका दुकानात ग्राहकाने पिण्यासाठी स्प्लॅशर अॅक्वा कंपनीच्या पाण्याची बाटली घेतली असता त्या बाटली मध्ये चक्क एक मच्छर असल्याचे दिसून आल्याने ग्राहकाने दुकानदाराला दमदाटी करत दुसरे दुकान गाठले, मात्र पिण्यासाठी घेतलेल्या शुध्द पाण्याच्या सीलबंद बाटलीमध्ये मच्छर निदर्शनास आल्याने खळबळ उडाली आणि नागरिकांनी संताप व्यक्त केला, तर सदर दुकान दाराने याबाबत तातडीने कंपनीच्या विक्रेत्या सोबत संपर्क साधला असता त्याला उडवाउडवीची उत्तरे देण्यात येऊ लागली, त्यामुळे सीलबंद पाणी बाटलीच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केला जाऊ लागला आहे, तर स्प्लॅशर अॅक्वा सारख्या नामांकित कंपनीच्या पाणी बाटलीमध्ये चक्क मच्छर आढळून येत असल्याने याकडे अन्न व औषध प्रशासनाने चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी नागरिक करत आहे. शिक्रापूर येथे घडलेल्या या प्रकाराबाबत आमच्या प्रतिनिधीने स्प्लॅशर अॅक्वा कंपनीचे व्यवस्थापक कुमार टाकळकर यांच्याशी संपर्क साधला असता नजरचुकीने असे घडले असेल यापुढे योग्य काळजी घेऊ असे हास्यास्पद उत्तर कुमार टाकळकर यांनी दिले.शिक्रापूर येथील पाण्याच्या बाटलीच्या घडलेल्या या प्रकाराबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्न सुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर यांच्याशी संपर्क साधला असता सदर प्रकाराबाबत माहिती घेण्याचे काम सुरु असून चौकशी करुन कारवाई केली जाईल असे क्रांती बारवकर यांनी सांगितले.

## परिस्थितीशी झगडत जलसंपदा अधिकारी

# शेतकरी कुटुंबातील विनय डफळची प्रेरणादायी कहाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** धामारी ता. शिरुर येथील विनय डफळ या परिस्थितीशी झगडत शेती करुन जिद्दीने अभ्यास करत महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या सरळ सेवा भरतीची परीक्षा देऊन नुकताच यशस्वी होत जलसंपदा विभागाचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अधिकारी झाला आहे.



धामारी ता. शिरुर येथील विनयच्या यशाबद्दल त्याचा सन्मान करताना आई वडील.

धामारी ता. शिरुर येथील विलास डफळ व शारदा डफळ या शेतकरी दांपत्याच्या घरात विनयचा जन्म झाला, डफळ कुटुंबियांची परिस्थिती जेमतेम असल्याने ते मुलांच्या शिक्षणासाठी पेरणे ता. हवेली या विनयच्या मामाच्या गावी राहू लागले पेरणेत विनयने पहिली ते पाचवीचे शिक्षण घेतले त्यांनतर डफळ कुटुंब धामारीत आले, दरम्यान विनयने परिस्थितीची जाणीव ठेवत आपल्या आई वडिलांना शेतीमध्ये हातभार लावत शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करुन पाचवी ते दहावीचे शिक्षण धामारीत घेऊन दिवेआगर व आयओके कॉलेज पिंपळे जगताप येथे पदवीचे शिक्षण घेतले, शिक्षणादरम्यान घरी आई वडिलांना शेतीच्या कामांना मोठा हातभार लावून केंदीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी विनय करत असताना त्याने नुकतेच महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या सरळ सेवा भरती २०२४ ची परीक्षा देत आपले नशीब आजमावले असताना सदर परीक्षेचा निकाल जाहीर होऊन विनय जलसंपदा विभागाचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अधिकारी पदी नियुक्त झाला असल्याचे त्याच्या या जिद्द व यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

> युवकांनी परिस्थितीची जाणीव ठेवून जिद्दीने अभ्यास केल्यास यश नक्कीच मिळते फक्त युवकांनी जिद्द ठेवली पाहिले असे
>
> -विनय डफळ

#रा

## » Selected



### ग्रामपंचायत माध्यमातून रस्त्यांच्या कामाचे उद्घाटन

**भिगवण :** भिगवण ग्रामपंचायतीच्या वतीने वार्ड नंबर १ व २ येथे रस्त्याच्या कामाचे उद्घाटन करण्यात आले. विशेष रस्त्याच्या कामाचे उद्घाटन करण्याचा मान गाव पुढारी बरोबरच ग्रामस्थांना देण्यात आला या कृतीने सरपंच प्रतिनिधी तुषार क्षीरसागर उपसरपंच प्रतिनिधी जावेद शेख यांचे उद्घाटन प्रसंगी ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. करण्यात येत असणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी दहा लाख रुपयांचा निधी जिल्हा नियोजन मधून माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या माध्यमातून हे विकास काम मार्गी लागत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बिराज माने यांचे घर ते प्रसाद बोगावत घर तर मोतीकर ते शंकर आण्णा गायकवाड घर असे उद्घाटन करण्यात आलेल्या कामाचे स्वरूप आहे. या कामाच्या उद्घाटन नारळ फोडण्याचा मान बिराज माने, प्रदीप बोगावत, निखिल बोगावत, अमोल शिंदे, प्रसाद बोगावत, खंडेराव नाझरकर, अण्णासाहेब धवडे, लहूजी घोलप, शहाजी गाडे, सचिन शेलार, आकाश उंडाळे विशाल पाचांगणे आदी ग्रामस्थांना देण्यात आला. यावेळी भिगवण ग्रामपंचायतीचे सदस्य पराग जाधव, संजय देहाडे, सचिन बोगावत प्रदीप वाकसे, संजय रायसोनी, गुरप्पा पवार, सत्यवान भोसले, कॉन्ट्रॅक्टर खरात उपस्थित होते. यावेळी सर्वसामान्य ग्रामस्थांना विकास कामांचा नारळ फोडण्याचा देण्याचा मान देण्यात आल्याने लहुजी घोलप यांनी याविषयी समाधान व्यक्त केले.

### साबळे फार्मसी महाविद्यालय सासवड येथे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम घेण्यात आला



**जेजुरी :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका महाविद्यालय सासवड येथे ५ दिवसीय शैक्षणिक परिवर्तन: NEP युगात नाविन्यपूर्ण शिक्षणप्रणाली शोधणे या विषयावर राष्ट्रीय पातळीवर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन करण्यात आले. शैक्षणिक धोरणात होणारे बदल आणि त्या बदलांच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी लागणाऱ्या उपाय योजना या साठी या कार्यशाळेचे आयोजन केले गेले. या प्रोग्रॅम साठी प्रमुख पाहुणे म्हून डॉ. संजीव सोनावणे -कुलगुरू यशवंराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे लाभले. तसेच या कार्यक्रमामध्ये ५ दिवस अनुक्रमे डॉ.रमेश डायस - एचओडी, फार्मसी शासकीय महाविद्यालय, कराड यांनी प्रभावी अध्यापनासाठी सर्वोत्तम पद्धती, डॉ कुलदीप बनसोड - शासकीय फार्मसी महाविद्यालय, कराड यांनी प्रगत अध्यापनशास्त्र, डॉ.एस. बी.भिसे संचालक के. एल. के कन्सल्टन्ट यांनी फार्मसी शिक्षकांसाठी नवीन शैक्षणिक धोरणातील आव्हाने, डॉ. प्रशांत अरगडे, वरिष्ठ व्याख्याते, शासकीय पॉलिटेक्निक, जळगाव यांनी आयसीटी-नवीन शैक्षणिक धोरण 2020 चे अनुपालन, डॉ.एस.डी.सावंत, संचालक, रिजनल इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल अँड न्युजिंग सायन्सेस (RIPANS), ऐझ्वॉल, मिझोराम यांनी शैक्षणिक नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन, डॉ.ए.पी.पवार -कॉलेज ऑफ फार्मसी भरती विद्यापीठ पुणे यांनी शैक्षणिक धोरण 2020: अभ्यासक्रमाचे पैलू, डॉ अन्वर शेख, प्राध्यापक आणि एचओडी, अलाना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे यांनी शिक्षण प्रक्रियेसाठी आधुनिक आयसीटी साधने, डॉ.एस.ए.पोलशेट्टीवार, प्राध्यापक आणि विभागप्रमुख फार्मास्युटिक्स विभाग एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ फार्मसी, पुणे यांनी शैक्षणिक स्टार्ट-अप: विद्यार्थ्यांना सक्षम करणे, डॉ. शैलेंद्र गुरव विभाग प्रमुख गोवा कॉलेज यांनी नवीन शैक्षणिक संशोधन, लेखन आणि प्रकाशन एकात्मिक ए. आय टूल्स, डॉ.के.एस. जैन, प्राचार्य, राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे फार्मसी कॉलेज, दुडुळगाव फार्मसिसाठी नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षक संवाद प्रभावी अध्यापन-अध्यापनासाठी लागणाऱ्या गोष्टी अश्या विविध विषयावर मार्गदर्शन केले. हा पूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. स्मिता पवार, प्रा. विशाखा गायकवाड, प्रा. सुनीता बाठे यांनी केले. तसेच हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी याची साथ लाभली.

## हजारो सभासदांचे सदस्यत्व रद्द करून संस्थेच्या खाजगीकरणाचा घाट

# पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाच्या विरोधात संतापाची लाट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागात शिक्षणाच्या सुविधा कमी होत्या. आपल्या मुलांनी शिक्षण घेवून स्वतःच्या पायावर मोठे व्हावे आणि त्यांना गावातच शिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी ग्रामस्थांनी पाच एकर, दहा एकर, वीस एकर जमिनी संस्थेला फुकट बक्षीसपत्राने दिल्या. लोकवर्गणी काढून शाळेच्या इमारती बांधून देवून पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आठ ते नऊ गावांमध्ये विद्यालयाची स्थापना करून ४८६० सभासद जोडले.

मात्र संस्थेने कोणतीही नोटीस न देता सर्वच्या सर्व सभासदांचे सदस्यत्व रद्द केले आणि ज्यांचा संस्थेशी काहीही सबंध नाही अशा संचालकांनी स्वतःच्या नातेवाईकांची वर्णी लावली. यातून संस्थेच्या खाजगी करणाचा घाट घातला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून सर्व गावांतील सभासदांमध्ये संस्थेच्या मनमानी विरोधात संतापाची लाट उसळली आहे.

पुरंदर तालुक्याच्या पूर्वभागातील मुलांना यापूर्वी इयत्ता ७ वी नंतर शिक्षण घ्यायचे असल्यास थेट सासवडला यावे लागत होते. परिणामी अनेक मुले शिक्षणा पासून वंचित राहत होती, विशेषता मुलीना याचा मोठा फटका बसत होता. याचा विचार करून वाघापूर येथे पूर्वीच्या जेष्ठ मंडळींनी पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून शेतकरी पंचक्रोशी तांत्रिक विद्यालयाची स्थापना केली. त्यास चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर संस्थेचे स्थानिक नागरिकांच्या मदतीने पारगाव मेमाणे येथे पारेश्वर विद्यालय स्थापन केले. वनपुरी येथे श्री भैरवनाथ विद्यालय, नायगाव येथे श्री सिद्धेश्वर विद्यालय, पश्चिम भागातील भिवरी येथे श्री कानिफनाथ विद्यालय, गुळुंचे येथे श्री ज्योतिर्लिंग विद्यालय तसेच मावळच्या रीहे येथेही एका विद्यालयाची स्थापना केली.

ग्रामस्थांनी एकत्रित येवून गावच्या मालकीच्या तर काही ठिकाणी वयक्तिक मालकीच्या जमिनी संस्थेला अगदी मोफत दान स्वरुपात दिल्या. एक रुपया सुद्धा घेतला नाही. विद्यालयाची इमारत, तेथील फर्निचर, संगणक, पिण्यासाठी पाणी, स्वच्छतागृहे अशा सर्व सुविधा लोकवर्गणी काढून दिल्या. संस्थेने काही वर्षे निवडणुका सुद्धा घेतल्या. संस्था मोठी होण्यासाठी आणि लोकसहभाग वाढवून सुविधा निर्माण करण्यासाठी हजारो सभासद नोंद केले. सर्व गावांनी संस्थेवर विश्वास टाकल्यावर संस्थेने थेट बिनविरोध निवडणुकीचा फंडा सुरु केला. तब्बल १५ ते २० वर्षे निवडणुका कधी होतात याची स्थानिक नागरिकांना माहितीही मिळत नव्हती. तरीही नागरिकांनी संस्थेवर आणि संचालक मंडळावर विश्वास ठेवला. मात्र ज्यांनी स्थापना केली त्यांना बाहेरचा रस्ता दाखवून संस्था थेट मालकीच्या ताब्यात घेण्याचा संचालक मंडळाचा प्रताप उघड झाला आहे. वाघापूर येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन तुकाराम कुंजीर यांना संस्थेच्या बिनविरोध आणि अत्यंत गोपनीय पद्धतीने निवडणुका झाल्याचे समजल्याने त्यांनी अधिक माहिती घेतली असता तब्बल ४८६० सभासद असताना संस्थेने परस्पर ठराव करून केवळ १२२ साभासद ठेवल्याची माहिती मिळाली. यामुळे त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्याना माहिती विचारली असता त्यांनीही अक्षरशः कानावर हात ठेवले. त्यामळे कुंजीर यांनी पुणे येथील धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे अर्ज करून माहिती घेतली, त्यानंतर स्थानिक नागरिकांना याबाबत माहिती दिली.

### संस्थेच्या अध्यक्षांकडून विषय टाळण्याचा प्रयत्न

संस्थेने हजारो सभासद परस्पर रद्द केल्याने नागरिकांमध्ये संतप्त भावना निर्माण झाली आहे. याबाबत पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश उरसळ यांना फोन करून माहिती विचारण्याचा प्रयत्न केला असता सर्वमाहिती फोनवर देता येत नाही, प्रत्यक्ष भेटल्यावर बोलू असे सांगून विषय टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

---

» Selected



## ग्रामस्थांनी साकारले आईचे बन

**पारगांव :** देलवडी ग्रामस्थ व जय मल्हार ग्रंथालय व वाचनालयाच्या संचालक मंडळांनी सव्वातीन लाख रुपये जमा करत देलवडी येथे आईचं बन (फेज टू) साकारले आहे. उद्घाटक दौंडचे तहसिलदार अरूण शेलार म्हणाले की,कोविड कालावधीत म्हणजेच ३ वर्षापूर्वी गावातील तरुणाई एकत्र आली. उच्चशिक्षित युवकांनी उजाड माळरानावर ६०० झाडांचे आईचं बन साकारले.त्यावेळी अवघ्या १ महिन्यामध्ये ४ लाख रूपये लोकवर्गणी गोळा करण्यात आली. गावातील प्रत्येक कुटंबातील व्यक्तीने आपल्या आईच्या नावे प्रेमाखातर प्रत्येकी एक झाड दिले म्हणून या प्रकल्पाला आईचं बन असे नाव देण्यात आले.आत्ता ४ वर्षानंतर आईच्या बनाच्या पुढच्या टप्यातील वृक्षारोपणासाठी ३ लाख रुपये लोकवर्गणी गोळा करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देलवडी व जय मल्हार विद्यालय देलवडी या शाळेच्या १९९० स्थापनेपासूनच्या सर्व शिक्षकांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले. उपस्थित आजी माजी शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पंढरीनाथ भाडळे, दत्तात्रय पवार, कुसुम डोंबाळे, दिलीप खवळे, सुभाष बांदल, अनिल नवले, आनंद भोसले, उत्तम जावळे,उत्तम कुभांर,माधवी सोमवंशी, हर्षल देशमुख, ऊषा आडागळे, सुदर्शना शेलार, छगन खळदकर, सुजाता जावळे, भास्कर वाबळे, सुनील चौधरी, विक्रम बेंद्रे, चंद्रकांत कोकडे, विष्णु शिंदे, संपत कदम, रुपेश पोमणे, शिवदास शिंदे, संजय पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## युवकांनी युवकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करा - प्रा. कोठुळे पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** युवा ही देशातील सर्वात मोठी ताकद आहे. युवा हा देशाला नवे विजन ,नवी दिशा देऊ शकतो त्यासाठी प्रथमता युवा सुधारला पाहिजे तो आर्थिक दृष्ट्या सक्षम झाला पाहिजे आणि युवा सुधारला तर देश सुधरेल असे वक्तव्य राष्ट्रीय युवा शक्ती संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराव कोठुळे पाटील यांनी वर्धापन दिनानिमित्त केले. सोमवार 12 ऑगस्ट 2024 रोजी आळंदी येथे आंतरराष्ट्रीय युवा दिना दिवशी राष्ट्रीय युवाशक्ती संघाचा वर्धापन दिन असतो यानिमित्ताने सर्व संघाचे पदाधिकारी जमलेले होते. त्यावेळेस कोठुळे म्हणाले आपल्याला महाराष्ट्रा सहित भारतभर संघटनेला बळ द्यायचा आहे आणि प्रत्येक युवकाने निस्वार्थपणे युवकांच्या प्रगतीसाठी काम करायचा आहे. आपल्या सोबतचा युवकांनी प्रगती केली त्यावेळेस आपली पण आपोआप प्रगती होते.

यासाठी प्रत्येकाने एकमेकाला सहकार्य करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत. संघाच्या माध्यमातून आपण देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी हातभार लावणार आहोत पण देशातील अर्थव्यवस्था मजबूत होत असताना गोरगरिबाला आणि सामान्य युवाला याचा जर त्रास होत असेल तर याच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी पण संघटना काम करेल. सामाजिक काम करत असताना युवकांचे योग्य शिक्षण, शिक्षण झालेल्या युवकांना योग्य ठिकाणी कामाला लावून परमनंट करणे, व्यवसायासंदर्भात मार्गदर्शन करणे , युवकांच्या प्रगतीसाठी वेळोवेळी आवाज उठवणे या कामावरती संघातील पदाधिकाऱ्यांनी लक्ष देण्यात यावे. राष्ट्रीय युवा शक्ती संघ हा आचार्य चाणक्य आणि भगतसिंग ,राजगुरू, सुखदेव यांची प्रेरणा घेऊन चालत आहे. संघ हा सदैव युवकांच्या प्रगतीसाठी आवाज उठवेल आणि देशांमध्ये एकता, बंधुता आणि समानता शांततेच्या मार्गाने प्रस्थापित राहण्यासाठी काम करेल. यासाठी प्रत्येकाने आपापल्या प्रांतामध्ये लक्ष देऊन काम केले पाहिजे असे सांगितले.

### मार्गदर्शन

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**आळंदी :** आंतरराष्ट्रीय युवा दिना दिवशी राष्ट्रीय युवाशक्ती संघाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

## लक्ष्मण कुंडलिक यांना महाराष्ट्र उद्योग सन्मान पुरस्कार देऊन गौरविले



**कारेगांव :** सरदवाडी,ता.शिरुर येथील हॉटेल व्यावसायिक दत्तात्रय लक्ष्मण कुंडलिक यांना नुकताच महाराष्ट्र उद्योग सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.पुणे येथे नुकतेच स्विफ्ट अन् लिफ्ट यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच उद्योगात गगनभरारी घेणाऱ्या यशस्वी उद्योजकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.शिरूर तालुक्यात विजय हिंदू या नावाने कुंडलिक यांचे हॉटेल असून येथील भेळ ही सातासमुद्रापार गेली आहे. राज्यातील अनेक राजकीय नेते पुणे नगर महामार्गावर जात असताना नेहमी येथील भेळीचा आस्वाद घेतात.तर परदेशात ही भेळ मागणीनुसार पाठवली जात आहे.पिंपरी चिंचवड येथे प्रसिद्ध अभिनेत्री उर्मिला कोठारे यांच्या हस्ते दत्तात्रय कुंडलिक व निखील कुंडलिक यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून महाराष्ट्र उद्योग सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी मोठ्या संख्येने राज्यभरातून उद्योजक उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खडकवासला:** मुंबईच्या माजी महापौर स्नेहल आंबेकर यांनी सिंहगड रोडवरील आपत्तीग्रस्त भागास भेट दिली असता काही शालेय विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य पाण्यात भिजल्यामुळे शैक्षणिक नुकसान होत होते.

ही बाब शिवसेना कार्यकर्त्यांच्या निदर्शनात आली. तसेच या भागात मनपा तर्फे आरोग्य तपासणी उपचार देखील होत नव्हते. तातडीने महापौर आणि कार्यकर्त्यांनी आरोग्य केंद्राच्या प्रमुख अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि तेथे तपासणी करून उपचार करण्यात आले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना संपूर्ण महाराष्ट्रात भगवा सप्ताह साजरा करण्याचे आवाहन केले आहे. आज या सप्ताहचा शेवटचा दिवस होता. शिवसेना विधानसभा प्रमुख नितीन वाघ आणि माजी तालुका प्रमुख संदिप मते यांनी या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले.याप्रसंगी शहर संघटक संतोष गोपाळ, समन्वयक सचिन पासलकर, विभागप्रमुख मनिष जगदाळे, राजू चव्हाण,नाना मरगळे, प्रविण सोनार, किरण शिंदे, विजय मते हे उपस्थित होते.

## हॉटेल चालक महिलेचे मंगळसूत्र हिसकावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती ता. शिरुर येथे एका चहा हॉटेल चालक महिलेचे मंगळसूत्र दुचाकीहून आलेल्या दोघांना महिलेच्या डोळ्यात मिरचीपूड टाकून हिसकावून घेत दुचाकीहून पोबारा केल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे दोन अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील केके हॉटेल समोर ज्योती मिसाळ यांचे श्रावणी चहा हॉटेल असून मिसाळ या त्यांच्या चहाच्या हॉटेलवर असताना दुचाकीहून दोन युवक आले, त्यांनी मिसाळ यांना चहा मागितल्याने मिसाळ चहा गरम करत असताना दोघा युवकांनी त्यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेत असताना मिसाळ यांनी मंगळसूत्र पकडले मात्र दोघांनी जोरात हिसका मारुन निम्मे मंगळसूत्र हिसकावून घेत दुचाकीहून पोबारा केला, याबाबत ज्योती मारुती मिसाळ वय ४३ वर्षे रा. खंडाळे माथा ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. फडणवीस गल्ली श्रीगोंदा ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर यांनी रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

## हर घर तिरंगा उपक्रम

**जेजुरी :** भारतीय स्वातंत्र्याला ७७ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात या स्वतंत्र लढयाच्या स्मृती तेवत राहण्यासाठी स्वातंत्र्य संग्रामातील घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे. स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी. या उद्देशाने स्वांतत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक ९ ऑगस्ट २०२४ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये हर घर तिरंगा उपक्रम राबविण्यात यावा असे आवाहन जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारूदत्त इंगुले यांनी केले आहे.

## खेड शाळेतील स्काऊट-गाईड पथक रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने विविध उपक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित इंग्रजी माध्यम विद्यालयात स्काऊट गाईडचे रौप्य महोत्सवी वर्ष, स्वातंत्र्य दिन व क्रांती दिनाचे औचित्य साधून आर्म फोर्सेस मधील संघटनेचे अधिकारी व विद्यालयातील विद्यार्थ्यांचे सैन्यातील आजी-माजी पालक यांना आमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव एअर कमोडर गणेश त्र्यंबक जोशी, उपाध्यक्ष अजित लुणावत, संचालक हिरामण सातकर, प्रदीप कासवा, गणेश घुमटकर, संचालिका रेखा श्रोत्रिय तसेच खेड तालुका माजी सैनिक बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी आलेले सर्व पदाधिकारी सैन्य गणवेशात असल्यामुळे त्यांना पाहून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, स्फूर्ती निर्माण झाली. पहिली ते दहावीतील विद्यार्थी व घोष पथकाने मान्यवरांना विशेष सलामी दिली. पाहुण्यांचे स्वागत शौर्यगीत व स्वागत गीत गाऊन करण्यात आले.

आजी-माजी सैनिक बांधवांचा सत्कार करताना भेट म्हणून 'शिवगंध' पुस्तक , पुष्प, विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनवलेले भेटकार्ड पदाधिकारी व दोन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर पाचवीच्या विद्यार्थ्यांना स्कार्फ प्रदान करून त्यांचा शपथविधी झाला. सुर्यकांत रामचंद्र भोर, रामदास नारायण पालेकर व गणेश त्र्यंबक जोशी यांनी विद्यार्थ्यांना देशसेवा करणाऱ्या सैनिकांमध्ये असणाऱ्या संघकार्य, नेर्तृत्व, शिस्त, देशप्रेम तसेच स्काऊट-गाईड बद्दल माहिती सांगून मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी भाषण व कविता सादरीकरण केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी तिरंगी रंगात विविध कलात्मक वस्तू व पताका लावून शाळा सजवली होती. या कार्यक्रमास महादेव विठोबा टोपे, रामदास नारायण पालेकर, वसंत लक्ष्मण थिगळे, बबन बहिरू बोऱ्हाडे, अँड. गणेश मारुती नवले, नंदकुमार गणपत रोकडे, संजय ज्ञानेश्वर वाघोले, गंगाराम भिकाजी भोर, सूर्यकांत रामचंद्र भोर या माजी सैनिक बांधवांसह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना छत्र्या व रेनकोटचे वाटप ...



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगांव :** पुणेचे वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सायरखळा तालुका आंबेगाव येथील विद्यार्थ्यांना छत्र्या व रेनकोटचे वाटप
पुणे येथील जाणता राजा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माननीय दीपक आबा शिरवळकर व मित्रपरिवार यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सायरखळा व गाडेकरवाडी मधील 20 विद्यार्थ्यांना छत्र्या व रेनकोटचे वाटप करण्यात आले यावेळी संतोष कुंभार,अक्षय घोडनदिकर,संदिप कुमार ,सौ.पुष्पमाला शिरवळकर,शितल कुंभार, प्रियांका घोडनदिकर,गौरी कुंभार प्रतिष्ठानचे महिला भगिनी व शिक्षक मीना गभाले,विनय राजणीकर, मच्छिंद्र जगदाळे,संजय केंगले, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनय राजनीकर यांनी केले व आभार मीना गभाले यांनी मानले.

## पोलीसांची कारवाई; राष्ट्र संचारच्या वृत्ताचा दणका

**नारायणगांव:**"जुगाऱ्यांवरील पोलिसांच्या कारवाई बद्दल संशय" अशा आशयाची बातमी (दि. 12) रोजी दैनिक प्रसिद्ध झाल्यावर पोलिसांत खळबळ उडाली असून पुणे जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असल्याचे समजते. तसेच जुन्नरचे उप विभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांना सखोल चौकशी करण्याच्या सूचना दिल्याचे खात्रीलायक वृत असून उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांनी या प्रकरणी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे जबाब घेण्याचे काम सुरु केले असल्याचे समजते. दरम्यान दैनिक राष्ट्रसंचार प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची परिसरातील लोकांनी स्वागत केले असून पोलीस अधीक्षक पंकज देशमुख व उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी या प्रकणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी केली जात आहे.जुगार खेळणाऱ्या काही लोकांची खिशातून पाकिट काढून घेऊन त्यातील पैसे घेलते असल्याचे समजते. तसेच त्यांचे पाकिटसाठी परत न दिल्याचे समजते.


## ग्रामपंचायत दरकवाडी, मु.पो. दरकवाडी, ता. खेड, जि. पुणे

जा.क्र. दि. / /

### जाहिर निविदा नोटीस

ग्रा.प.दरकवाडी ता. खेड, जि. पुणे यांचेकडून जाहीर निविदा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की ग्रामपंचायत दरकवाडी, ता. खेड अंतर्गत खालील काम करण्यासाठी सिलबंद लिफाफ्यात ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाची नावे | कामाची रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फी | वर्ग | लेखाशिर्ष | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे दरकवाडी येथे शौचालय बांधकाम | ५८,४७० | १% | २३६ | खुला | १५ वित्त आयोग २०२०/२१ | ३ महिने |
| २. | मौजे दरकवाडी येथे समाजमंदीर दुरुस्ती | ५९,८६९ | १% | २३६ | खुला | १५ वित्त आयोग २०२१/२२ व २०२२/२३ | ३ महिने |
| ३. | मौजे दरकवाडी येथे बंदिस्त गटर करणे (भुमीगत गटर) | ७९,८०३ | १% | २३६ | खुला | १५ वित्त आयोग २०२१/२२ | ३ महिने |
| ४. | ग्रामपंचायत भवन देखभाल दुरूस्ती | ८४,३५७ | १% | २३६ | खुला | १५ वित्त आयोग २०२३/२४ | ३ महिने |
| ५. | अंगणवाडी बोलकी करणे | १९,६६५ | १% | २३६ | खुला | १५ वित्त आयोग २०२१/२२ | ३ महिने |
| ६. | पाणीपुरवठा देखभाल व दुरूस्ती | ५७,७५९ | १% | २३६ | खुला | १५ वित्त आयोग २०२२/२३ | ३ महिने |
| ७. | सामुदायिक कंपोस्ट पीट - २ कंपोस्ट कल्चर | ७१,१६९ | १% | २३६ | खुला | स्वच्छ भारत मिशन | ३ महिने |
| ८. | मौजे दरकवाडी येथे पवारवस्ती येथे सिंमेंटरस्ता करणे | ४.०० लक्ष | १% | २३६ | खुला | अनु. जाती व नवबौध घटकांचा विकास करणे | ६ महिने |
| ९. | मौजे दरकवाडी येथे भंडारेवस्ती येथे सिंमेंटरस्ता करणे | ४.०० लक्ष | १% | २३६ | खुला | अनु. जाती व नवबौध घटकांचा विकास करणे | ६ महिने |
| १०. | मौजे दरकवाडी येथे दरकवाडी ते थोरातवस्ती रस्ता (फक्त मजुरी रक्कम) | १०.०० लक्ष | १% | २३६ | खुला | जिल्हा वार्षिक योजना | ६ महिने |
| ११. | मौजे दरकवाडी येथे स्मशानभुमी आर सी सी शेड बांधकाम करणे (फक्त मजुरी रक्कम) | १०.०० लक्ष | १% | २३६ | खुला | जिल्हा वार्षिक योजना | ६ महिने |

वरीलप्रमाणे योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून तीन लिफाफा पद्धतीने वरील कामांची निविदा मागविण्यात येत आहे. की ज्या निविदा नमुना ग्रामपंचायत कार्यालय दरकवाडी ता. खेड, जि. पुणे यांचेकडून दि. १४/०८/२०२४ ते २१/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ४ पर्यंत देण्यात येतील. व भरुन पाठविलेल्या मोहरबंद निविदा २१/०८/२०२४ पर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्विकारल्या जातील. व सदर मोहरबंद निविदा दिनांक २२/०८/२०२४ रोजी शक्यतो सकाळी ११ वाजता किंवा नजीकच्या मासिक सभेत उघडण्यात येतील. निविदा मंजूर-नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत दरकवाडी ता. खेड, जि. पुणेने राखुन ठेवला आहे.

अवश्यक प्रमाणपत्र : १. जि. प. नोंदणी प्रमाणपत्र (२) पॅन कार्ड (३) जीएसटी (४) आधार (५) आयकर प्रमाणपत्र

ग्रामसेवक,
ग्रामपंचायत दरकवाडी

सरपंच,
ग्रामपंचायत दरकवाडी

### नगराध्यक्ष कालावधी पाच वर्षे

# उमेदवारांच्या अपेक्षांवर पाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील नगरपंचायत व नगरपालिकांमधील नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षावरून पाच वर्षे करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. पुढील काही दिवसांतच नगराध्यक्षपदासाठी सोडत निघणार होती. मात्र, इच्छुक उमेदवारांच्या अपेक्षांवर नव्या निर्णयाने पाणी फेरले गेले आहे.

विधानसभा निवडणुकांच्या घोषणेपूर्वी कॅबिनेट बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत आठ मोठे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा आढावा देखील घेण्यात आला.

राज्यात २२८ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत. त्यांच्या निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पाच वर्षांच्या कालावधीपैकी अडीच-अडीच वर्षांचे दोन अध्यक्ष निवडण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यातील पहिल्या टप्प्याच्या नगराध्यक्षपदासाठी घेण्यात आलेल्या आरक्षणाच्या सोडतीचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. आता दुसऱ्या टर्ममधील नगराध्यक्षांची निवड काही दिवसांवर येऊन ठेपली असता नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षावरुन पाच वर्षांचा करण्यात आला आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदाची स्वप्ने पाहणाऱ्या नगरसेवकांची घोर निराशा झाली आहे.

राज्यात आधीच दोन वर्षांपासून बहुतांश नगरपालिका, नगरपंचायत आणि महापालिकांमध्ये प्रशासन राज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच न झाल्यामुळे येथील पदे रिकामी असून तो पदभारही प्रशासनाकडे आहे. त्यातच आता राज्यातील उर्वरीत नगर पंचायतींमधील नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षांचा करण्यात आला आहे.

#### आघाडीने घेतला होता निर्णय

● नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय पूर्वीच्या महायुती सरकारने घेतला होता. त्यानंतर, महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलून नगराध्यक्षांची निवड सभागृहातील नगरसेवकांकडून करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या, तो निर्णय लागू असून अडीच वर्षांसाठी नगराध्यक्षपदाची निवड होती, ती आता पाच वर्षे करण्यात आली आहे.

### राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स

## भाऊबीज परत घेत नाही

### फडणवीस यांचे स्पष्टीकरण



**जळगाव :** भाऊबीज दिली तर ती परत घेतली जात नाही, असे स्पष्टीकरण राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. कुणाचा बापही लाडकी योजना बंद करू शकणार नाही असेही ते म्हणाले. जळगावमधील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. लाडकी बहीण योजनेचे पैसे परत घेतले जातील. ही योजना फक्त निवडणुकीपुरती आहे, अशी टीका करण्यात येत होती. त्यातच महायुतीमधील आमदार रवी राणा आणि शिंदेंचे आमदार महेश शिंदे यांनी केलेल्या वक्तव्यावरून वाद निर्माण झाला होता. त्यावर फडणवीसांनी स्पष्टीकरण देत, या योजनेचे पैसे परत घेतले जाणार नाहीत असे स्पष्ट केले.

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून निर्णय घेतला तर कुणाच्या पोटात दुखायला लागलं. कुणी म्हणालं लाच देताय का? कुणी म्हणालं मतं खरेदी करताय. कुणीही बहिणीचं प्रेम विकत घेऊ शकत नाही. प्रसंगी त्या उपाशी राहतील मात्र भावाला जेऊ घालतील. कुणी म्हणालं की १५०० रुपये माघारी घेऊ. अरे वेड्यांनो, दिलेली भाऊबीज परत घेत नाहीत. महिलांना सक्षम करण्याचा निर्णय आम्ही घेतला. येत्या काळात महिला सक्षम झाल्यानंतर महाराष्ट्र कधीच मागे पडणार नाही. आमच्या महिला बचत गटाचा एक एक पैसा पैसा परत करतात. ३१ ऑगस्टपर्यंत फॉर्म भरलेल्या महिलांना जुलै, ऑगस्ट महिन्यांचे पैसे आम्ही देऊ, असं फडणवीस यांनी सांगितले. ते म्हणाले की, महिलांच्या हाती पैसे पडले की ते योग्य ठिकाणी कारणी लागतात. मात्र पुरुषांच्या हातात पैसे पडले तर ते कुठे जातील हे सांगता येत नाही. मते दिली नाही तर पैसे परत घेतले जातील, असं आमदार रवी राणा यांनी गंमतीने म्हटले होते. तर शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेश शिंदे यांनी डिसेंबरनंतर या योजनेतून विरोधकांची नावं काढून टाकली जातील, असं वक्तव्य केलं होतं.

### Selected

## सरकारवर मी नव्हे जनता नाराज : प्रहार जनशक्तीचे प्रमुख बच्चू कडू

**अमरावती :** सरकारवर मी नाही तर जनता नाराज आहे. सरकार आमच्या मागण्यांची दखल घेत नसेल तर निवडणुकीत त्यांना दखल घ्यावी लागेल, असा इशारा प्रहार जनशक्तीचे प्रमुख बच्चू कडू यांनी सरकारला दिला आहे. लाडकी बहीण योजनेसाठी वापरला जाणारा पैसा जनतेचा आहे. पण काही आमदारांना या योजनेसाठी वापरला जाणारा पैसा बाप-दादांच्या कमाईचा वाटतो, अशी टीका कडू यांनी रवी राणांवर केली आहे. मी दिव्यांग अभियानाचा फक्त नावापुरता अध्यक्ष, दिव्यांगांसदर्भातले निर्णयही कळवले जात नाहीत, अशी खंतदेखील त्यांनी व्यक्त केली. कडू म्हणाले, मला नावापुरता दिव्यांग कल्याण अभियानाचा अध्यक्ष केला आहे. जिल्ह्यात जा आणि तक्रारी घ्या एवढंच आमचं काम आहे. दिव्यांग मंत्रालयाचे काय निर्णय होतात हे आम्हाला कळवलं सुद्धा जात नाही. अनेक गोष्टींसाठी आम्हाला भांडावं लागतं आणि भांडून आम्ही ते करून घेतो.

## मतदानाची शपथ घेण्याचे आवाहन

**पुणे** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिन समारंभात मतदानाची शपथ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे. भारत निवडणूक आयोगाने १ ऑगस्ट रोजी विशेष संक्षिप्त कार्यक्रमाची घोषणा केली आहे. त्यानुसार ६ ते २० ऑगस्ट या कालावधीमध्ये मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, मयत, स्थलांतरित नावे वगळणे, नावामध्ये, पत्त्यामध्ये दुरुस्ती करणे, मतदान केंद्र बदलणे आदी स्वरूपाची कामे केली जाणार आहेत. आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये जागृती करण्याच्या अनुषंगाने भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिन समारंभानिमित्ताने सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये ध्वजारोहण साजरा करण्यात यावा.

# बहिणी विरोधात पत्नीस उतरवणे ही चूक : अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळे यांच्याविरोधात सुनेत्रा पवार यांना रिंगणात उतरवणे, ही एक मोठी चूक असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले की, राजकारण घरामध्ये शिरुन द्यायचं नसतं. मागे माझ्याकडून थोडी चूक झाली. त्या काळामध्ये मी माझ्या बहिणीच्या विरोधात सुनेत्राला उभं करायला नको होतं. त्यावेळेस पार्लमेंटरी बोर्डाकडून निर्णय घेतला गेला. पण एकदा बाण सुटल्यावर आपण काही करु शकत नाही. अजित पवार यांनी दिलेली ही कबुली महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाची नांदी तर नाही ना, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.



बारामतीत पवार घराण्यातील दोन व्यक्तींना आमनेसामने लढवण्याची चूक लक्षात आल्यानंतर तुम्ही आता रक्षाबंधनाच्या सणाला सुप्रिया सुळे यांना भेटायला जाणार का, असा प्रश्न पवार यांना विचारण्यात आला. त्यावर पवार यांनी म्हटले की, रक्षाबंधनाच्यावेळी मी तिकडे असेन तर मी राखी बांधून घ्यायला बहिणींकडे जरुर जाणार.

अजित पवार सध्या जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने राज्यात फिरत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांच्या पक्षाने प्रसिद्धी आणि प्रचाराच्या बाबतीत कात टाकल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रतिमासंवर्धनासाठी एका कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. या कंपनीने सल्ला दिल्यानुसार अजित पवार गटाकडून सध्या राज्यातील महिला मतदारांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. त्यासाठी अजित पवारांकडून सुरु असलेले पिंक पॉलिटिक्स चर्चेचा विषय ठरत आहे. अजित पवार आता सार्वजनिक व्यासपीठावर फक्त गुलाबी जॅकेट परिधान करत आहेत. जनसन्मान यात्रेतील त्यांच्या सर्व गाड्या गुलाबी रंगाने रंगवण्यात आल्या आहेत.

## काँग्रेसचे खा. चव्हाण यांची प्रकृती बिघडली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** काँग्रेसचे खासदार वसंत चव्हाण यांना श्वास घेण्यास अडचण येत असून अचानक रक्तदाब कमी झाल्याने त्यांना नांदेडच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना पुढील उपचारासाठी एअर अ‍ॅब्युलन्सने हैद्राबाद येथे हलवणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

चव्हाण यांना अचानक श्वास घेण्याचा त्रास सुरू झाला. त्यांच्या परिवारातील सदस्याने तात्काळ त्यांना रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर डॉ. कृष्णा पाटील यांनी उपचार सुरू केले. सध्या प्रकृती स्थिर असल्याची माहिती असून पुढील उपचारासाठी खासदार चव्हाण यांनाहैद्राबाद येथील किम्स हॉस्पिटल येथे दाखल करण्यात येणार आहे.

### शांतता रॅलीच्या सांगता सभेत जरांगेंचे टीकास्त्र

# भुजबळ नाशिकला लागलेली साडेसाती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर शांतता रॅलीच्या सांगता सभेत जोरदार टीकास्त्र डागले. भुजबळ ही नाशिकला लागलेली साडेसाती आहे. येवल्याला लागलेला डाग पुसणारच, असा इशारा त्यांनी दिला आहे.

जरांगे म्हणाले की, जातिवंत, कडवट, कट्टर म्हणजे काय हे नाशिकच्या जनतेने दाखवून दिले आहे. तुम्ही मराठवाड्यापेक्षा मोठ्या संख्येने जमा झाला आहात. ते म्हणत आहेत की, मनोज जरांगेंना म्हणा ८ जागा निवडून आणून दाखवा. तुमच्याच जिल्ह्यातील निवडून येतात का बघा आधी. देवेंद्र फडणवीस यांचा पक्ष भुजबळ संपवतील. भुजबळांनी शिवसेना, राष्ट्रवादी फोडली, आता भाजप फोडतील.



कुणबी आणि मराठा एकच आहेत. गावागावातील मराठ्यांनी २९ तारखेला अंतरवालीला यायचे आहे. निवडणुकीत पाडायचे का उभे करायचे? हे तेव्हा ठरवू. आपल्याला ओबीसीमधूनच आरक्षण मिळवायचे आहे. अशी संधी पुन्हा येणार नाही. पक्षाला आणि नेत्याला बाप मानण्यापेक्षा समाजाला बाप माना. १३ जून ते १३ ऑगस्ट हे दोन महिने सरकारला दिले. या काळात काहीच हालचाल झाली नाही. त्यांना आरक्षण द्यायचे नाही किंवा भाजपमधील लोक आणू देत नाही. आता नवीन डाव आणले आहेत. बैठकीला या म्हणत आहेत. हे जात नाही, आणि आपले मरण होत आहे.

## पान १ वरून

### काठावर पास आमदारांना धडकी

**खडकवासला :** असे हाय प्रोफाईल डाटा कलेक्शनचे काम होते. त्या पलीकडे तेथे सामान्यांना 'आधार' मिळत नाही. लोकसभा निवडणुकीत येथे शरद पवार गटाचे सचिन दोडके यांनी केलेल्या चांगल्या कामाची पावती मिळाली असून, या मतदारसंघातून राष्ट्रवादी शरद पवार गटालाच चांगली मते मिळाली आहेत. त्यामुळे महायुतीचा उमेदवार येथे धोकादायक पातळीमध्ये असल्याचे मानले जाते.

**कोथरूड** : देखील मागील वेळी किशोर शिंदे या मनसेच्या उमेदवाराने चंद्रकांत दादा यांना चांगली टक्कर दिली होती. शिवसेनेचा देखील येथे एक वर्ग आहे तो यंदा भाजपासोबत नाही. शिवसेना शिंदे गटाची ताकद येथे काहीच नाही.

**कसबा** : ते 'बदललेल्या भाजपा' ला दूरच ठेवतील, अशीच जास्त शक्यता आहे. रविंद्र धंगेकर यांचा करिष्मा कमी झाला आहे. तथापि, ते सातत्याने चर्चा आणि वैयक्तिक गाठीभेटीमध्ये सक्रिय आहेत.

### पुणे-मुंबई केवळ २ तासांत

त्यामुळे मध्य रेल्वेच्या या प्रस्तावामुळे हा प्रवास दोन ते अडीच तासांत पूर्ण करता येणार आहे. दरम्यान, मध्य रेल्वेकडून दोन्ही मार्गाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. यापैकी एक मार्ग मंजूर झाल्यावर त्याचे काम सुरु करण्यात येईल, असे रेल्वे अधिकाऱ्याऱ्यांनी सांगितले आहे. याचबरोबर नव्या १० रेल्वेगाड्या चालवण्याचा पर्याय देखील मध्य रेल्वेकडून खुला करण्यात आला आहे. मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर चार वर्षांत प्रकल्प पूर्ण होईल असे सांगितले आहे. तर कर्जत ते तळेगाव नव्या मार्गासाठी १६,००० कोटी आणि कर्जत ते कामशेत नव्या रेल्वे प्रकल्पासाठी १०,२०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

### 'जेपीसी' अध्यक्षपदी जगदंबिका पाल

वक्फ' विधेयकाच्या 'जेपीसी' सदस्य लोकसभा सदस्य: जगदंबिका पाल, डॉ. निशिकांत दुबे, तेजस्वी सूर्या, अपराजिता सारंगी, संजय जैस्वाल, दिलीप शाक्य, अभिजीत गंगोपाध्याय, डी.के. अरुणा, गौरव गोगोई, इम्रान मसूद, डॉ.मोहम्मद जावेद, मोहिबुल्ला, कल्याण बॅनर्जी, ए. राजा, लावू श्री कृष्ण देवरायालू, दिलेश्वर कामेत, अरविंद सावंत, सुरेश गोपीनाथ, नरेश म्हस्के, अरुण भारती, असदुद्दीन ओवेसी. राज्यसभा सदस्य: ब्रिज लाल, मेधा कुलकर्णी, गुलाम अली, डॉ. राधा मोहन दास अग्रवाल, डॉ. सय्यद नसीर हुसेन, मोहम्मद नदीमुल हक, व्ही. व्यासाई रेड्डी, एम. मोहम्मद अब्दुल्ला, संजय सिंह, डॉ. धर्मस्थल वीरेंद्र हेगडे.

### चर्चेत फडणवीस पण धुरा महिलेकडे?

सहसरचिटणीस अरुण कुमार उपस्थित होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाच्या पुढील अध्यक्षपदाच्या नावासाठी संघाची संमती घेणे आवश्यक आहे. यापूर्वी पक्षात महत्त्वाची पदे भूषविलेल्या दिग्गजांचा आता केंद्र सरकारमध्ये समावेश झाल्याने, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी तळागाळातील राजकारणाची पार्श्वभूमी असलेल्या नेत्याच्या शोधात आहेत. मात्र, याबाबत अधिकृतपणे काहीही सांगण्यात आलेले नाही. अंतर्गत अहवालानुसार, पुढील अध्यक्ष महिला किंवा ओबीसी नेता असू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. यापूर्वी कधीही भाजपचे नेतृत्व महिलेने केलेले नाही. म्हणूनच, भाजप एखाद्या अनपेक्षित नावाची घोषणा करू शकतो, अशी अटकळ आहे. भाजपचे नवे अध्यक्ष पदाच्या शर्यतीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही नाव चर्चेत आहे. मात्र, त्याला अधिकृतपणे दुजोरा मिळालेला नाही. काही दिवसांपूर्वी त्यांनी राजधानी दिल्ली येथे पंतप्रधान मोदी यांच्याशी सहकुटुंब भेट घेतली होती. त्यानंतरच त्यांचे नाव चर्चेत आले. विनोद तावडे यांचेही नाव या शर्यतीत आहे.

### तेजसने दाखवली आपली ताकद

करतील, असे प्रतिपादन भारतीय हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी मंगळवारी केले. कोईम्बतूरजवळील सुलूर एअरबेसवर सरावाच्या पहिल्या टप्प्याच्या समारोपप्रसंगी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना चौधरी म्हणाले, तेजसने आपली क्षमता सिद्ध केली आहे. या सरावाचा पहिला टप्पा ६ ऑगस्टपासून सुरू झाला. यात भारत, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि स्पेनच्या हवाई दलांनी सहभाग घेतला होता. राफेल, टायफून, सुखोई-३०, तेजस, ए-४०० मालवाहतूक विमाने प्रदर्शनात होती. तेजस एमके-१ ने पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या सरावात सहभाग घेतला. आम्हाला त्याच्या कामगिरीचा अभिमान आहे. तेजस हे आत्मनिर्भर मोहिमेच्या यशाचे प्रतीक आहे. देशांतर्गत आणि देशाबाहेरील हवाई लढाऊ सरावांमध्ये आम्ही या विमानांचा अधिक वापर करू, असे त्यांनी सांगितले. हवाई दलाकडे सुमारे ४० तेजस एमके १ विमाने आहेत. फ्रान्सच्या हवाई दलाचे राफेल पायलट मेजर अ‍ॅलेक्सिस गॅलोझो भारतीय लढाऊ विमानाच्या क्षमतेने प्रभावित झाले आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, संयुक्त अरब अमिराती आणि सिंगापूर देखील यात सहभागी होणार आहेत. तरंग शक्तीचा दुसरा आणि शेवटचा टप्पा जोधपूर येथे २९ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर दरम्यान होणार आहे.

### निवासी डॉक्टर दुसऱ्या दिवशीही संपावर!

कोलकातामधील सरकारी हॉस्पिटलमध्ये पदव्युत्तर प्रशिक्षणार्थी डॉक्टर महिलेवर झालेला बलात्कार आणि निर्घृण हत्येने संपूर्ण देश हादरला आहे. या घटनेच्या निषेधार्थ देशभरातील निवासी डॉक्टर आज दुसऱ्या दिवशीही संपावर आहेत. देशभरातील डॉक्टरांकडून ठिकठिकाणी निदर्शने करण्यात येत आहेत. दिल्लीतील डॉक्टरांनी बेमुदत संपाची घोषणा केली आहे. या संपामुळे बहुतांश ठिकाणी बाह्य रुग्णसेवा (ओपीडी) ठप्प झाली आहे. दरम्यान, महाराष्ट्र स्टेट असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्सने मुबंईतील केईएम हॉस्पिटल येथे निदर्शने करत आपल्या निषेध नोंदवला.

### अन्यथा लाडकी बहीण योजना थांबवू...

याचिकाकर्त्यांना मोबदला द्या, नाहीतर 'लाडकी बहीण' सारख्या योजनांवर बंदी घालण्याचे आदेश द्यावे लागतील, असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने सरकारला दिला. या अगोदरही जमीन प्रकरणीच्या सुनावणीत सरकारला सुनावले होते. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला सवाल केला होता की, लाडकी बहीण योजनेसाठी तुमच्याकडे पैसे आहेत, मात्र याचिकाकर्त्यांना मोबदला देण्यासाठी पैसे नाहीत का? सर्वोच्च न्यायालयाने आज पुण्याजवळील जमीन प्रकरणी महाराष्ट्र सरकारला फटकारले. जवळपास सहा दशकांपूर्वी एका व्यक्तीच्या मालमत्तेवर राज्याने बेकायदेशीरपणे ताबा मिळवल्याच्या आणि त्या बदल्यात अधिसूचित वनजमीन दिल्या प्रकरणी नुकसानभरपाई म्हणून योग्य रक्कम न दिल्याबद्दल न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला सुनावले. राज्याने जमीन गमावलेल्या व्यक्तीला वाजवी मोबदला दिला नाही, तर लाडकी बहीण सारख्या योजना थांबवण्याचे आदेश देऊ आणि बेकायदेशीरपणे संपादित केलेल्या जमिनीवर बांधलेली बांधकामे पाडण्याचे निर्देश देऊ, अशी सक्त ताकीद न्यायालयाने दिली आहे.

## राज ठाकरे विदर्भ दौऱ्यावर

**पुणे :** लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आता विधानसभा निवडणूकीवर लक्ष केंद्रित केले आहे. मनसे विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार आहे. त्यासाठी मनसेकडून जोरदार मोर्चेबांधणी करण्यात येत आहे.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे स्वतः संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार आहेत. नुकताच मराठवाडा दौरा राज ठाकरे यांनी केला. यानंतर आता राज ठाकरे विदर्भ दौरा करणार आहेत. राज ठाकरे हे २० ऑगस्टपासून विदर्भाच्या दौरावर असणार आहेत. राज ठाकरेंच्या दौऱ्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.

### आमची युती जनतेशी, पूनम गुप्ता यांचे प्रतिपादन

# स्वदेशी काँग्रेस विधानसभा लढणार

**पुणे :** उत्तर प्रदेश, हरियाणा, तेलंगणा आदी राज्यांमध्ये निवडणुका लढवल्यानंतर भारतीय स्वदेशी काँग्रेस पार्टी महाराष्ट्रात निवडणूक लढवण्यास सज्ज झाली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा पुनम गुप्ता आणि पक्षाचे राष्ट्रीय सचिव सम्राट करवा यांनी याबाबत पुण्यात पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.



भारतीय स्वदेशी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा पुनम गुप्ता आणि राष्ट्रीय सचिव सम्राट करवा यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

ते म्हणाले की,महाराष्ट्रात सध्या सर्वच पक्षांची खिचडी झाली आहे; त्यामुळे एक नवा पर्याय म्हणून विधानसभेच्या जास्तीत जास्त जागा लढवण्याचा प्रयत्न करणार आहोत. शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांमध्ये प्रामुख्याने पक्ष लक्ष देणार आहे. याशिवाय महाराष्ट्रातील आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी पक्ष प्रयत्न करेल, अशी माहिती करवा यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील तरुणांना पक्षात सामील होण्याचा आवाहनही त्यांनी केले.

पूनम गुप्ता म्हणल्या, भ्रष्टाचाराच्या खेळामुळे निवडणुका अत्यंत महागड्या झाल्या आहेत आणि खऱ्या जननेत्यांना सध्याच्या निवडणूक प्रक्रियेत स्थान मिळालेले नाही. त्यामुळे आम्ही खऱ्या जननेत्यांची निवड करण्यासाठी इच्छुक आहोत. आम्ही ज्ञान, अनुभव, देशभक्ती, नैतिकता आणि व्यावसायिक विकासाच्या मूल्यांसाठी समर्पित आहोत. राज्यात प्रचंड क्षमता आहे त्याचा पुरेपुर वापर करुन महाराष्ट्राला देशात क्रमांक १ चे विकसित राज्य करु. भारताच्या संविधानानुसार स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. उदिष्टांना साध्य करण्यासाठी कोणत्या प्रक्रिया आणि पद्धती अवलंबतो याची माहिती यावेळी करवा यांनी दिली.

### मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची परस्परविरोधी विधाने

# शक्तीपीठ : शिंदे - पवारांच्या वक्तव्याने संभ्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शक्तीपीठ महामार्गावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या परस्परविरोधी वक्तव्याने जिल्ह्यातील शेतकरी वर्गात संभ्रम निर्माण झाला आहे.

दोन्ही नेत्यांच्या बोलण्यात मोठी तफावत असल्याचे दिसून येत आहे. शेतकरी विरोधी शक्तीपीठ महामार्ग होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापुरात दिली. मात्र, एकनाथ शिंदे यांनी २१ जून रोजी केलेल्या ट्विटमध्ये महामार्ग रद्द करण्याचे कोणतेही संकेत दिले नव्हते. मात्र, फेरविचार करण्याचे सुतोवाच केले होते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी मांडलेली भूमिका अधिकृत समजायची की उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेली ग्वाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

#### ८६ हजार कोटींची तरतूद

शक्तीपीठ महामार्गासाठी ८६ हजार ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे धार्मिक पर्यटन एकाच महामार्गावरून होणार आहे. समृद्धी महामार्गाचा विस्तार सिंदखेडराजा नोड ते शेगावपर्यंत चौपदरी रस्ता करून करण्यात येणार आहे. शक्तीपीठ महामार्गाने माहूर, तुळजापूर, कोल्हापूर, आंबेजोगाई ही शक्तीपीठे तसेच औंढा नागनाथ, परळी वैजनाथ ही दोन ज्योतिर्लिंगे, नांदेड गुरुद्वारा, पंढरपूर, कारंजा लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी औदुंबर जोडले जाणार आहेत. या महामार्गाचा विस्तार हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, वर्धा, यवतमाळ, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यामधून होणार आहे.

नागपूरमधील पवनार ते गोव्यातील पत्रादेवी असा हा महत्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्ग आहे. जिल्ह्यात दक्षिण बाजूने नागपूर ते रत्नागिरी महामार्गाची कामे प्रगतीपथावर आहेत. अशातच शेतकऱ्यांचा मोबदल्यासाठी आणि पाणंद रस्त्यांसाठी वाद सुरु आहे. आता जिल्ह्याच्या उत्तर बाजूने सुद्धा हा या महामार्ग जात असल्याने शेतकरी वर्ग संतप्त आहे. जिल्ह्यातील सहा तालुक्यातील ५९ गावांमधील शेकडो एकर जमिनी प्रभावित होणार असल्याने हा महामार्ग रद्द करावा, अशी मागणी कोल्हापूरसह सांगली जिल्ह्यातून एकमुखाने होत आहे.

जनतेच्या भावनेचा विचार करुन तसेच त्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प पुढे नेला जाईल. समृध्दी महामार्ग हा गेमचेंजर प्रकल्प आम्ही जनतेला विश्वासात घेऊनच पूर्ण केला. त्यानुसार या शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाची त्या ठिकाणी विरोध आहे.

#### आठ हजार हेक्टर जमीन संपादन

पुढील वर्षी या महामार्गाच्या कामाचा शुभारंभ प्रस्तावित असून पाच वर्षात काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. नागपूरहून गोव्याचे १८ तासांचे अंतर शक्तीपीठ महामार्ग निर्मितीनंतर आठ तासांवर येणार आहे. राज्यातील सर्वात लांब हा सुपर एक्स्प्रेसवे असेल. त्यासाठी आठ हजार हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. हा महामार्ग सहा पदरी असेल. महामार्गावर २६ ठिकाणांवर इंटरचेंज असेल. ४८ मोठे पूल, ३० बोगदे, आठ रेल्वे क्रॉसिंग असतील.



## प्रमोद भगतवर बंदी : पॅरालिम्पिकपूर्वी भारताला धक्का

पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ च्या आधी भारताला मोठा धक्का बसला आहे. बॅडमिंटनपटू प्रमोद भगत याला डोपिंगविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १८ महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे. बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनने (BWF) मंगळवारी ही माहिती दिली. निलंबनामुळे भगत पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत.

"मनू भाकर ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या नेमबाजी विश्वचषक स्पर्धेतून बाहेर राहू शकते कारण तिने तीन महिन्यांचा ब्रेक घेण्याचा निर्णय घेतला आहे. जसपाल राणा यांनी ही माहिती दिली. जसपालने सांगितले की, 'ती तीन महिन्यांचा ब्रेक घेत असल्याने ती विश्वचषकात खेळेल की नाही हे मला माहीत नाही.'



### तारीख पे तारीख पदकाबाबतचा निर्णय १६ तारखेला

# विनेशला रौप्य मिळेल?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पॅरिस:** पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मधील विनेश फोगट प्रकरणाची सुनावणी ९ ऑगस्ट (शुक्रवार) रोजी पूर्ण झाली. आता १६ ऑगस्ट रोजी त्याचा निर्णय जाहीर होणार आहे. मंगळवारी त्याबाबतचा निर्णय जाहीर केला गेला नाही. विनेशला रौप्य पदक मिळणार की नाही, यासाठी १६ तारखेपर्यंत वाट पहावी लागणार आहे. यावेळी त्यांनी वेळ मारून नेली. याआधी निर्णय १० ऑगस्टलाच येणार होता, मात्र वेळ वाढवण्यात आली होती. या प्रकरणी डॉ. ॲनाबेले बेनेट एसी एससी निकाल देतील.

**निकालापूर्वी विनेशच्या वकिलाचं मोठं वक्तव्य**

विनेश फोगटच्या पदकाचा निर्णय आज होणार आहे. दरम्यान, विनेश फोगटचे वकील विदुष्पत सिंघानिया यांनी आज तकशी संवाद साधला. विनेशच्या बाजूने निर्णय येईल, असा विश्वास असल्याचे विदुष्पत यांनी सांगितले. २४ तासांत निर्णय द्यावा लागेल, असा युक्तिवाद विदुष्पत यांनी केला होता, मात्र यावेळी त्यांनी वेळ वाढवली. विदुष्पत सिंघानिया म्हणाले, 'विनेशच्या फ्रेंच वकिलाने आधीच याचिका दाखल केली होती. या प्रकरणाची सुनावणी व्हावी, असे कॅस यांना वाटले. पॅनेलने 9 तारखेला सुनावणी घेण्याचे मान्य केले आहे, ही चांगली गोष्ट होती. पॅनेलने आम्हालाही पक्षकार बनवले, त्यामुळे आम्ही आमची याचिका दाखल करू शकलो. विनेशची याचिका तथ्यांवर आधारित होती, परंतु आम्ही कायदेशीर मुद्द्यांवर आलो.

'आशा आहे, म्हणूनच मी खूप मेहनत केली आणि याचिका दाखल केली. तदर्थ समितीने २४ तासांत निर्णय द्यावा. पण यावेळी तो वेळ घेत आहे कारण कदाचित तो या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करत असेल. आम्हाला विश्वास आहे की निर्णय आमच्या बाजूने होईल.

विनेश फोगटने बुधवारी ऑलिम्पिक फायनलमधून अपात्रतेविरुद्ध कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट (CAS) मध्ये अपील केले आणि तिला एकत्रित रौप्य पदक देण्याची मागणी केली. ऑलिम्पिक खेळ किंवा उद्घाटन समारंभाच्या 10 दिवसांच्या कालावधीत उद्भवलेल्या कोणत्याही विवादांचे निराकरण करण्यासाठी येथे क्रीडा लवादाच्या तदर्थ विभागाची स्थापना करण्यात आली.



**CAS चे काम काय आहे?**

CAS ही जगभरातील खेळांसाठी तयार केलेली एक स्वतंत्र संस्था आहे. खेळाशी संबंधित सर्व कायदेशीर विवाद निकाली काढणे हे त्याचे काम आहे. 1984 मध्ये स्थापन झालेली आंतरराष्ट्रीय संस्था लवादाद्वारे खेळाशी संबंधित वाद सोडवण्याचे काम करते. त्याचे मुख्यालय लॉसने, स्वित्झर्लंड येथे आहे आणि त्याची न्यायालये न्यूयॉर्क शहर, सिडनी आणि लॉझने येथे आहेत. सध्याच्या ऑलिम्पिक यजमान शहरांमध्येही तात्पुरती न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

## ऑलिम्पिकनंतर मनू भाकरने 3 महिन्यांचा ब्रेक...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पॅरिस:** मनू भाकरखूप दिवसांपासून मेहनत करत आहे त्यामुळे हा एक सामान्य ब्रेक आहे.' १३ ते १८ ऑक्टोबर दरम्यान दिल्लीत नेमबाजी विश्वचषक स्पर्धा होणार आहे. जसपालने सांगितले की, ब्रेकनंतर तो 2026 च्या आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळांवर काम करेल. पॅरिस ऑलिम्पिकच्या समारोप समारंभात मनू भाकर आणि पीआर श्रीजेश हे भारतीय संघाचे ध्वजवाहक होते. नू भाकर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदकांची हॅट्ट्रिकपासून वंचित राहिली होती. मनू २५ मीटर पिस्तुलमध्ये चौथ्या स्थानावर राहिली. त्यानंतर शूटऑफमध्ये मनूचा हंगेरीच्या वेरोनिका मेजरने पराभव केला. मनू भाकर पहिल्या आठ मालिकेनंतर पाच-पाच शॉट्सच्या 10 मालिकांच्या अंतिम फेरीत 28 गुणांसह हंगेरीच्या वेरोनिका मेजरसह संयुक्त तिसऱ्या स्थानावर होती. यानंतर शूट-ऑफमध्ये मनूला पाचपैकी केवळ तीनच लक्ष्य करता आले, तर मेजरने चार अचूक लक्ष्यांसह कांस्यपदक जिंकले.

आज मंगळ. दि.१३.०८.२४ संध्या.४.४४ वा. बालगंधर्व रंगमंदिर,पुणे
झळकी नागणणा निर्मित
मनपसंद गीत भाग-५१
"सुवर्ण युग" भाग ०१
(वादक कलाकार सहित जुन्या हिंदी गीतांचा कार्यक्रम)
कलाकार
अभय पेशवे, डॉ.अनुपमा परदेशी, डॉ.अजित संत, अश्विनी बिरारी, अरुण शेलार, कविता कोठारी, लोकेश घांग्रेकर, डॉ.रुची महंते, सुहास पालेकर, सीमा वेलणकर, स्मिता देशमुख, समृद्धी पाटील, अयुधा बिरारी (बाल कलाकार)
प्रवेश विनामूल्य
निवेदक : आकाश सोलंकी
वादक कलाकार : सईद खान, असिफ इनामदार, हर्षद गनबोटे
ध्वनी : हेमंत उत्तेकर | व्हिडीओ : विक्रम क्रिएशन्स | सहयोग : S.R.निर्मित | झळकी : 9923290532

## धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमी संघाचे सलग दोन विजय !!



**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमी संघाने आपल्या प्रतिस्पर्धी संघांविरूध्द सलग दोन विजय मिळवत आपली घौडदौड कायम ठेवली. सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अलि बागवान याने फटकावलेल्या १०९ धावांच्या मदतीने पहिल्या सामन्यामध्ये धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमीने मेट्रो क्रिकेट ॲकॅडमीचा व्हिजेडी मेथ डनुसार ३८ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमीने २९.३ षटकामध्ये २३० धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये अलि बागवान याने ६१ चेंडूत २० चौकार आणि २ षटकारांसह १०९ धावांची खेळी साकारली. दुसऱ्या बाजुने राजवीर जाधव याने ५९ धावांचे योगदान दिले. सामन्यामध्ये दुसऱ्या डावात पावसामुळे ९.४ षटकांमध्ये ७२ धावांचे लक्ष्य देण्यात आले होते. यावेळी मेट्रो क्रिकेट ॲकॅडमीला ९.४ षटकात केवळ ३३ धावा करता आल्या. दुसऱ्या सामन्यामध्ये अलि बागवान याने केलेल्या ६३ धावांच्या खेळीमुळे धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमीने मिलेनीयम नॅशनल स्कूलचा ४ गडी राखून पराभव केला.

# सिंहगड संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा क्रीडा उपक्रम





**मान्यवरांचे मार्गदर्शन**

● सदर कार्यक्रम संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले, संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले, संस्थेच्या उपाध्यक्षा रचना नवले अष्टेकर, उपाध्यक्ष रोहित नवले, प्राचार्य डॉ. अरविंद देशपांडे व उपप्राचार्य डॉ. के. आर. बोरोले व आर. एच. बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. संजयकुमार पिंगट, प्रा. घनश्याम फिरमे व प्रा. भूमी पाटील यांनी काम पाहिले. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सोनल जगताप(इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार) ,प्रा. रवींद्र बोऱ्हाडे(संगणक), प्रा. डॉ.नगरकर(यांत्रिक), प्रा. डॉ. मनोज बांगरे(माहिती व तंत्रज्ञान) व प्रा. महेश आळंदकर (प्रथम वर्ष विभाग प्रमुख) यांचे खुप छान सहकार्य लाभले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खेळ खेळणे एका व्यक्तीसाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. हे शारीरिक बळ देण्यासह मानसिक सामर्थ्य देते. या गोष्टीचे महत्त्व जाणून व सिंहगड संस्थेच्या ३१ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधून, श्रीमती. काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांने मिळून पुण्यातील सिंहगड स्प्रिंग डेल मैदानात नुकतेच क्रीडा उपक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये एकूण ७७ स्वयंसेवकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी अर्थव खारोडे आणि समीक्षा भदाने हे उपस्थित होते.

या उपक्रमामध्ये मैदानी खेळ आणि बैठे खेळ, या दोन्ही प्रकारचे खेळ खेळले गेले. मैदानी खेळांमध्ये रस्सी-खेच, खो-खो, कबड्डी ,रिले शर्यत व दोरी उडी यांचा समावेश होता. स्वयंसेवकांची चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली होती आणि प्रत्येक गटाने या क्रीडा उपक्रमांमध्ये भाग घेतला. बैठे खेळामध्ये बुद्धिबळ आणि कॅरम या खेळांचा समावेश होता. स्वयंसेवकांनी त्यांच्या खेळाचे प्रदर्शन केल्याने वातावरण ऊर्जा आणि उत्साहाने भरले होते. उपक्रमादरम्यान स्वयंसेवकांनी उत्कृष्ट संघकार्य आणि समन्वय दाखवला.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला आणि बक्षीस वितरण समारंभाने सांगता झाली. या कार्यक्रमाने स्वयंसेवकांमध्ये क्रीडावृत्ती आणि सांघिक कार्याच्या भावना वाढवण्यात प्रभावी भूमिका बजावली. एकंदरीत, श्रीमती. काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांद्वारा आयोजित क्रीडा उपक्रमाला मोठे यश मिळाले.






### पहिल्या पीवायसी स्नुकर अँड बिलियर्डस लीग

# क्यु मास्टर्स, सुप्रीम एसेस, जोग स्पेक्ट्रम संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना आयोजित पहिल्या पीवायसी स्नुकर अँड बिलियर्डस लीग स्पर्धेत साखळी फेरीत क्यु मास्टर्स, सुप्रीम एसेस, जोग स्पेक्ट्रम कॉमेट्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

पीवायसी जिमखाना येथील स्नुकर अँड बिलियर्डसमध्ये हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत सलामीच्या लढतीत क्यु मास्टर्स संघाने सेनूमेरो रॉकेट्स संघाचा 4-3 असा संघर्षपूर्ण पराभव करून विजयी सलामी दिली. सामन्यात 15 रेड स्नूकर एकेरीत क्यु मास्टर्सच्या मिहीर शहाला सेनूमेरो रॉकेट्सच्या योगेश लोहियाने 48-65 असे तर, 6 रेड स्नूकर दुहेरीत जयदीप गोडबोले व प्रकाश वाळंबे यांना रॉकेट्सच्या योगेश लोहिया व आरिन माळी यांनी 51-61 असे पराभूत करून आघाडी घेतली. बिलियर्ड्स रेस टू 150मध्ये क्यु मास्टर्सच्या निशाद चौघुलेने अमित भडभडेचा 152-86 असा तर, 6 रेड स्नूकर एकेरीत क्यु मास्टर्सच्या कर्णा मेहताने रॉकेट्सच्या निशांत मेहताचा



67-39 असा पराभव करून संघाला बरोबरी साधून दिली. 6 रेड स्नूकर दुहेरीत अमीर आजगावकर व आदित्य जाधव याना रॉकेट्सच्या प्रशांत कुलकर्णी व सत्यजित लिमये यांनी 48-72 असे पराभूत केले. 6 रेड स्नूकर एकेरीत क्यु मास्टर्सच्या निशाद चौघुलेने रॉकेट्सच्या विशाल मल्होत्राचा 54-42 असा तर, अखेरच्या ब्लू बॉल शूट आउटमध्ये क्यु मास्टर्सच्या यश काळेने विशाल भुरटचा 3-0 असा सहज पराभव करून संघाचा विजय सुकर केला. दुसऱ्या सामन्यात सुप्रीम एसेस संघाने बदामीकर स्टार्स संघावर 4-3 असा विजय मिळवत शानदार सुरुवात केली. विजयी संघाकडून महागडा खेळाडू ठरलेल्या रोहित नारगोळकर, निमिश कुलकर्णी, गिरीश दामले, समीर जोशी यांनी सुरेख कामगिरी बजावली. अन्य लढतीत जोग स्पेक्ट्रम कॉमेट्स संघाने स्कायलाईन स्ट्रायकर्स संघाचा 4-3 पराभव करून विजयी सुरुवात केली. जोग स्पेक्ट्रम कॉमेट्स संघाकडून सचिन संचेती, रोहित सुगंधी, दिपक सबनीस, आनंद आपटे, हर्षद शहा यांनी विजयी कामगिरी केली. याआधी स्पर्धेचे उदघाटन पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे, क्लबचे मानद सचिव सारंग लागू आणि अर्जुन पुरस्कार विजेते देवेंद्र जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक नंदन डोंगरे, रणजीत पांडे, कर्णा मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.



### नेत्रहीन राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा

# अमोल, शिवाजी, रोहित, अभिजीत ,स्वप्रिल यांची निवड



■ राष्ट्रै संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** क्रिकेट असोसिएशन फॉर ब्लाइंड हरियाणा यांचे वतीने दिनांक 16 ते 19 ऑगस्ट दरम्यान सोनीपत, हरियाणा येथे नेत्रहीन राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आलेले आहेत या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघामध्ये पुण्याचे अमोल करचे (कर्णधार), शिवाजी लोंढे रोहित भरगुने,अभिजीत शिरतोडे ,स्वप्रिल वाघ यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र संघाचे नागपूर येथे 14 व 15 ऑगस्ट रोजी सराव शिबिर होणार आहे.कोकणस्थ परिवार पुणे चे वतीने आज शनिवार दिनांक १० ऑगस्ट रोजी पंडित नेहरू स्टेडियम पुणे. येथे त्यांना सुनील नेवरेकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी सचिव पराग गानू, असफिया सय्यद, दिनकरराव शिंदे होते.

### हॉकी पुणे लीगमध्ये क्रीडा प्रबोधिनीचे पूर्णपणे वर्चस्व

# ज्युनियर आणि सीनियर जेतेपदांवर मोहोर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फॉर्मात असलेल्या क्रीडा प्रबोधिनीने हॉकी पुणे लीग 2024-25 स्पर्धेत वर्चस्व गाजवताना सीनियर आणि ज्युनियर डिव्हिजनचे जेतेपद पटकावले. नेहरूनगर-पिंपरी येथील मेजर ध्यानचंद स्टेडियमवर झालेल्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत रविवारी एकतर्फी फायनलमध्ये क्रीडा प्रबोधिनीने जीएसटी आणि सेंट्रल एक्साइज, पुणे संघाचा 5-1 असा पराभव करत सीनियर डिव्हिजनच्या विजेतेपदावर नाव कोरले. सचिन राजगोडे (10वा), रोहन पाटील (15वा), राहुल शिंदे (20वा), सचिन कोळेकर (21वा), सागर शिंगुडेचे (30वा) मैदानी गोल त्यांच्या विजयाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. जीएसटी आणि सेंट्रल एक्साइजकडून एकमेव गोल तालीब शहाने (59व्या) केला.

तिसऱ्या स्थानासाठीच्या लढतीत, फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, पुणे संघाने मध्य रेल्वे, पुणेला 3-2 असे पराभूत केले. विजयी संघाकडून श्री किशनने (3रा) पेनल्टी स्ट्रोकद्वारे गोलांचे खाते उघडले. त्यानंतर आकाश राजने (53व्या) पेनल्टी कॉर्नरचे रूपांतर करताना आघाडी वाढवली. राज पाटीलने (57व्या) त्यात



आणखी भर घातली. मध्य रेल्वेकडून दोन्ही गोल स्टीफन स्वामीने (6व्या, 17व्या मिनिटाला-पीसी) केले.

ज्युनियर डिव्हिजनमधील अंतिम लढतही एकतर्फी झाली. त्यात क्रीडा प्रबोधिनीने फ्रेंड्स युनियन क्लबचा 7-0 असा धुव्वा उडवला.सोहम काशीद (42वे), सलमान अंबी (43वे), गौरव पाटील (43वे-पीसी), सूरज शुक्ला (45वे, 59वे), कार्तिक पठारे (54वे) आणि दीपक चव्हाणची (57वे) कामगिरी महत्त्वपूर्ण ठरली. फ्रेंड्स युनियनकडून एकही गोल झाला नाही.

#रा